**( सुचना :- शुकवार दिनांक २८-४-२००६ रोजी आयोजित केलेली मा.सर्वसाधारण सभा तहकुब झाली. सदर सभा दिनांक ५-५-२००६ रोजी निश्चीत झाली. परंतु सदर दिवशी मा.खा.प्रमोदजी महाजन यांचे दुःखद निधनामुळे पुनश्च तहकुब झाली. व सदर सभा दिनांक १७-५-२००६ रोजी घेण्यांत आली. )**

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

नोटीस.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ ( अ ) अन्वये.)

अहमदनगर महानगरपालिका कार्यालय.

दिनांक : १८-४-२००६

श्री./ श्रीमती.......................................

सदस्य,

अहमदनगर महानगरपालिका.

यांस -

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुकवार दिनांक २८-४-२००६ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १.विषय पत्रिका व टिपणी.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

शुकवार दि. २८-४-२००६ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या सर्व साधारण सभेपुढील विषय पत्रिका.

--*--

१. मागील दिनांक ३१-१-२००६रोजीच्या सर्वसाधारण सभेचे व दि.२०-२-०६ च्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे .

२. दुखवटयाचे प्रस्ताव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अधिन अहमदनगर महानगरपालिका सभा नियम , विधीनियम, उपविधी व स्थायी आदेश , समित्यांचे कामकाज व कार्यपध्दती बाबत तयार केलेले नियम अखेर मंजुरीसाठी.

४. अहमदनगर महानगरपालिका शाळा नं.११ मा.जिल्हा न्यायालयास भाडेतत्वावर देणे बाबत पारित झालेला महानगरपालिका ठराव क्रमांक १० दि.१४-१२-२००५ चा फेरविचार होणे बाबत मा.श्री.कानडे अशोक नाथा व इतर ६० सदस्य यांनी स्वाक्षांकित केलेली यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट कार्योत्तर मंजुरीसाठी.

५. अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीचे सि.स.नं.५१६१ अ / ७ अ / १ ( बेग पटांगण ) येथे खाजगीकरणाने " बांधा,वापरा व हस्तांतरीत करा " ( BOT ) " अर्थ सहाय्य करा,बांधा, व हस्तांतरीत करा " ( FBT ) या तत्वावर व्यापारी संकुल व कार्यालयीन कक्ष बांधणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

६. अहमदनगर शहरामध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा मार्फत एकात्मिक रस्ते विकास योजना राबविणे बाबत तसेच विषयांकित रस्ते केंद्र सरकारच्या लहान व मध्यम शहरांकरीता पायाभुत सुविधा विकास योजना २००५ मार्फत आधुनिक पध्दतीने कॉकिटीकरण व सुशोभिकरण करणे या दोन्हीपैकी एक पर्यायास मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

७. अहमदनगर शहराच्या वाढीव हद्दीची प्रारुप विकास योजना प्रसिध्द करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

८. अहमदनगर महानगरपालिका शहर हद्दीमध्ये केंद्र शासनाच्या अनुदानातुन प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम राबविणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

९. भारत सरकारच्या नगर विकास विभागाने लहान व मध्यम लोकसंख्या असलेल्या शहराच्या नियोजनबध्द विकासासाठी जाहिर केलेल्या यु. आय. डी. एस. एस. एम. टी. या योजनेच्या माध्यमातुन ( अ ) सावेडी भुयारी गटार योजना ( ब ) सध्या अस्तित्वात असलेल्या म.जी.प्रा.ने राबविलेल्या अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा कमांक २ ची खास दुरुस्ती व काही उपकामांचे नुतनीकरण करण्यांचा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे व मा.केद शासनांकडे मंजुरीकरीता पाठविणेस्तव ऑफिस रिपोर्ट.

१०. माणिक चौक ते भिंगारवाला चौक दरम्यान असणां-या एकमुखी दत्त मंदिर समोरील परिसरास '' श्री एकमुखी दत्त चौक '' असे नामकरण करणे बाबत मा.सर्वश्री.संजय चोपडा,सदस्य व मा.किशोरकुमार बोरा,सदस्य ,यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव .

११. प्रभाग क ९ मधील मल्हार चौक ते कांती चौक या रस्त्यास '' कै.राजाभाऊ झरकर पथ '' हे नांव देणे बाबत मा.सर्वश्री आगरकर अ.ज.,सौ.काळे गितांजली सु. श्री.शिंदे अनिल, श्री.खैरे दिपक या मा.सदस्यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव.

१२. अहमदनगर महानगरपालिकेच्या सिध्दीबाग व्यायाम शाळेस कै.दत्तु खलिफा व्यायामशाळा नांव देणें बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव.

१३. श्रीमती.हेमलता निलेश साळवे, ज्यु.क्लार्क यांची अहमदनगर महानगरपालिकेतुन पुणे महानगरपालिकेत बदली बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

१४. मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : १८-४-२००६.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

शुकवार दि. २८-४-२००६ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या सर्वसाधारण सभेपुढील विषया बाबतची टिप्पणी.

| अ.नं. | विषय | टिप्पणी |
|---|---|---|
| १ | मागील दिनांक ३१-१-२००६ रोजीच्या सर्वसाधारण सभेचे व दि.२०-२-०६ च्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे . | दि.२३-३-२००६ रोजी इतिवृत्त पाठविण्यांत आलेले आहेच , नियमा प्रमाणे आहे.इतिवृत्त कायम करणेंस हरकत नाही. |
| २ | दुखवटयाचे प्रस्ताव. | टिप्पणी नाही. |
| ३ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अधिन अहमदनगर महानगरपालिका सभा नियम , विधीनियम, उपविधी व स्थायी आदेश , समित्यांचे कामकाज व कार्यपध्दती बाबत तयार केलेले नियम अखेर मंजुरीसाठी. | मंजुरीस शिफारस आहे. |
| ४ | अहमदनगर महानगरपालिका शाळा नं.११ मा.जिल्हा न्यायालयास भाडेतत्वावर देणे बाबत पारित झालेला महानगरपालिका ठराव क्रमांक १० दि. १४-१२-२००५ चा फेरविचार होणे बाबत मा.श्री.कानडे अशोक नाथा व इतर ६० सदस्य यांनी स्वाक्षांकित केलेली यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट कार्योत्तर मंजुरीसाठी. | कार्योत्तर मंजुरीस शिफारस आहे. |
| ५ | अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीचे सि.स.नं.५१६१ अ / ७ अ / १ ( बेग पटांगण ) येथे खाजगीकरणाने " बांधा,वापरा व हस्तांतरीत करा " ( BOT ) " अर्थ सहाय्य करा,बांधा, व हस्तांतरीत करा " ( FBT ) या तत्वावर व्यापारी संकुल व कार्यालयीन कक्ष बांधणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. | मंजुरीस शिफारस आहे. |
| ६ | अहमदनगर शहरामध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा मार्फत एकात्मिक रस्ते विकास योजना राबविणे बाबत तसेच विषयांकित रस्ते केंद्र सरकारच्या लहान व मध्यम शहरांकरीता पायाभुत सुविधा विकास योजना २००५ मार्फत आधुनिक पध्दतीने कॉकिटीकरण व सुशोभिकरण करणे या दोन्हीपैकी एक पर्यायास मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. | मंजुरीस शिफारस आहे. |
| ७ | अहमदनगर शहराच्या वाढीव हद्यीची प्रारुप विकास योजना प्रसिध्द करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव. | मंजुरीस शिफारस आहे. |
| ८ | अहमदनगर महानगरपालिका शहर हद्यीमध्ये केंद्र शासनाच्या अनुदानातुन प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम राबविणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव. | मंजुरीस शिफारस आहे. |

| | | |
|---|---|---|
| ९ | भारत सरकारच्या नगर विकास विभागाने लहान व मध्यम लोकसंख्या असलेल्या शहराच्या नियोजनबध्द विकासासाठी जाहिर केलेल्या यु. आय. डी. एस. एस. एम. टी. या योजनेच्या माध्यमातुन ( अ ) सावेडी भुयारी गटार योजना ( ब ) सध्या अस्तित्वात असलेल्या म.जी.प्रा.ने राबविलेल्या अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा कमांक २ ची खास दुरुस्ती व काही उपकामांचे नुतनीकरण करण्यांचा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे व मा.केद शासनांकडे मंजुरीकरीता पाठविणेस्तव ऑफिस रिपोर्ट. | मंजुरीस शिफारस आहे. |
| १० | माणिक चौक ते भिंगारवाला चौक दरम्यान असणां-या एकमुखी दत्त मंदिर समोरील परिसरास " श्री एकमुखी दत्त चौक " असे नामकरण करणे बाबत मा.सर्वश्री.संजय चोपडा,सदस्य व मा.किशोरकुमार बोरा,सदस्य ,यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव . | मा.सभेने निर्णय घेणेस्तव. |
| ११ | प्रभाग क ९ मधील मल्हार चौक ते कांती चौक या रस्त्यास " कै.राजाभाऊ झरकर पथ " हे नांव देणे बाबत मा.सर्वश्री आगरकर अ.ज., सौ.काळे गितांजली सु., श्री. शिंदे अनिल, श्री.खैरे दिपक या मा.सदस्यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव . | मा.सभेने निर्णय घेणेस्तव. |
| १२ | अहमदनगर महानगरपालिकेच्या सिध्दीबाग व्यायाम शाळेस कै.दत्तु खलिफा व्यायामशाळा नांव देणें बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव. | मा.सभेने निर्णय घेणेस्तव. |
| १३ | श्रीमती.हेमलता निलेश साळवे, ज्यु.क्लार्क यांची अहमदनगर महानगरपालिकेतुन पुणे महानगरपालिकेत बदली बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव. | मंजुरीस शिफारस आहे. |
| १४ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. | टिप्पणी नाही. |

दिनांक :१८-४-२००६.
अहमदनगर

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दि.१७-५-२००६.

प्रस्तावाचा विषय - मागील दिनांक ३१-१-२००६ रोजीच्या सर्वसाधारण सभेचे व दि.२०-२-०६ च्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणें बाबत.

**--*--**

प्रस्तावाचा मजकूर - मागील दिनांक ३१-१-२००६ रोजीच्या सर्वसाधारण सभेचे व दि.२०-२-०६ च्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणेंसाठी मा.महानगरपालिका सभेपुढे ठेविले.

चर्चा :

मा.श्री.गिरवले -- २०/२/०६ चे बजेटबाबतचा ठरावा वाचावा. प्रत्येक नगरसेवकाची १५ लक्ष दिले त्याप्रमाणे १०.५० कोटी तरतूद आवश्यक मात्र तुम्हीच दिलेल्या यादीनुसार फक्त ८ लक्ष रुपये दर्शविले आहे.ही तफावत कशी महापौर निधी रद्य केले असे सांगीतले परंतू ठरावात नमुद नाही.त्याची नोंद घ्यावी.

मा.महापौर - महापौर निधी रद्य करण्यात आला आहे.

मा.आयुक्त -- जकात कराचे दरामध्ये कपात केलेली आहे त्यामुळे जकात कमी दर्शविली आहे.

श्री.कृष्णा जाधव -- कामाची आवश्यकता पाहून नगरसेवक निध मा.आयुक्तांच्य मान्यतेने मंजूर करावी.प्रत्यक्ष का आवश्यक ते नुसारच काम करावे.

श्री.जोशी -- शासन परिपत्रक मा.सदस्यांना पाठवावे अशी तरतूद आहे काय .

मा.महापौर -- शासनाचे परिपत्रक सर्व सदस्यांना दयावेत.

श्री.गंधे -- शासनाचे परिपत्रक देण्याची जबाबदारी कोणाची आहे ?

मा.आयुक्त -- शासनाचे निर्णय / परिपत्रक येतील ते महासभेपुढे त्या त्या महिन्यात ठेवावे.

श्री.कानडे -- मनमाड रोड ,बोल्हेगांव फाटा ते राघवेंद्र स्वामी मंदीर ते बोल्हेगांव रस्ता रुंदीकरण,मजबुतीकरण व डांबरीकरण याचा ठरावात समावेश करावा.

मा.महापौर -- वरील दुरुस्ती करावी.

श्री.कावरे -- सर्व नगरसेवकांना प्रत्येकी १५ लक्ष रुपये द्यावेत.कारण जकात चालू झाली व घरपटटी व पाणीपटटी चांगली वसुली आहे.

श्री.संदीप कोतकर -- उपनगर व शहर विभाग अशी विभागणी करावी.उपनगरात जास्त कामाची आवश्यकता असल्यामुळे तेथे जास्त निधी द्यावा.वस्तूस्थितीचा विचार करुन निर्णय घ्यावा.

श्री. सुळ  -- तेंदु पानाची जकात रद्य करावी.अशी मागणी केली होती.त्याचा उल्लेख ठरावात नाही.तसेच इले.मोटारी व पन्हाळी पत्रे बाबत चर्चा झाली नसतांनाही त्याचा उल्लेख ठरावात आलेला आहे. तेदूंचे पानावरील जकात पुर्ण माफ करावी.

नगरसचिव -- मा.महापौर साहेब यांनी तेंदुचे पानावरील जकात माफ करणेबाबत निर्णय (रूलिंग ) दिलेला नाही.

श्री.जोशी - इतिवृत्त कायम झाले नसतांनाही शासनाकडे ठराव कसा पाठविला व त्यास मंजूरी कशी आली. इतिवृत्त झाले नाही असे नगरसचिव सांगतात.

मा.आयुक्त - इतिवृत्त कायम झाल्या नंतरच ठरावाची अंमलबजावणी करावी अशी तरतुद नाही.

श्री.गंधे - नगरसचिवांनी चुका करु नये.

श्री.आगरकर - विषय कायम करणेसाठी आहे. त्यामुळे दुरुस्त्या करता येतील. चुका दुरुस्त करता येतील व प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

१.मल्हार चौक ते खोकर नाला

२.आयुर्वेद पासून काटवन खंडोबा रस्ता खोकर नाल्यापर्यत.

तसेच मागील ठरावात आनंद हॉस्पीटल रस्त्यांपासून याऐवजी युनायटेड वेस्टर्न  बँक पासून अशी दुरुस्ती करावी.

श्री.कृष्णा जाधव - ठेकेदाराची अडचण येईल काय ?  नगरसेवक निधी हा निवडुन आलेल्या नगरसेवकांना द्यावा. स्विकृत सदस्यांना देउ नये.

मा.महापौर - इतर महानगरपालिकां बाबत माहिती घेवुन ठेवावी.

श्री.गिरवले - १० ते १५ रस्ते  घेतलेले आहे.६ कामांचे टेंडर्स काढले. पुन्हा टेंडर्स काढले अटी असतांना मारुती कंपनीचे कागदपत्र नसतांना टेंडर्स उघडलेच कसे? कागदपत्रास मुदतवाढ देण्याची तरतुदच नाही. वाबळेंचे पत्र जोडले होते. करारनामा जोडणे आवश्यक होते. अशा पध्दतीने टेंडर्स घेत असतील तर ते योग्य नाही.

श्री.कृष्णा जाधव - फेर टेंडर्स मध्ये कमी दर आले आहेत त्यामध्ये १३ ते १४ लाखांचा फायदा होतो. त्यामुळे महानगरपालिकेचे हित पाहुन योग्य निर्णय घ्यावा. कमीचे टेंडर मंजूर करावे.

श्री.दिप चव्हाण - स्थायी समितीच्या शिफारशी नंतर महानगरपालिका सभेपुढे बजेट आले होते. दर बदल केले म्हणुन शासनाकडे पाठविले. शासन परिपत्रका प्रमाणे बजेट का तयार केले नाही. २०/२/२००६ नंतर बजेट परत मांडता येणार नाही. कायद्यात तरतुद नाही. ३ लाखांची कामे सन

२००५-२००६ च्या सुधारित बजेट मध्ये खर्ची टाकले आहे. ऑडीटचा शेरा २००५-२००६ साठी नाही. मात्र टेंडर मार्च २००६ नंतरचे जकात ठेकेदार नगरसेवकांच्या विरुध्द स्टेटमेंट करतो त्याला कशाचा ठेका दिला आहे. नविन दर - कर लवकरात लवकर कायदेशिर बाबींची पुर्तता करुन लागु करावेत. ठेकेदाराला महानगरपालिके विरुध्द स्टेटमेंट करणे पासुन थांबवावे. निविदा उघडल्या नंतर कागदपत्र नसतील तर टेंडर रद्द करावे.

श्री.आगरकर - ठेकेदार बेजबाबदारपणे विधाने करतो त्यामुळे त्याची सी.आय.डी.चौकशी लावा.

श्री.गंधे - रस्त्यांच्या कामामध्ये वसंत किर्ती ते निरंकारी भवन रस्ता डांबरीकरण यात दुरूस्ती करावी व त्याऐवजी त्या ठिकाणी चैतन्यनगर व समतानगर येथील रस्ते डांबरीकरण करणे अशी दुरूस्ती करावी. १० मिनीट सभा तहकुब करुन विकास कामांसाठी १५ लक्ष देणार काय ? हे तपासुन निर्णय करावा व रुलींग द्यावे.

मा.महापौर - १० मिनिटे सभा तहकुब.

६-१० वां.सभा पुन्हा सुरु.

मा.महापौर - चर्चा केली. प्रत्येक नगरसेवकांना ८ लक्ष द्यावेत.

श्री.जोशी - डी.एस.आर. चा प्रश्न व इतर बाबी विचार करता माझे वॉर्डातील सर्व कामे ८ लाखांचे डिपार्टमेंटली करावीत. प्रेमदान हडकोत पावसाचे पाणी साचते. वेदांन्तनगर येथेही पाणी साचते.

श्री.कृष्णा जाधव - रु.८ लक्ष नगरसेवक निधी आयुक्तांनी मान्य केले काय ?

मा.आयुक्त - होय.

श्री.आगरकर - ठेकेदाराने राजकारण करु नये . तसेच तो ४० रु. वसुल करतो. त्याबाबत सी.आय.डी. चौकशी करावी.

मा.महापौर - आगरकर यांचे मागणी प्रमाणे सी.आय.डी.चौकशी करणेंत येईल.

मा.श्री.गंधे - सी.आय.डी. चौकशीचे आदेश मा.गृहमंत्री व मा.मुख्यमंत्री देवु शकतात.

मा.आयुक्त - महानगरपालिकेच्या कायदे सल्लागार यांचा सल्ला घेवुन कारवाई करण्यांत येईल.

**ठराव** -- इतिवृत्त कायम करणे या विषयावर झालेल्या साधक बाधक चर्चेनुसार पुढील सुचना समाविष्ठ करुन इतिवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

१.मा.सदस्य प्रभाग नागरी सुविधा विकास निधी करीता मा.सदस्य निहाय कामे सुचित करणेसाठी रुपये ८ लक्ष रकमेचा निधी बाबत आवश्यक ती तरतूद करणेत यावी.मात्र सन २००६-२००७ या आर्थीक वर्षासाठी अंदाजपत्रकामध्ये घेण्यात आलेला महापौर निधी १ कोटी रुपये रद्य करणेत येत आहे.

२.नविन रस्ते प्रकल्पामध्ये पुढीलप्रमाणे रस्त्यांचे प्रस्तावात दुरुस्ती करणेत यावी.श्री.गंधे,सदस्य ,वसंत किर्ती ते निरंकारी भवन रस्ता डांबरीकरण या ऐवजी दुरुस्ती अशी की चैतन्य नगर व समता नगर येथील रस्ते डांबरीकरण करणे.

३.श्री.अशोक कानडे ,सदस्य - मनमाड रोड बोल्हेगांव फाटा ते राघवेंद्र स्वामी मंदीर ते बोल्हेगांव रस्ता रुंदीकरण मजबुतीकरण व डांबरीकरण या बाबी प्रस्तावात समाविष्ठ कराव्यात.

४.सौ.कांताबाई अरुण शिंदे - बुरुडगांव ते व्ही.आर.डी.ई हा उर्वरीत रस्ता डांबरीकरण करणेत यावा.

५.जकात अभिकर्ता वारंवार उलटसुलट वृत्तपत्रामध्ये सभासद व पदाधिकारी यांचेविषयी वक्तव्य करतो याबाबत सभागृहात चर्चा झाली.सभागृहात पहाता महानगरपालिका कायदेशीर सल्लागार यांचे मत घेवून संबंधीतावर पुढील कार्यवाही करणेत यावी.

६.तेंदुपत्ता विडी उद्योगासाठी लागणारा तेंदु पत्त्यांवरील जकात माफ करणेसाठी आवश्यक प्रस्ताव लवकरात लवकर मा.सभेपुढे ठेवावा.

७.१.मल्हार चौक ते खोकर नाला

२.आयुर्वेद पासून काटवन खंडोबा रस्ता खोकर नाल्या पर्यंत

३.तसेच मागील ठरावातील आनंद हॉस्पीटल रस्त्यांपासून ऐवजी युनायटेड बँक पासून अशी दुरस्ती करावी.

८. श्री.शेंडगे यांचे निलंबन मागे घेण्यात यावे.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ३ दि.१७-५-२००६.

................................................................................

प्रस्तावाचा विषय - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अधिन अहमदनगर महानगरपालिका सभा नियम , विधी नियम , उपविधी , स्थायी आदेश, समित्यांचे कामकाज व कार्यपध्दती बाबत तयार केलेले नियम अखेर मंजुरीसाठी.

**--*--**

प्रस्तावाचा मजकूर - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार मुख्य सभांचे व इतर समित्यांचे कामकाज व कार्यपध्दती बाबत सभा नियम तयार करून सदरचे सभा नियमास दिनांक १४-१२-२००५ रोजी झालेल्या महासभेपुढे ठेवला असता सदर सभा नियमास ठराव क्रमांक ३ नुसार मान्यता देण्यांत आलेली आहे. उपरोक्त तयार करण्यांत आलेल्या अधिसुचनेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५५ (३) नुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देणे तसेच नोटीस बोर्ड व सन्माननीय सदस्य यांना माहितीस्तव पाठविणे आवश्यक असल्यांने उपरोक्त मसुदा वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी पाठविणेंत आला असता त्यास स्थानिक वर्तमानपत्र दैनिक पुण्यनगरी मध्ये दि. ४-१-२००६ रोजी प्रसिध्दी देण्यांत आली असुन, महानगरपालिकेच्या नोटीस बोर्डवर नागरिकांना पाहणेसाठी डकवुन प्रसिध्द करण्यांत आले होते. तसेच सन्माननीय सदस्यांना माहिती होणेंसाठी साप्रवि जा.क्र. ३०२४ दि.३-१-२००६ नुसार अवलोकनार्थ पाठविण्यांत आलेले होते.

उपरोक्त मुख्य सभांचे व इतर समित्यांचे कामकाज व कार्यपध्दती बाबतच्या नियमास प्रसिध्दी व मा.सदस्यांना अवलोकनार्थ पाठविलेल्या बाबीस ३० दिवसापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. सदर मुख्य सभांचे व इतर समित्यांचे कामकाज व कार्यपध्दती बाबतच्या नियमात नागरिकांनी अथवा सदस्यांनी कोणत्याही प्रकारचे बदल अथवा दुरूस्ती सुचविली नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५४,४५५,४५६,४५७ नुसार महानगरपालिकेची अखेर मंजुरी घेउन्न अंतिम मान्यतेसाठी मा.शासनाकडे पाठविणे आवश्यक असल्याने सदरचे मुख्य सभांचे व इतर समित्यांचे कामकाज व कार्यपध्दती बाबतचे तयार केलेले नियम अखेर मंजुरीसाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेंस व मा.शासनाकडे पाठविणेंस मंजुरी मिळावी हि विनंती.

यावर मा.उपायुक्त ( सा.) यांचा अभिप्राय की, " अ " प्रमाणे कार्यवाहीसाठी शिफारस आहे.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सहमत.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मनपा सभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त ( सा.) ,मा.आयुक्त साहेब ,मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

चर्चा --

श्री.दिप चव्हाण - १. सभा घेतली नाही तर तरतुद नाही. तसेच काही अधिकार प्रशासनाकडे आहे. अभ्यास व सूचना यासाठी १ महिना तहकुब करावा.

श्री.कानडे - महत्वाचा विषय आहे. ब-याच बाबी नियमात आल्या नाहीत इतर महानगरपालिकेची माहिती घ्यावी. फक्त महिला व बाल कल्याण समिती दर्शविली. आरोग्य, बांधकाम, शहर सुधारणा समिती, गृहनिर्माण समिती, स्थापन करण्यांबाबत तरतुद नाही. सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यांसाठी कमिटी स्थापन करुन त्यांनी इतर महानगरपालिकांना व्हीजीट देवुन, पाहणी करुन सक्षम नियम करावेत.

मा.महापौर - पुढील मिटींग पर्यंत तहकुब तत्पुर्वी नगरसचिवांकडे सूचना कराव्यात

ठराव -- प्रशासनाने केलेले नियम पहाता त्यावर अभ्यास करणेसाठी व मा.सदस्यांच्या सुचना घेणेसाठी ठराव कार्यालयात दाखल झाल्यापासून आणखी एक महिन्याचा कालावधी देण्यात येत आहे.या कालावधीत मा.सदस्यांनी आपआपल्या हरकती अथवा सुचना लेखी स्वरुपात प्रशासनाकडे दयाव्यात.व सदर हरकती सुचनांचा विचार करुन त्यासह सदरचा विषय पुढील सभेपुढे ठेवणेत यावा.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक -- मा.श्री.अशोक कानडे,
अनुमोदक -- मा.श्री.दिप चव्हाण ,

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ४ दि.१७-५-२००६.

••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर महानगरपालिका शाळा नं.११ मा.जिल्हा न्यायालयास भाडेतत्वावर देणे बाबत पारित झालेला महानगरपालिका ठराव क्रमांक १० दि.१४-१२-२००५ चा फेरविचार होणे बाबत मा.श्री.कानडे अशोक नाथा व इतर ६० सदस्य यांनी स्वाक्षांकित केलेली यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट कार्योत्तर मंजुरीसाठी.

--*--

प्रस्तावाचा मजकूर - मा.जिल्हा व सत्र न्यायाधिश ,अहमदनगर यांचे दिनांक ८/६/२००५ च्या पत्रानुसार महानगरपालिका शाळा नंबर ११ ही न्यायालयासाठी तात्पुरत्या कालावधीसाठी मिळणेबाबत अर्ज केला असता त्यावर महानगरपालिका ठराव नंबर १० दिनांक १४/१२/०५ अन्वये `` महानगरपालिका शाळा नंबर ११ मध्ये शिक्षण मंडळाचे कार्यालय असल्याने व जुने रेकॉर्ड असल्याने सदर जागेऐवजी झेंडीगेट येथील शाळा मा.न्यायालयास देण्यास मंजूरी देण्यात येत आहे. नियमानुसार कार्यवाही करावी.`` असा ठराव पारीत झालेला आहे.

तथापी मा.अध्यक्ष, अहमदनगर शहर बार असोसिएशन यांनी दिनांक १६/१२/०५ रोजी इकडेस पत्र देवून शाळा नंबर ११ आनंदी बाजार हिच शाळा कोर्ट कामाकरीता, वकील वर्गाकरीता व पक्षकारांच्या दृष्टीने सोयीची व योग्य असल्याने झेंडीगेट येथील शाळा नंबर २२ ऐवजी आनंदी बाजार येथील शाळा नंबर ११ मा.न्यायालयास देण्यास विनंती केलेली आहे.

तसेच मा.सर्वश्री. कानडे अशोक नाथा व इतर ६० सदस्य, यांनी स्वाक्षांकित केलेला दिनांक २४/२/२००६ रोजीचा अर्ज इकडेस दिनांक ६/३/२००६ रोजी प्राप्त झाला. त्यापैकी

(१) श्री.मिलींद गंधे - कोतवाली पोलिस स्टेशन समोरील जागा द्यावी.
(२) श्री.शेख मुदस्सर - झेंडीगेट शाळा क्रमांक ४ द्यावी.
(३) श्री.अनंत जोशी - ठराविक कालावधीसाठी हरकत नाही.
(४) दिपक सुळ - ठराविक कालावधीसाठी हरकत नाही.
(५) श्री.कृ.द.जाधव - नाही. असे स्वाक्षरी करतांना नमुद केलेले आहे.

तसेच पुढील सदस्यांनी स्वाक्ष-या केलेल्या नाहीत.

(१) सौ.सय्यद वर्षा आरिफ,
(२) श्री.जगताप नितीन विलास,
(३) श्री.खैरे दिपक साहेबराव,
(४) श्री.चव्हाण दिप नारायण,
(५) श्री.पवार नामदेव शांताराम

अहमदनगर शहरातील जिल्हा न्यायालयाचे नविन पाच मजली इमारतीचे बांधकाम दोन टप्प्यांत पुर्ण होणार असल्याने व शहरात भव्य अशी सुंदर वास्तू उभी राहणार असून, शहराचे वैभवात भर पडणार आहे. तसेच शाळा नंबर ११ ही कोर्ट कामाकरीता शहराच्या मध्यवस्तीत व जुन्या कोर्टाशी संलग्न असल्याने सर्व दृष्टीने सोयीचे आहे. तरी जिल्हा न्यायालयास महानगरपालिकेच्या गौरी घुमट येथील शाळा नंबर ११ ही इमारत तात्पुरत्या कालावधीसाठी भाडे तत्वावर उपलब्ध करुन देण्यास उर्वरित ५५ सदस्यांनी संमती दिलेली आहे. याकरीता मा.महासभेची मंजुरी गृहीत धरुन केले जाणारे कार्यवाहीस भविष्यात मंजूरी दिली जाईल असे गृहीत धरणेत यावे. असेही सदर पत्रात नमुद केलेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ महानगरपालिकेचे कामकाज यातील नियम १. (र) पुढीलप्रमाणे

" महानगरपालिकेने पारित केलेल्या कोणत्याही ठरावात,तो पारित झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत फेरबदल करता येणार नाही किंवा तो रद्य करता येणार नाही.मात्र,अशा ठरावात,एकूण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी एक द्वितीयांश पालिका सदस्यांनी,किंवा कोणत्याही विवक्षित बाबतीत,या अधिनियमान्वये आवश्यक असेल अशा अधिक संख्येइतक्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या आणि सभेत संमत झालेल्या ठरावाने फेरबदल करता येईल किंवा तो रद्य करता येईल.खंड (ह) मधील आवश्यक गोष्टी पुर्ण करुन अशा सभेची नोटीस देण्यात आली पाहीजे आणि अशा नोटीशीत,ज्या ठरावात अशा सभेत फेरबदल करण्याचे किंवा तो रद्य करण्याचे योजिले असे तो ठराव आणि अशा ठरावात फेरबदल करण्यासाठी किंवा तो रद्य करण्यासाठी असलेली सूचना किंवा प्रस्ताव पुर्णपणे नमूद केला पाहिजे. "

मा.न्यायालयाने केलेली मागणी व अडचण, तसेच महानगरपालिका सदस्यांनी केलेली शिफारस विचारात घेता महानगरपालिकेने पारित केलेला ठराव यामध्ये विसंगती दिसत असल्याने महानगरपालिका ठराव क्रमांक १० दिनांक १४/१२/०५ चा फेरविचार होणे योग्य वाटते.

सबब आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, वरील " अ " प्रमाणेची अधिनियमातील तरतुद विचारात घेता महानगरपालिका झालेल्या ठरावावर फेर निर्णय घेवू शकेल. सर्व सदस्यांनी स्वाक्ष-या करून दिलेल्या पत्रावर बहुतेक सदस्यांच्या स्वाक्ष-या असुन कार्योत्तर मंजुरीस अधिन राहुन जागा हस्तांतरणांस संमती दिली आहे. त्यामुळे उचित आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त सो.यांचा अभिप्राय की, मा.महासभेचा निर्णय फेरविचारार्थ प्रस्ताव यापुर्वीच सादर केला आहे. बहुतांश सदस्यांनी महानगरपालिकेची शाळा क्र. ११ न्यायालयास हस्तांतर करणेस संमती लेखी निवेदनाने दर्शविली आहे. प्रस्तावित जागा शासन नियमानुसार विहित भाडे देणेचे अटीवर देणेंस हरकत नाही. प्रस्तावाशी सहमत.

यावर मा.महापौर सो.यांचा अभिप्राय की, मा.आयुक्त यांचे मताशी व मा.सदस्य यांचे विचाराशी सहमत. फेर प्रस्तावानुसार जागा देणे बाबत नियमानुसार कार्यवाही करणेत यावी. व प्रस्ताव अखेर मान्यतेसाठी लगतच्या मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेंत यावा.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सा.), मा.आयुक्त सो. ,मा.महापौर सो.यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

ठराव -- ऑफीस रिपोर्टानुसार कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.नियमानुसार कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक -- मा.श्री.सुरेश शेळके,

अनुमोदक -- मा.श्री.संजय चोपडा

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ५ दि.१७-५-२००६.

••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीचे सि.स.नं.५१६१ अ / ७ अ / १ (बेग पटांगण) येथे खाजगीकरणांने " बांधा,वापरा व हस्तांतरीत करा " (BOT) " अर्थ सहाय्य करा,बांधा,व हस्तांतरीत करा " ( FBT) या तत्वावर व्यापारी संकुल व कार्यालयीन कक्ष बांधणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

--*--

प्रस्तावाचा मजकूर - अहमदनगर महानगरपालिकेसमोरील महानगरपालिकेच्या मालकीचे सि .स. नं . ५१६१ अ / ७अ / १ ( बेग पटांगण ) जागा शॉपींग सेंटर व ऑफिसेस बांधणे करीता आरक्षीत असल्याने सदर जागेमध्ये "बांधा, वापरा व हस्तांतरित करा / अर्थसहाय्य करा, बांधा व हस्तातंर करा "(BOT/ FBT) या तत्वावर विकसीत केल्यास अहमदनगर महानगरपालिकेस मोठ्या प्रमाणात प्रिमियम मिळेल व शहराच्या सौदर्यातही भर पडेल. अशा बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे सादर केला असता मा स्थायी समिती ठराव क्र. -६ दि. ६/८/२००५ अन्वये उपरोक्त प्रमाणे सि.स. न. ५१६१ अ /७अ/१ या जागेवर BOT/ FBT या तत्वावर शॅापिंग सेंटर व ऑफिसेस बांधणेस मंजुरी देणेत आली आहे. त्यानुसार उपरोक्त कामाचे आराखडे व अंदाजपत्रके तयार करणेचे काम महानगरपालिकेच्या आर्किटेक्ट पॅनेलवरील आर्किटेक्ट श्री. मनोज जाधव, मे. अविष्कार ग्रुप अहमदनगर यांना इकडील पत्र जा. क्र. सा बां वि ५९० दि. ९/९/२००५ ने कळविणेत आले. त्यानुसार त्यांनी आराखडे व अंदाजपत्रक दि. ६ फेब्रुवारी २००६ रोजी सादर केले. त्यास मा. नगररचनाकार यांनी छाननी करुन त्यांचे कडील पत्र जा. क्र. ४१४३ दि. ३/३/२००६ ने अंतिमरित्या मंजुरी प्रदान केली आहे.

सदरच्या आराखड्यामध्ये खालचा तळ मजला, वरचा तळ मजला, पहिला मजला, दुसरा मजला, तिसरा मजला, चौथा मजला, पाचवा मजला असे एकूण सात मजले दर्शविणेत आले असून त्याचे अंदाजपत्रक रक्कम रु. ४,१५,१९,९००.०० आहे.

सदर आराखाड्यामध्ये खालील बाबी समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत.

१) खालच्या मजल्यामध्ये - चार चाकी व दोन चाकी वाहनांसाठी वाहनतळाची व्यवस्था करणेत आली आहे. ३ शोरुम व १६ दुकाने प्रस्तावित आहेत.
२) वरच्या मजल्यामध्ये २९ दुकाने प्रस्तावित आहेत.
३) पहिल्या मजल्यावर ३ शोरुम व २५ दुकानांची बांधकामे प्रस्तावित आहेत.
४) दुस-या मजल्यावर ५ कार्यालये प्रस्तावित आहेत.
५) तिस-या मजल्यावर ८ कार्यालये प्रस्तावित आहेत.
६) चौथ्या मजल्यावर १०० सदस्य संख्या करिता सभागृह व कार्यालयीन कक्ष प्रस्तावित आहे.
७) पाचव्या मजल्यावर प्रेक्षक गलरी व लॉबी प्रस्तावित आहे.

सदर अहवालाप्रमाणे एकुण सात मजले बांधण्यात येणार असुन त्याचे बांधकामाचे क्षेत्रफळ ६५६२८.०४ चौ. फुट असुन त्यापैकी खालचा मजला ,वरचा मजला, पहिला व दुसरा मजला अशी एकुण ४ मजले विकासकाला मिळणार असुन त्याचे बांधकामाचे एकुण क्षेत्रफळ ३७७१७.६७ चौ. फुट विकासकाला मिळणार आहे तिसरा ,चौथा व पाचवा मजला अशी तीन मजल्याच्या बांधकामाचे क्षेत्रफळ २७९१०.३४ महानगरपालिकेस मिळणार आहे.

वरील प्रमाणे सदर इमारतीचे बांधकाम पुर्ण झालेनंतर महानगरपालिकेच्या जवळच्या परिसराचा विकास होईल तसेच शहराच्या सौदर्यातही भर पडणार असुन महानगरपालिकेस आधुनिक सोयींनीयुक्त असे कार्यालय उपलब्ध होणार असुन त्यामध्ये अद्यावत असे सभागृह , मा. पदाधिकारी यांचे दालन व महानगरपालिकेचे काही विभाग सदर इमारतीमध्ये स्थलांतरीत करता येतील. त्यामुळे प्रशासकीय कामातही सुसुत्रता येईल.

अहमदनगर महानगरपालिकेने BOT/ FBT तत्वावर बांधणेत येणा-या योजनांसाठी आर्थिक सल्लागार म्हणून फोर्टरेस फायनान्सियल सर्व्हीसेस लि. दर्यानगर हाऊस, दुसरा मजला, ६९ कर्वे रोड, मरिन लाईन, मुंबई यांची नेमणूक केलेली असून सि.स. नं. ५१६१अ/७अ/१ या जागेवर BOT/ FBT तत्वावर बांधणेस येणा-या प्रस्तावित व्यापारी संकुल व कार्यालयीन कक्ष याचा प्रकल्प अहवाल तयार करणे, आर्थिक सल्ला देणे व जाहीर निविदेचा मसुदा तयार करणेबाबत त्यांना इकडील पत्र क्र. सा बां वि ५९१ दि. ९/९/२००५ अन्वये कळविणेत आलेले आहे. त्यानुसार त्यांनी दिनांक २४ मार्च २००६ रोजी त्यांचेकडील अहवाल इकडेस सादर केला आहे.

इमारत पुर्ण झालेनंतर अहमदनगर महानगपालिकेस परवाना फी व मालमत्ता कर या द्वारे प्रतिपर्षी उत्पन्नाचे स्तोत्र निर्माण होईल.

तरी सि.स.नं ५१६१ अ/७अ/१ (बेग पटांगण) येथे " बांधा - वापरा व हस्तांतरीत करा " व " अर्थसहाय्य करा, बांधा व हस्तांतरीत करा " (BOT / FBT) या तत्वावर व्यापारी संकुल व कार्यालयीन कक्ष बांधणेबाबतचा प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

यावर श्री.एन.बी.मगर,उपशहर अभियंता यांचा अभिप्राय की,अहवालाप्रमाणे मंजूरीस्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर श्री.एन.डी.कुलकर्णी ,शहर अभियंता यांचा अभिप्राय की,"मंजुरीसाठी व पुढील आदेशासाठी सविनय सादर.

यावर उपायुक्त (सामान्य ) यांचा अभिप्राय की, " प्रस्तावीत केल्याप्रमाणे मान्यतेसाठी प्रस्ताव मान्यतेसाठी मा.सर्व साधारण सभेपुढे ठेवणेस शिफारस आहे."

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, " प्रस्तावीत जागेवरील एकूण बांधकामाचे क्षेत्रफळ,विकासकास वाणीज्य व्यापारासाठी मिळणारे क्षेत्र, एकूण भांडवली गुंतवणूक ,मनपास मिळणारे बांधकाम,एकूण बी ओ टी प्रकल्प याचा खर्चाचा अभ्यास करुन नगररचनाकार यांनी प्रकल्पांचे बांधकामाचे मुल्यांकन आणि महानगरपालिकेस मिळणारा प्रेमिअम याविषयी सविस्तर अहवाल / अभिप्रायासह फेर सादर करा "

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय की,उपरोक्त सुचनांप्रमाणे अहवाल स्वतंत्र रित्या सादर करीत आहे.

विषयांकीत प्रकल्पाची आर्थिक व्यवहार्यता (Finacial viability) तपासणेच्या अनुषंगाने प्रकरणाची तांत्रीक तपासणी केली. या धारीकेतील फोर्ट ट्रेस कंपनीच्या अहवालाशी मी सहमत नाही. त्यांच्या अहवालात त्यांनी अहमदनगर महानगरपालिकेस या प्रकल्पांअंतर्गत एकूण २७९१०.०० चौ.फुट इतके बांधकाम क्षेत्र बीओटी ठेकेदारांनी मनपास देण्याचे आहे.व त्यापोटी बीओटी ठेकेदारास अहमदनगर महानगरपालिकेने रुपये ७५ लक्ष इतकी रक्कम देण्याचे सुचवले आहे.या प्रकल्पातून अहमदनगर महानगरपालिकेस रुपये १०१ लक्ष इतका प्रत्यक्ष फायदा होणार आहे.असेही फोर्ट ट्रेस कंपनीने नमुद केले आहे.या प्रस्तावास माझ्या असहमतीची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) कोणत्याही प्रकल्पात केलेली गुंतवणूक पुन्हा वसुल होणे हा किमान हेतू ठेवणे आवश्यक असते या प्रकल्पात मनपाची गुंतवणूक जागेच्या स्वरुपात आहे.त्यामुळे या प्रकल्पातून किमान जागेची किंमत वसुल होणे आवश्यक आहे.

जागेची किंमत --

सदर जागा गावठाण क्षेत्रातील असन त्या जागेस १५ मी व १२ मी रुंदीच्या रस्त्यांवर सन्मुखता आहे.या जागेस दोन इतका चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे.त्यामुळे या जागेस उच्च वाणिज्य क्षमता लाभलेली आहे.आजू बाजूस असणा-या शाळा,मनपा कार्यालय कोर्ट इत्यादी संस्थामुळे या जागेची निश्चित स्वरुपाचा ग्राहक वर्ग लाभलेला आहे.या जागेची शिघ्रसिध्द गणकाप्रमाणे येणारी किंमत खालीलप्रमाणे आहे.

| दर | क्षेत्र | एकूण किंमत |
|---|---|---|
| ५५००/- प्र.चौ.मी. | ३०७२.०० चौ.मी. | १,६८,९६,०००/- |

(फोर्ट ट्रेसने ही किंमत - ७३.५७ ) लक्ष दर्शविलेली आहे.)

वरीलप्रमाणे शिघ्रसिध्द गणकाचा दर हा प्रत्यक्ष बाजारातील दरांपेक्षा खुपच कमी दर्शविलेला आहे.स्थानिक चौकशी आजुबाजूच्या इमारतीमधील व्यावसायिक मिळकतीचे दर,स्थानिक अभियंते व वास्तू विशारद यांचेकडे चौकशी केली असता हा दर सर्वसाधारणपणे रुपये २०००.०० ते २५००.०० प्रति चौ.फुट इतका आहे.किमान दर रुपये २०००.०० प्र.चौ.फुट इतका गृहीत धरला तरी या जागेचा दर खालीलप्रमाणे येईल.

छोटया मिळकतीचा दर रुपये २०००.०० प्र.चौ.फुट विषयांकीत जागा मोठया क्षेत्राची असून या क्षेत्रासाठी ३५% वजावट देण योग्य होईल.

- रुपये २०००.००X ०.६५ = १३००.०० प्र.चौ.फुट
- जागेची एकूण किंमत ३०७२X १३००X १०.७६ = रुपये ४,२९,७१,१३६/-
  Say -- ४.२५ कोटी

थोडक्यात या जमिनीची किंमत बाजारभावाप्रमाणे रुपये ४.२५ कोटी इतकी आहे.(फोर्ट ट्रेस कंपनीने रुपये ३.४७ कोटी इतकी ठरवली आहे.)

म्हणजेच वर नमुद केल्याप्रमाणे जागेची एकूण किंमत रुपये ४.२५ कोटी इतकी या प्रकल्पातून मिळणे आवश्यक आहे.फोर्ट ट्रेस कंपनीने सुचविल्याप्रमाणे या प्रकल्पातून रुपये १०१ लक्ष इतका निव्वळ फायदा होणार असल्याने फोर्ट ट्रेसच्या सुत्राप्रमाणे हा प्रकल्प आर्थिकदृष्टया व्यवहार्य ठरत नाही.फोर्ट ट्रेसने वरील निष्कर्ष काढतांना ठरवलेले खालील निकष अयोग्य आहेत.

१.प्रकल्पातील दुकाने व कार्यालये यांचेपासून मिळणारे अपेक्षीत उत्पन्न विशेषतः यासाठी गृहीत धरलेले दर कमी आहेत.

२.प्रत्यक्ष विक्रीसाठी उपलब्ध असलेले क्षेत्र (salebale Area ) गृहीत धरतांना फक्त कारपेट एरीया गृहीत धरण्यांत आहे.प्रत्यक्ष बाजारात दुकानांच्या कारपेट एरीया व्यतिरिक्त किमान २०% अतिरिक्त क्षेत्र गृहीत धरुन त्याप्रमाणे आलेल्या क्षेत्रांवर दर लावण्यात येतो.

३.मनपाने तयार केलेला प्लॅन हा मार्गदर्शक नकाशा असून आदर्श पध्दतीने बनवलेला आहे.प्रत्यक्ष अंमलबजावणी करतांना या नकाशांची वाणिज्य क्षमता वाढवणेसाठी बी.ओ.टी ठेकेदार त्यात काही बदल करु शकतील त्यायोगे प्रत्यक्ष विक्रीखालील क्षेत्र १५% पर्यंत वाढू शकते.

या तीन निकषांबाबत फोर्ट ट्रेसची धारणा अयोग्य असल्याने हा प्रकल्प आर्थिकदृष्टया व्यवहार्य ठरत नाही. त्यादृष्टीने या बी.ओ.टी प्रकल्पातून खालीलप्रमाणे सुधारणा दुरुस्ती होणे आवश्यक आहे.

१.प्रकल्पातील दुकाने व कार्यालयाचे दर खालीलप्रमाणे गृहीत धरणे आवश्यक आहे.

अ ) खालचा तळ मजला (Lower ground floor ) रुपये ३०००/- प्र.चौ.फुट

ब ) वरचा तळ मजला (upper ground floor) रुपये ४०००/- प्र.चौ.फुट

क ) पहिला मजला (First floor) रुपये १८००/- प्र.चौ.फुट

ड ) दुसरा मजला ( Second floor) रुपये १५००/- प्र.चौ.फुट

२.प्रत्यक्ष विक्रीखालील क्षेत्र,कारपेट एरीया +२०% असे गृहीत धरणे आवश्यक आहे.त्यानुसार प्रत्यक्ष विक्रीखाली सुधारीत क्षेत्र खालीलप्रमाणे येते.

अ ) खालचा तळ मजला ५५०७ चौ.फुट

ब ) वरचा तळ मजला ७७८५ चौ.फुट

क ) पहिला मजला ८६२० चौ.फुट

ड ) दुसरा मजला ४३४८ चौ.फुट

३.बी.ओ.टी विकासकास मागदर्शक नकाशांच्या अधीन राहून वाणीज्य क्षेत्र वाढविण्याचे म्हणजेच बांधकाम नकाशाचे सुधारीत नकाशाचे करण्याचे स्वातंत्र्य दिल्यास विकासक किमान १५% वाणीज्य क्षेत्रात वाढ करु करु शकतो. (उदा - बाल्कनीस व दुकानाचे क्षेत्र इत्यादी ) तरी जमा बाजूसाठी वाढ १०% पर्यंत गृहीत धरण्यास हरकत नाही.

वरील निष्कर्षाच्या आधारे या प्रकल्पाचा जमा खर्च खालीलप्रमाणे येईल.

खर्च बाजू.

एकूण बांधकामाचे खर्च ६५६२८ चौ.फुट

बांधकामाचा दर रुपये ६३२ प्रति चौ.फुट

एकूण खर्च रुपये ४.१५ कोटी रुपये

बी.ओ.टी विकासाचा नफा एकूण खर्चाच्या २५%

४.१५ X ०.२५ = १.०३७५ कोटी

बाजारातील किमतीचा चढ उतार विकासाचा गुंतवणूक इत्यादीसाठी १०% अतिरिक्त खर्च

४.१५ X .१ = ०.४१५ कोटी

एकूण खर्च (विकासाचा नफा व इतर खर्च धरुन )

४.१५ + १.०३७५+ ०.४१५ = ५.६०२५ कोटी

- जमा बाजू -

विकासकाचा खालचा + वरचा तळमजला पहिला मजला व दुसरा मजला देणे अपेक्षीत आहे.त्याचे एकूण क्षेत्रफळ ३७७१७ चौ.फुट इतके असले तरी प्रत्यक्ष विक्रीसाठी २६२५८ चौ.फुट इतके क्षेत्र उपलब्ध होईल.त्यातून विकासकास खालीलप्रमाणे उत्पन्न मिळणे अपेक्षीत आहे.

| अ.क्र | मजला | दर | क्षेत्र | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | खालचा तळमजला | ३०००/- प्र.चौ.फुट | ५५०६ चौ.फुट | १,६५,१८,०००/- |
| २ | वरचा तळ मजला | ४०००/- प्र.चौ.फुट | ७७८५ चौ.फुट | ३,११,४०,०००/- |
| ३ | पहिला मजला | १८००/- प्र.चौ.फुट | ८६१९ चौ.फुट | १,५५,१४,२००/- |
| ४ | दुसरा मजला | १५००/- प्र.चौ.फुट | ४३४८ चौ.फुट | ६५,२२,०००/- |
| | | | | ६,९६,९४,२००/- |
| | बी.ओ.टी विकासकास नियोजनात स्वातंत्र्य दिल्याने वाणीज्य क्षेत्रात होणारे १०% वाढ | | | ६९,६९,४२०/- |
| | एकूण रुपये जमा | | | ७,६६,६३,६२०/- |

प्रकल्पातून होणार निव्वळ फायदा

| एकूण जमा | एकूण खर्च | फायदा |
|---|---|---|
| ७,६६,६३,६२०/- | ५,६०,२५,०००/- | २,०६,३८,६२०/- |

वरीलप्रमाणे विवेचन विचारात घेता या प्रकल्पात बी.ओ.टी विकासकांनी मनपास तिसरा ,चौथा व पाचवा मजला बांधून देणे व रुपये २ कोटी इतका प्रिमीयम देणे योग्य ठरते.

महानगरपालिकेचा प्रत्यक्ष फायदा

१.तिसरा,चौथा व पाचवा मजला हे २७९१० चौ.फुट क्षेत्राचे बांधकाम विनामुल्य मिळेल त्याची किंमत २७९१०X ६३२ = १,७६,३९,१२०

बी.ओ.टी विकासकाकडून मिळणारा प्रिमीयम रुपये २ कोटी

महानगरपालिकेस मिळणारे एकूण उत्पन्न रुपये ३.७६ कोटी

पडताळा (Cheak)

वर नमुद केल्याप्रमाणे जमिनीचे किंमत सुमारे रुपये ४.२५ कोटी इतके आहे.व प्रकल्पातून मिळणारे एकूण उत्पन्न ३.७६ कोटी इतके आहे.(फोर्ट ट्रेसने हेच उत्पन्न १०१ लक्ष इतके दर्शविले आहे.) या उत्पन्नशिवाय इतर नेहमीच्या वार्षीक उत्पन्नात देखील वाढ होणार आहे.(उदा -- घरपटटी / दुकान / गाळयांचे नाममात्र भाडे )

सबब वरीलप्रमाणे विवेचन विचारात घेता बी.ओ.टी विकासकास बांधकाम आराखडयाच्या नियोजनास स्वातंत्र्य देवून मजला क्र.३,४,व ५ विनामुल्य बांधून देण्याच्या अटीवर तसेच किमान देकार रक्कम रुपये २ कोटी इतकी देवून हा प्रकल्प बी.ओ.टी तत्वावर विकसीत करणेस हरकत नाही.असे माझे मत आहे.आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन केले.फोर्ट ट्रेस या कंपनीने बी.ओ.टी प्रस्तावातील खर्चाचे बांधकामाचे अंदाजे मनपाचे आर्थीक हिताचे नाहीत.त्याचप्रमाणे मनपाचे नगररचनाकार यांनी बांधकाम खर्च ,जागेची किंमत एकूण बी.ओ.टी प्रस्तावातून मनपास मिळणारे उत्पन्न या बाबी संयुक्तीक आणि वाजवी वाटतात.त्यामुळे नगररचनाकारांचे उपरोक्त कार्यालयीन टिपणीतील मुल्यांकन आणि खर्चाचे अंदाजास मान्यता देवून इतर प्रस्तावीत विहीत अटी शर्तीचे अधिन बेग पटांगणचे व्यापारी संकुल व कार्यालयीन कक्षाचे बी.ओ.टी प्रस्तावानुसार खुल्या निविदा मागविणेस हरकत नाही.

अशाबाबतचा ऑफीस रिपोर्ट मा.उपायुक्त (सामान्य ),मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह व नगररचनाकार यांचे फेर सादर रिपोर्टासह पुढील निर्णयास्तव मा.सर्व साधारण सभेपुढे ठेविला.

चर्चा --

स्क ीमची संपुर्ण फिल्म डेमो स्क्रीनवर दाखविण्यांत आली. स्कीमची पुर्ण माहिती श्री.कुलकर्णी नगर अभियंता यांनी दिली. १०० सदस्यांची कॅपॅसिटी.

श्री.आगरकर - लिफ्ट कॅपॅसिटी किती खाते प्रमुखांना बसण्याची व्यवस्था आहे काय ? पत्रकारांनाही जागा ठेवावी.

श्री.दिप चव्हाण - जागा किती आहे. ३०७२ चौ.मी. बाजारभाव ४ कोटी २५ लाख आहे.यामध्ये महानगरपालिकेला फक्त ३,४ व ५ व्या मजल्यावर २८ गुंठे जागा मिळते त्यासाठी १ कोटी ६५ लक्ष खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे खाजगी न देता महानगरपालिकेने बांधकाम करावे. ८ कोटी कर्ज घेवुन बांधकाम करावे. बी.ओ.टी.वर दिल्यास उत्पन्न बिल्डरला मिळेल महानगरपालिकेस फायदा होणार नाही. बी.ओ.टी. स विरोध.

श्री.गंधे - फोरस्ट्रेटचे कोणी आले आहे काय ? बेग पटांगणाच्या उभारणीत फोरस्ट्रेट या मुंबईच्या कंपनीने महानगरपालिकेस मिळणारी रक्कम १ कोटी रूपये दाखविली आहे. तर नगर रचनाकाराने ती ४ कोटी इतकी दाखविली आहे, फोरस्ट्रेट यांनी त्यांनी चुकीची माहिती दिल्याने त्यांची नेमणूक रद्द करावी. नगररचनाकार यांनी चांगली माहिती दिली. सदर प्रस्ताव फायदेशीर दिसत असल्याने बी.ओ.टी. च्या धर्तीवर मंजूर करावा.

श्री.कुलकर्णी , सभापती, स्थायी समिती - श्री.गंधे यांच्या प्रस्तावास अनुमोदन.

श्री.घुले - बेग पटांगणाची जागा कोर्ट केस मधुन सुप्रिम पर्यंत गेली होती. मुंबईच्या कंपनीने चुकीची माहिती दिली. व धोंगडे यांनी चांगली माहिती दिली. नगररचनाकार यांनी दिलेल्या अहवाला प्रमाणे कारवाई करावी. प्रस्ताव मंजूर करावा व गॅरेज, नेहरुमार्केट या ठिकाणी बी.ओ.टी. या तत्वावर अंमलात आणावे.

श्री.पवार - महानगरपालिकेने स्वतः प्रोजेक्ट राबवावा दुस-या एजन्सीला काम देवु नये. गाळयाचे ५ ते ६ लक्ष दरमहा भाडे मिळु शकते. ठेकेदारीस विरोध.

श्री.कावरे - महानगरपालिकेने बांधकाम करावे बी.ओ.टी. वर देवु नये.

श्री.कृष्णा जाधव - कावरेंनी दिलेल्या प्रस्तावास अनुमोदन, महानगरपालिकेने बांधकाम करावे.

मा.श्री.दिप चव्हाण -- जी कंपनी नेमली त्यांनी दिलेला अहवाला पाहता ही कंपनी बोगस आहे. बी.ओ.टी.करत असतांना नगरपरिषदेची परिस्थिती कुमकुवत होती. खर्च फक्त २-५० कोटी पर्यंत जाणार. २० एकर जागा वाडीया पार्कची जागा दिली. आपण तर वाडीयापार्क बांधायला निघालो मग हे का नाही बांधु शकत. मग या प्रोजेक्टचा महानगरपालिकेला किती फायदा होणार. किती भाडे मिळणार.

मा.आयुक्त -- त्य ाला जे मजले देणार त्याची मालकी होणार.

मा.श्री.दिप चव्हाण -- ४ मजले आपल्याला फायदा कमी होणार.एवढी मोठी प्रॉपर्टी माती मोलमध्ये देणार. आपली ऐपत नाही का ? हीच प्रॉपर्टी गहाण ठेवली तर आपणच इमारत बांधुन आपण भाडे तत्वावर भाडयाने देवु शकतो. आपण का करू शकत नाही. भाडे तत्वावर इमारत बांधा, संस्थेचे उत्पन्न घटवता याची नोंद घ्या. ( बी.ओ.टी. -- विरोध )

मा.श्री.गंधे -- ज्याला नेमले आहे तो आपला किती घात करणार आहे, याची कल्पना करा. त्यास टर्मिनेट करावे. डिपार्टमेंटली होणार नाही. मंजुर करावा.

कुलकर्णी -- अनुमोदन

मा.श्री.घुले -- अनेक मते मांडली, बेग पटांगण शाळेसाठी आरक्षित होती. परंतु आपण जी जागा मिळवली ज्या पध्दतीने आर्थिक नुकसान दर्शविले सदर टी.पी.चा अभिप्राय पाहता संस्थेचे हित आहे. तेथे एक पीर आहे, त्यासही जागा सोडावी. टी.पी.रिपोर्ट मंजुर करावा. वाडीया पार्क नपाचे हातुन झाले नसते. पण नगरचे एक नाव झाले आहे. वास्तु चांगली उभी राहीली. घरपट्टीचे उत्पन्नातही वाढ होईल. गॅरेज, गाडगीळ पटांगण, नेहरू मार्केट येथेही असे प्रस्ताव तयार करा.

भविष्यात नगरसेवक वाढतील याचाही विचार करावा.

मा.श्री.पवार -- बेग पटांगण मध्यवर्ती ठिकाण आहे. चौकात आहे. उत्पन्नाचे स्त्रोत जळगाव पाहता आपले कमी आहे. उत्पन्नाचे स्त्रोत कमी आणि सर्वच जागा बी.ओ.टी.वर दिल्यास उत्पन्न बुडेल. बाहेरची व्यक्ती रक्कम कमावुन निघुन जाईल. मनपाने हा प्रोजेक्ट स्वतः राबवावा. बी.ओ.टी.ला विरोध.

मा.श्री.कावरे -- जे काही पाहिले तर वाटते हे आपणच बांधावे . कर्ज काढुन बांधावे. बो.ओ.टी.वर नको. विरोध.

भाउ‍ जाधव -- कावरे यांना अनुमोदन ठरावास विरोध.

मा.श्री.सुळ :-- प्रशासनाचे म्हणणे काय .

मा.आयुक्त -- तो तयार नाही हा आपला प्रस्ताव आहे. टेंडर निघणार आहे. क्वॉलिटी पाहिजे. मी फक्त प्रस्ताव दिला. ठराव आपण करावयाचा आहे. चांगली किंमत असेल तर बी.ओ.टी.करणेस हरकत नाही.

मा.श्री.आगरकर -- अनेक मतप्रवाह असु शकतात. लोकशाहीचे लक्षण. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढ , फायदा तोटा पाहता गेल्या ब-याच वर्षानंतर एखादी वास्तु होत आहे. केवळ बी.ओ.टी. कि स्वतः

करायचे . बी.ओ.टी.वर का करावे तर थोडा फार इतिहास पाहिला तर ८ आय.डी.एस.एम.टी. चे प्रस्ताव केले होते. एकही झालेला नाही. काहीही असो, कोणतेही काम असो, पाण्याच्या टाकीचा प्रश्न सोडवु शकलो नाही, रस्ते करू शकलो नाही, भुयारी गटर योजना करू शकलो नाही. पवन उर्जा प्रकल्पासाठी कर्ज काढले असते तर जास्त फायदा महानगरपालिकेस झाला असता. घनकचरा संदर्भातही निर्णय घ्यावा लागेल. अनेक शाळा मोकळया पडल्यात. मटन मार्केट मोकळे आहे. ही जबाबदारी महानगरपालिकेस पेलवेल का, मोठे वैभव उभे रहात असेल तर बी.ओ.टी.प्रस्तावास मंजुरी आहे.

( यानंतर सभागृहात गोंधळ निर्माण झाला. )

मा.श्री.दिप चव्हाण -- सभ ा गृहात चांगलेच मुद्दे मांडले पण झाले का नाही हे आधी पहा.

मा.श्री.घुले -- राजकारण न आणता सर्वांनी मंजुरी द्यावी.

मा.श्री.शेळके -- मवासी साहेब मुख्याधिकारी असतांना त्यांनी व आम्ही अध्यक्ष असतांना याकामी बरेच प्रयत्न केले म्हणुन त्यांचा सत्कार करावा.

श्री.सुळ -- ऑफीसचा प्रस्ताव काय आहे.

मा.आयुक्त -- बी ओ टी वर महानगरपालिकेचा फायदा होईल.तांत्रीक कर्मचारी आपल्याकडे नाही.इतरही प्रकल्प कर्ज घेवून करावे लागतील.त्यामुळे हा प्रस्ताव बी.ओ.टी साठी चांगला आहे.

श्री.आगरकर -- योजनेमुळे महानगरपालिकेस फायदा झाला पाहीजे.बीओ टी पाण्याच्या टाक्या बांधू शकत नाही.२००१ नंतर डी.एस.एम.टी चा एकही प्रकल्प पुर्ण झाला नाही.पवनउर्जा प्रकल्पही झाला नाही.हे प्रोजेक्ट पुर्ण होवू शकले नाही.श्री.दिप चव्हाण यांचीच अद्यायावत सभागृह व कार्यालय असावे अशी इच्छा होती.महानगरपालिकेकडून प्रकल्प पुर्ण होणे शक्य नाही त्यामुळे बी ओ टी वर हा प्रकल्प करावा.

श्री.घुले -- महाराष्ट्र शासनही रस्ते व इ. बी.ओ.टी वर काम करते.त्यामुळे बी.ओ.टी चा ठराव एकमताने मंजूर करावा.मवासी साहेब यांचे अभिनंदन करावे.

महापौर - निर्णय बी.ओ.टी वर करण्यांस मंजुरी. मते मांडली चांगली. उत्पन्नातही भर पडणार आहे. बी.ओ.टी.ला मंजुरी . मवासी साहेब यांचे अभिनंदन.

**ठराव** -- ऑफीस रिपोर्टावर सांगोपांग चर्चा होवून असे ठरविण्यात आले की,महानगरपालिकेच्या मालकीचे सि.स.नं ५१६१ अ / ७ अ / १ (बेग पटांगण ) येथे BOT तत्वावर व्यापारी संकुल उभारल्यास महानगरपालिकेचे उत्पन्नात भर पडेल.तसेच अहमदनगर शहरास एक वैभव प्राप्त होईल.तरी सदर प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे.खर्च मंजूर.नियमानुसार कार्यवाही करावी

मात्र या ठरावास श्री.दिप चव्हाण ,श्री.पवार ,श्री.कावरे,श्री.कृष्णा जाधव यांचा विरोध

ठराव बहुमताने मंजूर.

सुचक -- मा.श्री.अभय आगरकर ,

अनुमोदक -- मा.श्री.शंकरराव घुले ,

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ६ दि.१७-५-२००६.

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर शहरामध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा मार्फत एकात्मिक रस्ते विकास योजना राबविणे बाबत तसेच विषयांकित रस्ते केंद्र सरकारच्या लहान व मध्यम शहरांकरीता पायाभुत सुविधा विकास योजना २००५ मार्फत आधुनिक पध्दतीने काँक्रिटीकरण व सुशोभिकरण करणे या दोन्हींपैकी एक पर्यायास मंजुरी मिळणें बाबत ऑफिस रिपोर्ट.

--*--

प्रस्तावाचा मजकूर - दि.३१-१-२००६ रोजी मा.सभेपुढे खालील ४ रस्त्यांचे आधुनिक पध्दतीने काँक्रीटीकरण व सुशोभिकरण करणेबाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवणेत आला होता.

१) सक्कर चौकातील हॉटेल यश पॅलेस ते कोठी

२) बालिकाश्रम कोपरा ते भुतकरवाडी ते सावेडी गांवठाण ते मनमाड रस्त्यापर्यंत (बालिकाश्रम रोड)

३) अमरधाम कोपरा (नेप्ती नाका चौक) ते दिल्लीगेट, लालटाकी, अप्पु चौक

४) कुष्ठधाम चौक ते पारिजात कॉर्नर ते औरंगाबाद रोड रस्ता (गुलमोहर रोड)

महासभेत झालेल्या चर्चेनुसार व सभागृहाचा कल पाहता सदरचा प्रस्ताव त्या परिस्थितीमध्ये रद्द करणेत आला. तद्नंतर सन्माननीय सदस्य मा.श्री.आसारामजी कावरे यांनी दि.१०-२-२००६ तसेच ८-३-२००६ रोजी पत्र देउन सदरचा प्रस्ताव परत एकदा महासभेसमोर चर्चेस घेण्याचे सुचविले अन्यथा उपोषणाचा मार्ग अवलंबण्याचे पत्राद्वारे सुचित केले.

यासंबंधीचा नियम तपासला असता ( महानगरपालिका सभा कामकाज नियम (र) अन्वये ) असे निदर्शनास आले की, एकदा फेटाळलेला गेलेला प्रस्ताव मा.सभेमध्ये ३ महिन्याचे आत चर्चेस घेता येत नाही. तथापी १/२ सदस्य जर सदर प्रस्ताव महासभेपुढे चर्चेस घेण्यास उत्सुक असतील तर व संयुक्तिक कारण असेल तर एकदा फेटाळलेला गेलेला प्रस्ताव महासभेपुढे चर्चेस घेणे शक्य असते. त्याप्रमाणे महासभेपुढे सदर प्रस्ताव विचारार्थ ठेवणेत येत आहे.

मा.सदस्य श्री.आसारामजी कावरे यांच्या पत्रानुसार मा.आयुक्त यांना अहवाल सादर केला असता त्यावर मा.आयुक्त यांनी खालीलप्रमाणे टिप्पणी केली. " नामंजूर ठराव झालेला आहे. नियमानुसार फेर सादर करा. केंद्राच्या Urban Infrastructare For Development Scheme for small & mediom town चे तरतुदीनुसार तपासून सादर करा. " त्याप्रमाणे मा.सभेपुढे खालीलप्रमाणे दोन प्रस्ताव विचारार्थ सादर करण्यात येत आहे. सदर प्रस्ताव मा.सभेपुढे ठेवण्याचा ४५ सदस्यांचा आग्रह आहे. तसेच अहमदनगर शहराच्या विकास व जनतेच्या मुलभुत तसेच पायाभुत सुविधांसाठी सदर कामे होणे अत्यंत आवश्यक आहे.

१) विषयांकित ४ रस्ते महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत हाती घेणे....

या कामासाठी अंदाजे १५ कोटी इतका खर्च येणार आहे. सदर निधी कर्जरुपाने उभा करावा लागणार आहे. त्याचप्रमाणे सदर रस्त्यांवरची अतिक्रमणे हटविणे, ड्रेनेज लाईन हलविणे, पाण्याच्या लाईन्स हलविणे, ओएफसी किंवा टेलीफोनच्या इतर लाईन हलविणे, झाडे तोडणे, गटर्स हलविणे इत्यादी बाबी महापालिकेमार्फत कराव्या लागणार आहेत. रस्त्यांची एकूण लांबी ९ कि.मी. असून वरील सर्व कामे करण्यासाठी अंदाजे १० कोटी इतका खर्च येउ शकेल. या खर्चाची तरतुद महापालिकेच्या अर्थसंकल्पात करावी लागेल. किंवा १५ कोटी कर्ज महापालिका काढणार आहे त्यात वाढ करावी लागणार आहे.

२) केंद्र सरकारने लहान व मध्यम शहरांकरीता पायाभुत सुविधा विकास योजना २००५ ही योजना सुरु केलेली आहे. सदर योजना २००५-२००६ सालापासून पुढे ७ वर्ष राबविली जाणार आहे. २००१ सालची जनगणना ही योजनेसाठी गृहीत धरली जाणार आहे. मुख्यत्वेकरुन या योजनेचे धोरण लहान मध्यम शहरांच्या एकत्रीत पायाभुत सुविधांचा विकास करणे व जनतेला आवश्यक असणा-या सुविधा पुरविणे हे आहे. राज्य शासनाच्या नागरी लोकसंख्येवर (२००१ ची जनगणना) सदर योजना राबविली जाणार आहे. त्यामध्ये एक निकष असा आहे की, ज्या स्थानिक संस्थामध्ये निवडणूक होउन लोकनियुक्त प्रतिनिधींच्या हाती कारभार आहे. अशाच ठिकाणी ही योजना राबविता येईल. त्याचप्रमाणे अस्तित्वातील रस्त्यांचा दर्जा वाढविणे किंवा नवीन रस्त्यांची बांधणी करणे या योजनेमार्फत करणे शक्य आहे.

एकूण येणा-या खर्चाचा वाटा उचलता येईल.

| | |
|---|---|
| केंद्र शासन - | ८०% |
| राज्य शासन - | १०% |
| स्थानिक संस्था - | १०% |

स्थानिक संस्था सदर १०% रक्कम फक्त उभी करणार असल्याने ते सहज शक्य होउ शकते. आणि त्यास पुरेसा कालावधी देखील मिळणार आहे. आणि सदर योजना ही राज्य पातळीवरील संस्थेकडून (जसे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ / सार्वजनिक बांधकाम विभाग) अंमलात आणले जाउ शकते.

निधीचे वितरण केंद्र शासन टप्याटप्याने करणार आहे. या निधीव्यतिरिक्त ५% निधी प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रशिक्षण, कार्यक्षमता वाढविणे व अदयावत तंत्रज्ञान अवगत करणे इत्यादी बाबींसाठी अतिरिक्त मिळु शकेल. राज्य शासन यासाठी सचिव नगरविकास खाते यांच्या अधिपत्याखाली समिती स्थापन करेल व त्या समितीकडे योजना मंजूर करुन राबविणे व केंद्र शासनाची मंजुरी घेणे इत्यादी अधिकार राहील.

महापालिकेमध्ये खालील प्रकारच्या सुधारणा योजना मंजूर होण्यासाठी आवश्यक असणा-या निकषांमध्ये बसविणेसाठी हाती घेण्यात आलेले आहेत.

१) डबल एन्ट्री सिस्टीम (लेख्यांकरिता)

२) संपूर्ण संगणकीकरण करणे.

३) करांची वसुली ८५% पर्यंत करणे.

केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्यामध्ये याबाबतचा कराराचा मसुदा [Memurandam of Aggrement] सविस्तर प्रकल्प अहवालासमवेत करावा लागेल. तसेच महानगरपालिका व राज्य पातळीवरील काम करणारी संस्था यांचेमध्ये देखील अशाच प्रकारचा करार करावा लागेल.

केंद्र शासनाची वरील योजना राबविताना एकूण किंमतीच्या फक्त १०% इतकाच निधी महानगरपालिकेस उभा करावा लागणार आहे. स्वतःच्या अर्थसंकल्पातून किंवा कर्जाउ देखील सदर निधी उभा करणे शक्य होईल.

वरील दोन प्रस्ताव महासभेपुढे मंजुरीसाठी ठेवणेसाठी व पुढील आदेशासाठी सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मुळ प्रस्तावावर फेरविचार करणेसाठी किंवा केंद्र शासनाच्या योजनेतुन उक्त कामे घेणे याबाबत धोरण ठरविण्यासाठी विषय मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यासाठी शिफारस आहे.

यावर मा.आयुक्त साहेब,यांचा अभिप्राय की, केंद्र शासनाचे मध्यम व लहान शहरासाठी नागरी विकास योजना ( UIDSSMT) अंतर्गत शहरातील प्रस्तावित ४ रस्ते तसेच इतर महत्वाचे रस्तेंचा विकास करणे संयुक्तीक वाटते. यासाठी महानगरपालिकेस मोठा आर्थिक बोजा पडणांर नाही. केंद्र शासनाचे योजनेतुन रस्ते विकास करणेचे प्रस्तावाशी सहमत.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सा.) व मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

चर्चा --

मा.श्री.कावरे :-नगर शहराचा म्हणावा असा विकास झालेला नाही. त्यामुळेच नगर शहराला एक मोठे खेडे म्हटले जाते. शहराचा विकास हा तेथील रस्त्यांवर अवलंबुन असतो. जर शहरातील रस्ते मोठे व चांगल्या प्रतीचे असतील तर दळणवळण मोठया प्रमाणात वाढुन शहराचा दर्जा सुधारण्यांस मदत होते.

याकरिताच शहरातील महत्वाचे ४ रस्ते महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा मार्फत कॉक्रीटीकरण करुन घेणेबाबतचा विषय दिनांक ३१/१/२००६ चे महासभेपुढे घेण्यांत आला होता. परंतु सदर सभेमध्ये हा विषय फेटाळण्यांत आला.

बालिकाश्रम रोड, गुलमोहोर रोड, अमरधाम ते अप्पू चौक लालटाकी व यश पॅलेस ते कोठी रोड हे ४ रस्ते शहरातील महत्वाचे रस्ते आहेत. या ४ रस्त्यांची एकूण लांबी ९ कि.मी. आहे. प्रत्येकी १ कि.मी. रस्त्यास रु.१३.५० लाख खर्च येणार आहे व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास सुपरव्हीजन चार्जेस पोटी १० % रक्कम द्यावी लागणार आहे. याबाबतचा अंदाजे रु.१५ कोटीचा प्रस्ताव आहे. याव्यतिरिक्त रस्ते कॉक्रीटीकरण करणे आधी ड्रेनेज लाईन, पाईप लाईन, टेलीफोन केबल टाकणे, इलेक्ट्रीक पोल हलविणे यासारख्या इतर कामांसाठी अंदाजे रु. १० कोटी खर्च येणार आहे.

सदरचे रस्ते हे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून करुन घेणेच योग्य होईल. कारण त्यांच्याकडूनच रस्ते चांगल्या प्रतीचे होउ शकतील कारण त्यांच्याकडे मोठमोठ्या मशिनरी, टेकनिक आहे. त्यामुळे ते नवीन अद्ययावत तंत्रज्ञान वापरु शकतात. त्यांच्याकडे स्टाफ मोठया प्रमाणात असतो. मटेरियल वाहुन नेणा-या गाडया मोठया असतात. ते तांत्रिक दृष्टया चांगले काम करतात. तसेच हे महामंडळ जागतिक पातळीवरील (ग्लोबल) टेंडर काढु शकते. यामध्ये विविध मोठया कंपन्या येतात. अशा प्रकारे काम करणारे ठेकेदार नगरमध्ये कोणीही नाही. महामंडळा

मार्फत रस्ते केल्यास त्यात मोठया एजन्सी येउ्‌ शकतात. उदा :- मुंबई मध्ये फ्लायओव्हरचे काम अशाच एजन्सी मार्फत चालु आहे. याकरिता हे रस्ते महामंडळा मार्फतच करुन घ्यावेत. त्यापोटी त्यांना सुपरव्हीजन चार्जेस द्यावे लागणार आहे. आमदार, खासदार निधी अंतर्गत होणारी कामे पी.डब्ल्यु.डी. कडुन केली तरी ते सुध्दा सुपरव्हीजन चार्जेस घेतात.

याला दुसरा पर्याय म्हणजे केंद्र शासनाचे नवीन योजनेनुसार केंद्र शासन ८० % अनुदान देते. राज्य शासन १० % अनुदान देते. व उर्वरित १० % रक्कम ही महानगरपालिकेला उभी करावी लागणार आहे. या केंद्र शासनाचे योजनेअंतर्गत सुध्दा सदरचे रस्ते करता येउ्‌ शकतील.

अहमदनगर शहराचा दर्जा सुधारण्याचे दृष्टीने व विकास होणेकरीता सदरचा विषय मंजूर होणे अत्यंत आवश्यक आहे.

मा.श्री.गंधे -- ४ रस्ते ऐवजी सगळेच रस्ते प्रशासनाने ठेवलेत. केंद्रशासनाकडुन निधी घेवुन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडुन रस्ते करण्यात यावेत.

मा.श्री.कावरे -- योजना चांगली आहे. महानगरपालिकेचे रस्ते चांगले होतील. महानगरपालिकेचा दर्जा सुधारेल. हा विषय मंजुर करावा. निधी उभारावयाचा तो उभारावा. त्यासाठी खासदार आमदारची मदत घ्यावी.

मा.आयुक्त -- १०० कोटी पर्यंतची कामे घेता येतील.

मा.श्री.पवार -- १० % पैसे भरावयाचे आहेत.

मा.आयुक्त -- आपण भरावे लागणार आहे.

श्री.गंधे -- ५० टक्के केंद्र ,१० टक्के महाराष्ट्र व १० टक्के महानगरपालिकेचा वाटा असल्यास विरोध असल्याचे कारण नाही.रस्ते महामंडळामार्फत सर्व रस्ते करुन घ्यावेत.

श्री.कावरे -- नगर हे मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राचे प्रवेशद्वार आहे.परंतू शहराचा विकास झाला नाही.प्रस्तावाप्रमाणे कॉक्रीटचे रस्ते एम.एस.आर.डी.सी यांचेमार्फत करुन घ्यावेत.

मा.महापौर -- केंद्र सरकारकडून एम.एस.आर.डी.सी अंतर्गत येणा-या निधीमधून रस्त्यांची कामे करण्यांस मंजूरी देण्यात येत आहे.

**ठराव** -- अहवालानुसार प्रस्तावातील व अनुषांगीक कामे UIDSSMT योजनेत प्रस्तावीत करुन मंजूरीनंतर अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाकडे देण्यात यावीत.
ऑफीस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.नियमानुसार कार्यवाही करावी.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक -- मा.श्री.आसाराम कावरे,
अनुमोदक -- मा.श्री.मिलींद गंधे ,

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ७ दि.१७-५-२००६.

••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर शहराच्या वाढीव हद्दीची प्रारूप विकास योजना प्रसिध्द करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**--*--**

प्रस्तावाचा मजकूर - अहमदनगर शहराच्या तत्कालीन नगरपरिषदेची हद्दवाढ दिनांक १/७/९९ पासुन अंमलात आलेली आहे. या नविन हद्दवाढीचे क्षेत्र ६०३४ हेक्टर इतके आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २१ अन्वये अनिवार्य असल्याने सदर हद्दवाढ क्षेत्रासाठी विकास योजना तयार करण्याचा इरादा तत्कालीन नगरपालिकेने जाहीर केला. त्या अनुषंगाने ती विकास योजना तयार करण्यांसाठी दिनांक १/८/२००० पासुन विशेष घटकाची स्थापना करण्यांत आली. या विशेष घटकाने प्रथम या संपुर्ण भुभागाचे सर्व्हेक्षण करुन विद्यमान जमीन वापर नकाशे तयार केले. व ते महानगरपालिकेस दिनांक ५/९/२००२ रोजी हस्तांतरीत केले त्यानंतर नियोजना संदर्भी सर्व योजनेचे निकष लावुन या संपुर्ण हद्दवाढ क्षेत्रासाठी प्रस्तावित जमीन वापर नकाशा म्हणजेच विकास योजना तयार करण्यांत आली. या विकास योजनेची वैशिष्टये खालील प्रमाणे संक्षिप्त स्वरुपात देत आहे.

१. ही विकास योजना तयार करतांना हद्दवाढ क्षेत्रातील पुढील दहा (१०) व वीस (२०) वर्षांची लोकसंख्या प्रथम प्रक्षेपीत करण्यांत आली. त्याअनुषंगाने आरक्षण प्रस्तावासाठी सन २०२० मधील १ लाख ८० हजार इतकी तर झोनिंगच्या प्रस्तावासाठी २०३० ची २ लाख ५० हजार इतकी लोकसंख्या निश्चित करण्यांत आलेली आहे. विकास योजनेतील नियोजन प्रस्ताव या लोकसंख्येवर आधारलेले आहेत.

२. वर नमुद केल्या प्रमाणे विद्यमान जमीन वापराच्या सर्व्हेक्षणात या भागात प्राथमिक शाळा, दवाखाने, खेळांची मैदाने, भाजी मंडई इत्यादी नागरी सुविधा उपलब्ध नसल्याचे आढळले. सर्व हमरस्त्यावर अनाधिकृत टप-या व इतर बांधकामे असल्याने वाहतुकीचा प्रश्न बिकट आहे तसेच एकुण रस्त्यांची रचना अपुरी व अयोग्य आहे.

३. सदर विकास योजनेत मुद्दा क्रमांक २ मध्ये नमुद केलेल्या उणिवा विचारात घेवुन तसेच शासनाने सुचित केलेल्या नियोजन प्रमाणकांच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे नियोजन करण्यांत आलेले आहे. त्याची ठळक वैशिष्टये खालील प्रमाणे आहेत.

अ) नियोजनाच्या दृष्टीने या क्षेत्राचे चार नियोजन प्रभाग पाडण्यांत आलेले आहेत.

ब) रस्त्यांची रचना रेडीयल पॅटर्न या पध्दतीची असुन या रस्त्यांच्या जाळयांमुळे शहरातील सर्व प्रमुख महामार्ग व इतर हमरस्ते एकमेकांना जोडले जाणार आहेत. तसेच एकुण सर्व क्षेत्र रस्त्यांच्या जाळयांनी एकमेकांना जोडले जाईल.

क) आवश्यकते नुसार सर्व क्षेत्रांचे झोनिंग करुन या क्षेत्रात विविध वापर उदा. - रहिवास विभाग, औद्योगिक विभाग, हरित पट्टा इत्यादी दर्शविण्यांत आले आहे.

ड) ही विकास योजना तयार करतांना शहरातील विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयांकडुन जागा मागण्यांचे प्रस्ताव मागविण्यांत आलेले होते. त्या शासकीय

विभागाकडुन असे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. त्यांचा अंतर्भाव विकास योजनेत करण्यांत आलेला आहे.

ई) नियोजन प्रमाणकानुसार या क्षेत्रात प्राथमिक शाळा, क्रिडांगणे, हॉस्पीटल, दुकान केंद्रे, बगिचा इत्यादी सुविधांसाठी प्रभाग निहाय आरक्षणे प्रस्तावित करण्यांत आलेली आहेत.

फ) आरोग्य सुविधेसाठी शहर स्तरीय सुविधा देण्याच्या दृष्टीकोनातुन काही ठिकाणी कचरा डेपोचे आरक्षण दर्शविण्यांत आलेले आहे. या शिवाय वाचनालय, वाहनतळ, बसस्टॅण्ड, कोंडवाडा इत्यादी शहरास आवश्यक असलेली आरक्षणे दर्शविण्यांत आलेले आहेत. तसेच शहरासाठी आवश्यक असलेले जकात नाके, ट्रक टर्मिनन्स, इत्यादी आरक्षणे दर्शविण्यांत आलेले आहेत. याशिवाय शहरात विविध ठिकाणी दफन भुमी व स्मशान भुमिची आरक्षणे दर्शविण्यांत आलेली आहेत.

ग) या विकास योजनेत एकुण आरक्षणांची संख्या सुमारे ३३० इतकी असुन त्यापैकी २५ बगिचे, ३२ क्रिडांगणे, २८ प्राथमिक शाळा, २२ माध्यमिक शाळा अशी आरक्षणे असुन इतर कारणांसाठी योग्य त्या प्रमाणात व संख्येने आरक्षणे दर्शविण्यांत आलेली आहेत.

४. सदर विकास योजना तयार करतांना या क्षेत्रासाठी शासनाने मंजूर केलेल्या परिघ क्षेत्र नकाशाचा विचार करण्यांत आलेला आहे. या परिघ क्षेत्र नकाशाशी सुसंगतता ठेवुन रस्त्यांची रचना व झोनिंग प्रस्तावित करण्यांत आलेले आहे.

५. या विकास योजनेत नविन नियोजन संकल्पना अंतर्भुत करण्यांत आलेली असुन त्यामुळे या क्षेत्रात विकास हक्क हस्तांतरण (T.D.R.) समावेशन आरक्षण धोरण (Accomodation Reserivation) इत्यादी संकल्पनांचा फायदा संबंधित जमीन धारक व नागरिक यांना मिळणार आहे. T.D.R. देण्याच्या दृष्टीकोनातून शहरातील या क्षेत्रांचे D.E.F. असे तीन भाग पाडण्यांत आलेले आहेत.

अशा रितीने मा.सहाय्यक संचालक, नगररचना, यांनी तयार केलेला विकास योजना आराखडा संदर्भीत पत्रान्वये मा.आयुक्त सोा यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी सादर केलेला आहे. या नकाशांचा एकुण ९ नकाशांचा संच आहे. तथापि या नकाशां बरोबर आवश्यक असलेल्या विकास योजना अहवाल (D.P.Report) अद्यापही सादर केलेला नाही. तो नजिकच्या दोन चार दिवसांत सादर करण्यांत येणार आहे. असे मा.सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांनी सांगितले आहे.

आता महानगरपालिका मार्फत खालील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम २६ (१) अन्वये उपरोक्त योजना प्रसिध्दी करणे. ही विकास योजना प्रसिध्दी करणेसाठी प्रथम सदरची विकास योजना मा.महासभेत मंजूरीसाठी सादर करणे आवश्यक आहे. सबब ही विकास योजना प्रसिध्दीसाठी मंजूरी करणे साठी तात्काळ मा.महासभेपुढे सादर करणे आवश्यक आहे.

२. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम २१ अन्वये हद्दवाढ क्षेत्राची विकास योजना दि.१/७/९९ पासुन तीन वर्षाच्या कालावधीत शासनास मंजूरीसाठी सादर करणे आवश्यक होते. तथापि विविध कारणांमुळे ती अद्यापपावेतो शासनास मंजुरीसाठी सादर केलेली नाही व त्यास अद्यापही काही कालावधी लागणार आहे. शासनाने या कलमाखाली दिनांक ३०/६/२००३ पर्यंत मुदतवाढ मंजूर केलेली आहे. या पुढील

आवश्यक असणारी कायदेशिर कार्यवाही विचारात घेता महानगरपालिका प्रशासक ठराव क्रमांक २७ दिनांक २५/८/२००३ अन्वये दिनांक ३०/६/२००४ पर्यंत मुदतवाढ अपेक्षिलेली आहे. तथापि अजुनही या कामासाठी (म्हणजेच विकास योजना शासनास सादर करण्यांसाठी ) एक वर्षाचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. ही मुदतवाढ मा.महासभेत मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. म्हणुन कलम २१ अन्वये दिनांक १/७/२००४ ते ३१ डिसेंबर २००६ पर्यंत मुदतवाढ मंजूर करण्याचा प्रस्ताव मा.महासभेस सादर करणे आवश्यक आहे.

३. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम २६ (१) अन्वये विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर केल्यापासुन दोन वर्षाच्या मुदतीत ही विकास योजना प्रसिध्द करणे आवश्यक असते. ही प्रसिध्दीकरणाची मुळ मुदत दिनांक ११/५/२००२ अशी होती. तथापि विकास योजना घटकाची स्थापनाच काहीशी उशिरा झाल्याने व इतर विविध कारणांसाठी ही विकास योजना मुळ मुदतीत प्रसिध्द होवु शकली नाही. शासनाने ही मुदत दिनांक १०/५/२००३ पर्यंत वाढवुन दिलेली आहे. व त्यापुढे मुदतवाढ मिळण्याचा ठराव महानगरपालिकेने पारित करुन तसा प्रस्ताव शासनास पाठविलाआहे. शासनाने मंजूर केलेली मुदतवाढ व महानगरपालिकेचा ठराव क्रमांक २७ दिनांक २५/८/२००३ चा विचार करता तसेच यापुढील प्रसिध्दी करणाचा कालावधी विचारात घेता कलम २६ अन्वये दिनांक ११/५/२००४ ते दिनांक १०/५/२००६ पर्यंत मुदतवाढ मागण्याचा प्रस्ताव मा.महासभे कडुन मंजूर होणे आहे.

सबब वरील प्रमाणे तीन प्रस्ताव मा.महासभेस मंजूरीसाठी तात्काळ सादर होणे आवश्यक आहे. पुढील आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, नगररचनाकार यांचेकडील प्रास्ताविक टिप्पणी प्रमाणे प्रस्ताव मंजूरीसाठी मा.महासभेपुढे ठेवणे योग्य.

यावर मा.प्रभारी आयुक्त यांचाअभिप्राय की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम २६ (१) व २१ विचारात घेता विषयांकित आराखडा त्वरीत महासभेपुढे ठेवुन नागरिकांसाठी प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तसेच अधिनियमातील तरतुदी नुसार आराखडया वरील कार्यवाहीसाठी अहवालानुसार मुदतवाढ मागणे् आवश्यक आहे. कार्यवाहीसाठी महासभेपुढे सादर.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर) व मा.प्रभारी आयुक्त यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

चर्चा --

डॉ.सत्रे -- नगरपालिका हद्यवाढ दिनांक १/७/९९ पासून झालेली आहे.३ वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक होते.शासनाने दिलेली मुदतवाढही संपलेली आहे.रिपोर्टातील कारणे संयुक्तीक नाहीत विविध कारणे स्पष्ट करावीत.

१. ठराव नंबर २७ दिनांक २७/३/०३ अन्वये.

२.१० वर्षाची लोकसंख्या का विचारात घेतली.

३.सविस्तर निश्चित केले.

४.टी डी आर झोनिंग केले काय

अहवालाची कॉपी सर्वांना देणे आवश्यक होते.

मा.आयुक्त यांचा खुलासा -- योजनेत सर्व बाबी नमुद आहे टिपणीमध्ये संक्षिप्त माहिती माहिती दिलेली आहे.

मा.आयुक्त साहेब -- तुम्ही विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे अहवालात आहेत तो सभागृहात मंजूर झाल्यानंतर सर्वांना मिळू शकेल.तुर्त नगररचना विभागात आहे.

श्री.गंधे -- अहवाल शहर सुधारणा समितीकडे दिला असता तर अनेक सुधारणाबाबत सुचना करता आल्या असत्या. आपण हा आराखडा लोकांना , संस्थांना पाहण्यांस ठेवला असता तर अभ्यास करता आला असता.

श्री.कृष्णा जाधव -- हा विषय एकमताने मंजूर करावा.६ वर्षानंतर योजना पुर्ण झाली आहे.

श्री.कावरे -- नकाशा व रिपोर्ट प्रसिध्द करावा.

श्री.आगरकर -- स्युअरेज प्लॅन्टसाठी जागा सोडली पाहीजे ती सोडली नाही.

श्री.धोंगडे ,नगररचनाकार --- स्युअरेज प्लॅन्टसाठी जागा सोडलेली पाहीजे ती सोडली नाही.तसे दाखवून शासनाकडे पाठवू शकतो.

श्री.वाकळे - ब्रिजच्या जवळ स.नं १३२ नागापुर स्युअरेज प्लॅन्ट सावेडी,बोल्हेगांव नागापुरसाठी ठेवावा.

श्री.शेळके -- स.नंबर १३२ पुर्वी ग्रीन झोन होताआता प्लॅनमध्ये रहिवास झोन दाखवला तेथे पुरनियंत्रण रेषा असून निश्चित झालेली नाही.

श्री.कानडे -- बोल्हेगांवमध्ये शाळा असूनही परत शाळेचे आरक्षण दर्शविले.

श्री.घुले -- परत सुचना हरकतीसह महासभेसमोर येईल.

श्री.दहे -- ६० दिवसात नागरीक व नगरसेवक सुचना व हरकती करु शकतात.

श्री.वाकळे -- हद्दवाढीतील रस्ते दर्शविल्याप्रमाणे होणार नाहीत

श्री.कानडे -- ३३० रिझर्वेशन दाखविलेले त्यामध्ये शॉपींग सेंटरचे जास्त दर्शविलेले आहे.

मा.आयुक्त -- ठराव झाला की प्रसिध्दी देणार इतिवृत्त कायम होणेसाठी थांबणार नाही.

सौ.वर्षा आरिफ --प्रस्ताव प्रसिध्दीस जावून हरकती घेता येणार आहेत त्यामुळे विषय मंजूर करावा.

मा.श्री.गंधे -- मा.श्री.कृ.द.जाधव -- ७ वर्ष झाली हा फक्त पब्लीश करावयाचा आहे. मंजुरीस आलेला नाही. आपले आर्थिक नुकसान होते. एकमताने मंजुर करावा.

मा.श्री.सुळ -- विषय ज्या पध्दतीने आला तो चुकीच्या पध्दतीने आला उशीर आला.

मा.श्री.चव्हाण -- ३ वेळा मुदतवाढ दिली होती.

मा.महापौर -- १२ गावची कामे करण्यासाठी एजन्सी नेमला त्याचे काम पुर्ण झाले आहे. तो आराखडा मंजुरीसाठी आहे. त्यास मंजुरी द्यावयाची आहे.

मा.श्री.घुले -- फक्त माहितीसाठी आहे.

मंजुर.

मा.श्री.कावरे -- प्रसिध्द करण्यात यावे.

मा.श्री.शेळके -- पुर नियंत्रण रेषा निश्चित नाही. ( सभागृहात गोंधळ निर्माण झाला.)

मा.श्री.गंधे -- हा प्लॅन खुला होता. सुचना आजही करता येतील.

मा.श्री.वाकळे -- बोल्हेगांव , नागापुर रस्ता नाही तो करावा.

मा.आयुक्त -- सुचना करा.

नगर रचनाकार -- सुचना आल्यास बदल करू शकतो.

मा.श्री.कानडे -- प्राथमिक शाळा ६४ / १ शाळेसाठी परत आरक्षण टाकले दुरूस्त करावे.

मा.श्री.घुले -- प्लॅन प्रसिध्दीसाठी देत आहोत. अंतिम मंजुरीसाठी लेखी सुचना देवु शकतात.

नगर रचनाकार -- ६० दिवसासाठी हरकतीसाठी कोणताही पार्ट प्लॅनला घेवु शकता.

मा.श्री.आगरकर -- नविन हद्यवाढीसाठी तयार केलेला नकाशा मंजुरीपुर्वी सुचना व हरकतीसाठी सर्व जनतेला प्रसिध्द करण्यात यावा. नविन नकाशा मुळे वाढीव हद्यीत सुधारणा करता येईल.

मा.श्री.वाकळे -- १२ रस्ते जादा दाखविले ते काम होईल का तेथे लेआउट पडलेत.

मा.आयुक्त -- हे नियोजन आहे, सुचविलेला प्रस्ताव आहे.

मा.श्री.कोतकर -- सुचना लेखी असाव्यात का ६० दिवसात हरकत नोंदावी.

मा.श्री.कानडे -- शॉपिंग कॉम्प्लेक्स २६ / ६ येथे शॉपिंग कॉम्प्लेक्स आरक्षण घ्यावे.

मा.श्री.वाकळे -- ज्या सुचना करू त्या प्रसिध्दी पुर्व विचारात घ्याव्यात.

मा.श्री.कृ.द.जाधव -- इतिवृत प्रसिध्द झाल्यावर देणार का ?

मा.आयुक्त -- इतिवृत्तासाठी थांबणार नाही.

श्री.दहे, नगर रचनाकार -- प्रसिध्दीपुर्वी हरकती सुचनांची दखल घेतली जाणार नाही.

मा.श्री.दिप चव्हाण -- प्रसिध्दीपुर्व सुचना करता येईल का

श्री.दहे, नगर रचनाकार -- प्रसिध्दीपुर्व कुठलीही सुचना विचारात घेतली जाणार नाही.

मा.श्री.कानडे -- नगर रचना प्लॅनची नेमकी प्रक्रिया काय नगर रचनाकाराची नेमणुक महाराष्ट्र शासन करते, नियम दाखवा.

नगर रचनाकार यांनी कायदा वाचुन दाखविला.

मा.श्री.वाकळे -- दुरूस्त्या करून प्रसिध्दी द्यावी असा ठराव करावा.

मा.श्री.कानडे -- मोफत पहावयास ठेवा, पार्ट प्लॅनसाठी किंमत ठेवा.

नगर रचनाकार -- मुळ जनतेला तो पाहावयास ठेवला आहे. तेंव्हा बदल करून प्लॅन प्रसिध्द करता येणार नाही.

मा.सौ.वर्षा आरिफ -- विषय सरळ आहे. प्रारूप योजना प्रसिध्द करणार आहोत त्यावर हरकती येणार आहेत हा विषय मंजुर करण्यास हरकत नाही.

मा.श्री.शेळके -- मा.श्री.घुले -- नगररचनाकाराचे अहवालावर सदस्यांच्या भावना आहेत सदस्यांच्या सुचनांचा विचार करणार का.

नगर रचनाकार -- संबंधित मालकाचा अर्ज आल्यावर अर्जाची शहनिशा करून दिली पाहिजे. मात्र बदल केला जातो.

मा.श्री.दिप चव्हाण -- सर्व सदस्यांनी मांडलेल्या दुरूस्त्या आज करता येणार नाही. मुद्दे रास्त आहेत पण आज दुरूस्त्या करता येणार नाही.

मा.श्री.पवार -- बुरूडगांव वगळण्यांचा ठराव महानगरपालिकेने पाठविला त्याचे काय झाले.

मा.महापौर -- तुम्हीच ठराव करून मागितला तो मनपाने करून दिला यापुढे तुम्हीच पहा.

श्री.शेळके -- स.नंबर ३०५ नदीमध्ये ग्रीन झोन केले.सावेडीमध्ये शेजारी ग्रीन झोन असतांनाही रेसिडेन्सियल झोन केला आहे. कुलकर्णी यांनी बरेच बदल केले. सिना नदी ग्रीन झोन उठविले , शेतक-यांचे ग्रीन झोन उठविले नाही. बिल्डरचे ग्रीन झोन उठविले. शेतक-यावर अन्याय करता पण बिल्डरने जागा घेतली तर ग्रीन झोन उठविला.

मा.आयुक्त -- ज्या चुका झाल्या असतील त्या चुका दुरुस्त करता येतील.

श्री.दिप चव्हाण - शेळके, वाकळे, कानडे यांच्या सुचना बरोबर आहेत.परंतू आज दुरुस्त्या करता येणार नाही. प्रसिध्दी पुर्व दुरुस्ती करता येणार नाही. ही कायदयाची अडचण.
मा.महापौर - प्रसिध्दीपुर्व दुरूस्त्या करता येत नाही. हा प्लॅन प्रसिध्द करावा.

ठराव -- ऑफिस प्रस्तावानुसार अहमदनगर शहराच्या वाढीव हद्दीची प्रारूप विकास योजना प्रसिध्द करणेत यावी. खर्च मंजुर.

सदर योजना प्रसिध्द केल्यानंतर त्यावर होणारा हरकती / सुचनांचा विचार करून पुनश्च सभेपुढे सदर विकास योजना मंजुरीस्तव ठेवावी. नियमानुसार कार्यवाही करावी.

ठराव बहुमताने मंजूर.

सुचक -- मा.श्री.कावरे आसाराम
अनुमोदक -- मा.श्री. घुले शंकरराव

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ८ दि.१७-५-२००६.

••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर महानगरपालिका शहर हद्दीमध्ये केंद्र शासनाच्या अनुदानातुन प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम राबविणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

--*--

प्रस्तावाचा मजकूर - शहरीकरण व औद्योगिकरणामुळे शहराचे लोकसंख्येत झपाटयाने वाढ होत असुन त्यामुळे गलिच्छ वस्त्यांमधील लोकसंख्या दुपट्टीने वाढत आहे. परिणामी नागरी संस्थेच्या सेवेमध्ये प्रचंड प्रमाणात ताण निर्माण होवुन व्यवस्था कोलमडत आहे. परिणामी मागासवर्गिय व गलीच्छ वस्तीमध्ये राहणा-या नागरिकांचे आरोग्य बिघडत आहे.

नागरी भागातील झोपडपट्टीतील एकुण आरोग्य सुधारण्यांसाठी प्रजनन व बाल आरोग्य सेवेत सुधारणा घडवुन आणणे कामी १० वी पंचवार्षिक योजनेत केंद्र शासनाने विशेष आर्थिक तरतुद केलेली असुन १० लाखापर्यंत लोकसंख्या असलेली शहरे या अनुदानासाठी पात्र आहेत. मा.अतिरिक्त संचालक कुटुंब कल्याण, पुणे यांचेकडील No.SFWB/URCH/ D-१७/०५ दि.२/९/२००५, ४८०४४-७३,ब व No. SFWB/RUS/ D-१७/०६ दि.१/२/२००६, चे पत्राप्रमाणे अर्बन आर.सी.एच.फेज-२ प्लॅन मार्गदर्शक सूचने प्रमाणे तयार करुन मा.अतिरिक्त संचालक, आरोग्यसेवा कु.क.मा.बा.सं. व शालेय आरोग्य यांचेकडेस सादर करणे बाबत कळविलेले आहे.

सदर योजने अंतर्गत ५० हजार लोकसंख्येसाठी एक नागरी आरोग्य केंद्र अनुज्ञेय असुन प्रत्येक केंद्रासाठी एक स्त्री वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) ४ सहाय्यक परिचारिका प्रसाविका, १ आरोग्य परिचारिका (पी.एच.एन.) , १ लिपीक , १ चतुर्थश्रेणी कर्मचारी (शिपाई ) अशी कर्मचारी रचना असेल. तसेच ७० लिंक वर्कर्स संपुर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रस्तावित आहेत. औषधे, उपकरणे, प्रोग्राम मॅनेजमेंट युनिट, प्रजनन व बाल आरोग्य विषयक विविध कार्यक्रम राबविणे कर्मचा-यांच्या आस्थापनेवरील खर्च इत्यादी साठी शासनाकडुन अनुदान अनुज्ञ ेय आहे. सदर कार्यक्रम २००५ ते २०१० कालावधी पर्यंत ५ वर्षासाठी असुन कर्मचारी आस्थापनेवर २००७-२००८ अखेर १०० टक्के अनुदान, २००८-२००९ साठी ५० टक्के अनुदान, २००९-२०१० साठी २५ टक्के अनुदान, शासनामार्फत अनुज्ञेय आहे. एप्रिल २०१० नंतर हा कार्य क्रम महानगरपालिकेस स्वखर्चाने चालवावा लागेल.

कर्मचारी यांच्या आस्थापनेवर २००५-२००६ साठी ७,२३,०००/- , २००६-२००७ साठी २८,९२,०००/-, २००७-२००८ साठी २८,९२,०००/-, २००८-२००९ साठी १४,४६,०००/-, २००९-२०१० साठी ७,२३,०००/- रु. अनुदान शासनामार्फत मिळणार आहे. २००८-२००९ साली १४,४६,०००/- , २००९-२०१० साली २१,६९,०००/- व २०१० नंतर २८,९२,०००/- रु.इतका आर्थिक बोजा महानगरपालिकेवर पडणार आहे.

अहमदनगर शहरासाठी खालीलप्रमाणे नागरी आरोग्य केंद्र प्रस्तावित आहेत.

| अ.नं. | नागरी आरोग्य केंद्र | प्रभाग क्रमांक |
|---|---|---|
| १ | तोफखाना दवाखाना | ४,१४,१५,१६,२० |
| २ | माळीवाडा केंद्र ( महात्मा फुले दवाखाना) | १०,१७,१८,१९,२१ |
| ३ | मुकुंदनगर केंद्र | २,३ |
| ४ | सिव्हील हॉस्पीटल केंद्र | ११,१२,१३ व भारस्कर कॉलनी |
| ५ | जिजामाता दवाखाना | ५,६,९ |
| ६ | नागापूर केंद्र | १ व सावेडी गावठाण |
| ७ | केडगांव केंद्र | ७,८ |

वरील सर्व आरोग्य केंद्रातुन रोग प्रतिबंधक सेवा व किरकोळ आजारांची बाह्यरुग्ण सेवा देण्यांसाठी असून प्रथमस्तरीय सेवेत मोडतात. मुकुंदनगर केंद्र, नागापुर केंद्र, केडगांव केंद्र या तीन नविन नागरी आरोग्य केंद्रांसाठी जागा भाडयाने घ्याावयाचे झाल्यास सदरचा खर्च महानगरपालिकेला महानगरपालिका निधीतुन करावा लागेल. व्दितीय स्तरावरील सेवेमध्ये जिथे कुटुंब नियोजन शस्त्रक्रीया, गर्भपात सेवा, अर्भक, बालरुग्ण सेवा, प्रसुती सेवा, इतर गंभीर आजाराचे उपचार करता येईल. अशा सोयींचा समावेश असून त्यासाठी सध्याचे कै.बा.दे.दवाखाना येथे आवश्यक त्या सुधारणा करुन उपयोगात आणता येईल. त्यासाठी आवश्यक तज्ञांची नेमणूक साठी, आवश्यक उपकरणे, औषधे खरेदी करणेसाठी केंद्रशासना कडुन निधी उपलब्ध होईल.

वरील सर्व प्रथम स्तरीय व व्दितीय स्तरीय आरोग्य सेवेचे केंद्र प्रस्थापित करुन २००९-२०१० पर्यंतच्या कालावधीत केंद्र शासनाकडून अनुदान मिळू शकेल व प्रकल्प कालावधी संपलेनंतर महानगरपालिकेला स्वतःच्या खर्चाने सदर प्रकल्प चालू ठेवावा लागेल.

महानगरपालिका हद्दीतील विशेषतः झोपडपट्टी व आर्थिक दृष्टया दुर्बल नागरिकांचा या योजनेसाठी समावेश करणेंत आला असुन नविन ३ नागरी आरोग्य केंद्रे व ४ जुने आरोग्य केंद्रांमध्ये सुधारणा करुन असे एकुण ७ नागरी आरोग्य केंद्र प्रस्तावित करण्यांत आलेले आहेत. कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथील शस्त्रक्रीया गृहाचे नुतणीकरण मॅटर्निटी वॉर्ड इत्यादीची डागडुजी, पिडियाट्रीक युनिटसाठी यंत्रसामुग्री औषधे सध्या अस्तित्वात असलेल्या आरोग्य केंद्रात सुधारणा, उपकरणे खरेदी, विविध आरोग्य कार्यक्रम राबविणे आणि कर्मचारी आस्थापना यांचेवर २००५ ते २०१० या ५ वर्षांसाठी रु.१,९९,३७,७१०/- मात्र चा प्रस्ताव तयार करण्यांत आला आहे. या प्रस्तावात नागरी आरोग्य केंद्रांमध्ये व कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे कॉंट्रॅक्ट बेसेसवर खालील प्रमाणे कर्मचारी नेमण्यांत येणार आहेत.

| अ.नं. | कर्मचारी | संख्या |
|---|---|---|
| १ | बालरोग तज्ञ | १ |
| २ | भुल तज्ञ | १ |
| ३ | लेडि मेडिकल ऑफिसर | ४ |
| ४ | पी.एच.एन.(एल.एच.व्ही.) | ५ |
| ५ | ए.एन.एम. | १४ |
| ६ | लॅब टेक्नीशियन | १ |
| ७ | लिपीक | ४ |
| ८ | शिपाई | ४ |
| ९ | लिंक वर्कर्स | ७० |

मा.शासनाचे परिपत्रकानुसार आरसीएच II कार्यक्रमाची महानगरपालिका कार्यक्षेत्रात अंमलबजावणी करणेसाठी " अंब्रेला सोसायटी " ची स्थापना करण्यांत आलेली आहे. सदर निधी अंब्रेला सोसासयटीच्या बँक खात्यावर येणार असुन कार्यक्रमाची अंमलबजावणी अंब्रेला सोसायटी मार्फत होणार आहे.

मा.अतिरिक्त संचालक, कुटुंब कल्याण, पुणे, यांचेकडील No. SFWB/RUS/ D-१७/०६ दि.१/२/२००६ चे पत्रानुसार सदर प्रकल्प मंजूरीसाठी मा.महासभेने सदर प्रकल्पाचे दायित्व स्विकारुन महासभेच्या ठरावासह सादर करणेंस कळविले आहे. तरी सदर बाबतचा प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणेस व उक्त प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणे बाबत विचार होणेस सविनय सादर.

यावर डॉ.अनिल बोरगे यांचा अभिप्राय की, प्रस्ताव मान्यतेस्तव व पुढील ओदशार्थ सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त ( कर) यांचा अभिप्राय की, प्रस्ताव मंजुरीसाठी मा.महासभेपुढे ठेवणे योग्य.

यावर मा.आयुक्त सो.यांचा अभिप्राय की, सहमत.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट डॉ.अनिल बोरगे , मा.उपायुक्त (कर), मा.आयुक्त सो.यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

चर्चा --

मा.आयुक्त :-- पुर्वीचे प्रस्तावात निधी कमी दिला होता. म्हणुन २ रा प्रस्ताव केला.

मा.श्री.सुळ -- मंजुरी कधी येणार ? अधिकारी पैसे आणणार याची खात्री आहे का ?

मा.आयुक्त -- हा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविला आहे.

मा.श्री.सुळ -- प्रशिक्षण घेवुन येणा-या अधिका-याने पुर्ण प्रशिक्षण घेतले का ?

मा.श्री.कानडे -- विषयात काय अंतर्भुत केले.

आर.सी.एच. I का II आहे.

वैद्यकिय आरोग्याधिकारी -- II आहे.

मा.श्री.कानडे -- आर.सी.एच.कमिटी केली होती का ? आता जी नेमणुक करावयाची पैठणकरला प्रशिक्षणासाठी पाठविले त्यांनी ट्रेनिंग कंम्प्लीट केले का ?

मा.आयुक्त -- बदलाला मंजुरी घेत आहोत.

मा.श्री.कानडे -- कर्मचा-यांच्या पगाराचा प्रश्न होता.

मा.आयुक्त -- ऑफिस नोट मध्ये पुर्ण माहिती आहे.

मा.श्री.कानडे -- आपले कर्मचा-यांची नेमणुक करा.

श्री.पैठणकर -- प्रशिक्षण पुर्ण झाले आहे, MSC Public Helth II nd Year पुर्ण केले नाही.

मा.श्री.कानडे -- यांचे अर्ज MHC Helth साठी आहे. आता ते सांगतात पब्लीक हेल्थसाठी महानगरपालिकेस Public Helth साठी कर्मचारी हवा. सभेने निर्णय घेवुन प्रशिक्षणास पाठविले तो कोर्स पुर्ण न करता ( पगारी रजा घेवुन ) व्यर्थ खर्च झाला आहे. सभागृहाची कोर्स बाबत दिशाभुल. महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केले आहे. सभेचा कोणताही आदेश नसतांना ते हजर राहतात.

मा.श्री.गंधे -- मागील जनरल बोर्डमध्ये पैठणकर यांना सर्व खर्चासह मंजुरी दिली आहे. व्यक्तिगत आकस असेल तर त्यास आमचा विरोध आहे. फी दिली गेली नाही म्हणुन ते कोर्स न करता परत आले. ( गोंधळात ऐकु आले नाही.)

श्री.सुळ -- ठराव पाठवतो शासनाकडून निधीसाठी सक्षम अधिकारी नेमावा.पैठणकर प्रशिक्षणास गेले होते तो त्यांनी पुर्ण केला काय ? अर्धवट केला असल्यास नुकसान कोणी भरावयाचे.

मा.श्री.चव्हाण -- विषयावर बोलायचे की, पैठणकरांवर बोलायचे हे आधी ठरवा.

मा.आयुक्त -- पैठणकर वआर.सी.एच.याचा संबंध नाही.

मा.श्री.कानडे -- किती कर्मचारी लागतात आपल्याकडे कर्मचारी आहेत ते काम करू शकत नाही का ?

वैद्यकिय आरोग्याधिकारी -- आजची मंजुर पदे कमी पडतात त्यामुळे जादा जागेची आवश्यकता आहे.

मा.श्री.कानडे कोर्स पुर्ण का केला नाही. झालेल्या खर्चाचे काय त्यांनी केलेला कोर्स व आपणांस अपेक्षित असलेला कोर्स यात तफावत दिसुन येते. याची चौकशी करावी.

मा.श्री.गंधे -- आरोग्याधिकारी नंतर कोण आहे.

मा.आयुक्त -- MOH नंतर उपआरोग्याधिकारी व दवाखान्यासाठी वैद्यकिय अधिकारी आहे.

मा.श्री.गंधे -- मुळ प्रस्ताव तयार करण्यासाठी कोणाला काय दिले होते ? माझ्या माहिती प्रमाणे एकुण २ लाख रू.दिलेत , येथील अधिका-यांनी काहीही काम केले नाही. इतर ठिकाणी आर.सी.एच.प्रकल्प सुरू झाले आहे. येथे अद्यापही सुरू नाही.

मा.श्री.चव्हाण -- टप्प्या - टप्प्याने कामास वेळ लागेल. ५ वर्षानंतर त्यांना २५ कर्मचा-यांना पोसावे लागेल. त्याचा खर्च किती ? भविष्यात हा विषय मंजुर केल्यावर यात शासनाचे चिकित्सा अधिकारी म्हणुन नेमणुक होणार का ? सर्व डी.ए.भत्ते पगार यांचे पगार ४० लाखापर्यंत खर्च वाढणार आज

दवाखान्याची काय परिस्थिती आहे. नपा शाळेत मुले जात नाहीत. तशीच परिस्थिती आर.सी.एच.ची होवु नये. या क्षेत्रातील अभिप्राय घ्या चांगले काम करा.

मा.आयुक्त -- शासनाकडे मिटींग झाल्यास पुर्वी पेक्षा निधी कमी झाला आहे.

मा.श्री.चव्हाण -- कुलकर्णी आजारी असल्याने पैठणकरला ट्रेनिंगला पाठवायचे असा ठराव झाला. पुढील वर्षी त्यांना नाकारले यात त्यांचा काही दोष आहे.

मा.आयुक्त -- बाहेरच्या उपनगरात आरोग्यसेवा नाही, त्यामुळे हा विषय महत्वाचा आहे.

मा.श्री.घुले -- कुलकर्णी कोठे दिसत नाही.

मा.श्री.गंधे -- असे ४०० ते ५०० कर्मचारी आहेत की जे फक्त सहया करतात व घरी जातात.

मा.आयुक्त -- गेल्यावेळी स्पेशल व्हिजीट देवुन कारवाई केली आहे.

मा.श्री.शेळके -- अशी जबाबदारी खाते प्रमुखांवर द्या व व्हीजीट द्यायला सांगा.

मा.आयुक्त -- कुलकर्णीवर कारवाई करणार.

मा.श्री.शेळके -- विषय असतांना गैरहजर

मा.श्री.आगरकर -- एम.ओ.एच.रोज कोठे आहे याची माहिती नसते. स्मार्ट कार्डचे केल्यास फरक पडेल.

श्री.सुळ -- एप्रील ०४ मध्ये शासनाचे पत्र आले होते.प्रस्ताव पाठविला फक्त ठराव शासनाकडे पाठवतो.

मा.आयुक्त -- पुर्वी ५ कोटीचा प्रस्ताव पाठविला होता आता तो १ कोटी ९९ लाख रुपयाचा आहे.त्यासाठी सुधारीत ठराव आवश्यक आहे.

श्री.कानडे -- या योजनेत काय काय अंतर्भुत आहे.आता जी मंजुरी घेतो त्यामध्ये कर्मचा-यांच्या नेमणूका करावयाच्या आहे काय ?

मा.आयुक्त - ४ डॉक्टर,१४ नर्सेस, ७ सुपरवायझर ,आवश्यक आहेत.

श्री.कानडे -- नविन कर्मचारी नेमण्याऐवजी सध्याचा स्टाफ नेमावा.श्री.पैठणकर यांना पगारी रजा दिली होती.त्यांचेवर लाखो रुपये झाला.त्यामुळे संस्थेचे आर्थिक नुकसान झाले आहे.याबाबत कोणाला जबाबदार धरणार किंवा नाही.

आर सी एच मध्ये कर्मचारी नेमणूकीचा विषय आहे.

श्री.मिलींद गंधे -- रिपोर्टमध्ये बोरगेंचा समावेश आहे.ते वैद्यकिय अधिकारी आहेत. आर.सी.एच प्रोजेक्टसाठी एजन्सी नेमली होती व मुळ प्रस्ताव ५ कोटींचा होता आता दोन कोटींचा झाला आहे. केवळ आकडे कमी केले आहेत. यात स्थानिक अधिका-यांचे काय कर्तृत्व आहे.

मा.आयुक्त : माझे अधिकारात मी जबाबदारी सोपवु शकतो ?

मा.श्री.गंधे : गेल्या ४ वर्षात नियम डावलुन उपआरोग्य अधिका-याकडे कुठल्याही फाईल्स जात नाही, त्यांचेवर कामाची जबाबदारी दिली जात नाही असे का ?

श्री.दिप चव्हाण -- महानगरपालिकेला पोसावे लागेल त्याचा खर्च किती.

श्री.जगताप -- साधारण रुपये २८ लक्ष महानगरपालिकेस करावा लागेल.

श्री.दिप चव्हाण -- नाहक ३० ते ४० लक्ष खर्च महानगरपालिकेस वाढेल.

श्री.घुले -- श्री.कुलकर्णी आरोग्याधिकारी गैरहजर आहेत ते रजेवर आहेत का याचा खुलासा करावा.

श्री.जगताप -- सोमवार पासून ते गैरहजर आहेत.

मा.आयुक्त -- जेवढे दिवस गैरहजर असतील तर त्यांची बिनपगारी करणेत येईल.

श्री.आगरकर -- सावेडीला दोन फोन आहेत.शहरात इनकमींग आहे.रुपये १०००/- पर्यंत फोनची मर्यादा ठेवावी.

**ठराव** -- ऑफीस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक -- मा.श्री.सुरेश शेळके,
अनुमोदक -- मा.श्री.अभय आगरकर,

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ९ दि.१७-५-२००६.

••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••••

प्रस्तावाचा विषय - भारत सरकारच्या नगर विकास विभागाने लहान व मध्यम लोकसंख्या असलेल्या शहराच्या नियोजनबध्द विकासासाठी जाहिर केलेल्या यु. आय. डी. एस. एस. एम. टी. या योजनेच्या माध्यमातुन अ ) सावेडी भुयारी गटार योजना ब ) सध्या अस्तित्वात असलेल्या म.जी.प्रा.ने राबविलेल्या अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा कमांक २ ची खास दुरुस्ती व काही उपकामांचे नुतनीकरण करण्यांचा प्रस्ताव मा.राज्य शासनाकडे व मा.केद शासनांकडे मंजुरीकरीता पाठविणेस्तव ऑफिस रिपोर्ट.

**--*--**

प्रस्तावाचा मजकूर - केंद्र सरकारच्या नगर विकास खात्याने कमी (लहान) व मध्यम लोकसंख्या असलेल्या शहरांच्या नियोजनबध्द व संकीर्ण विकासासाठी यु.आय.डी.एस.एस.एम.टी. ( UIDSSMT ) योजना सन २००५-२००६ मध्ये जाहिर केलेली आहे. त्यातील मार्गदर्शक तत्वानुसार खालील प्रकारच्या विविध योजनांचे प्रस्ताव वरील योजनेत समावेश करण्याबाबतच्या सुचना आहेत.

१. पाणीपुरवठा योजना व भूमीगत गटार योजना तसेच शहर स्वच्छता या बाबतच्या विविध योजना.
२. घन कचरा व्यवस्थापन.
३. नवीन गटारी व पूर पाण्याचे नियोजन.
४. शहरांतर्गत रस्ते,राज्यमार्ग,व राष्ट्रीय महामार्ग यांचे नूतनीकरण अथवा नवीन कामे.
५. वाहन थांब्यांचा खाजगी तत्वांवर विकास अथवा ते नव्याने बांधणे.
६. नगर / महानगर मिळकतींचा विकास.
७. पाणी स्त्रोतांचे रक्षण व विकास व बळकटीकरण.
८. शहरांतर्गत अरूंद रस्ते रूंद करणे,औद्योगिक वसाहती शहराबाहेर नेणे, पाणीपुरवठयाच्या जुन्या लाईन्स बदलणे,तसेच भुयारी गटार योजनांचे नुतनीकरण करणे इत्यादी कामे.

वरील योजनांचा कार्यवाहीचा कालावधी ७ वर्षांचा असेल सुरूवातीचे वर्षे २००५-०६ हे गणले जाणांर आहे. आर्थिक सहभागाची पध्दत अशी असणांर आहे. १. केंद्र शासनाचा हिस्सा - ८० % २. राज्य शासनाचा हिस्सा - १० % व ३. संस्थेचा हिस्सा १० % = एकुण १०० % या योजना राबविण्यांसाठी त्यांची तांत्रिक छाननी करण्यांसाठी व योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यांसाठी राज्यस्तरावर एका समितीची स्थापना झाली आहे. सदर समितीने खालील ४ कामांना प्राधान्य द्यावे असे केंद्र सरकारने सुचित केले आहे.

१. पाणीपुरवठा व स्वच्छता कामांचे प्रस्ताव.
२. भूयारी गटार योजना व घन कचरा व्यवस्थापन.
३. रस्ते बांधणे व रस्त्यांचा विकास.
४. पूर पाण्याचा निचरा करण्यासाठीच्या योजना अथवा त्यांचे नुतनीकरण व विकास.

वरील कामांसाठी लागणांरा निधी केंद्र सरकार संबंधीत संस्थांना थेट उपलब्ध करून देणांर आहे. अशा कामांची प्रत्यक्ष कार्यवाही राज्यस्तरावरील संबंधित खात्यांमार्फत करावी.

वरील विषयांचे प्रस्ताव तयार करून संबंधित संस्थांनी ते राज्य शासनाने नियुक्त केलेल्या समितीकडे मंजुरीसाठी पाठवायचे आहेत.

वरील मार्गदर्शक तत्वांनुसार मा.आयुक्त साो. अहमदनगर महानगरपालिका ( मनपा) यांनी महानगरपालिकेतील सर्व संबंधित अधिका-यांची एक बैठक दि.४-३-०६ रोजी त्यांचे दालना आयोजित केली होती. सदरच्या बैठकीत मा.आयुक्त साो.यांनी प्राधान्याने खालील दोन प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिल्या.

१. सावेडी व भोवतालच्या प्रभागांसाठी भूयारी गटार योजना.

२. सध्या अस्तित्वात असलेल्या व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने राबविलेल्या अ.भू.ग.योजना टप्पा क्र.२ ची खास दुरूस्ती व काही उपक्रमांचे नूतनीकरण.

त्यानुसार सावेडी प्रभागासाठी मे.गिडॉन इनफॉरमेटीक्स,नाशिक यांनी तयार केलेल्या भूमीगत गटार योजनेवर चर्चा झाली. ही योजना ( UIDSSMT ) च्या प्रस्तावात सामील करण्यांचे ठरले. त्याचप्रमाणे म.जी.प्रा.तर्फे नगर शहरांसाठी टप्पा क्र. २ अंतर्गत भुयारी गटार योजनेतील जी कामे पूर्ण केली गेली आहेत त्यांची सखोल तपासणी करून ना दुरूस्त कामांची आवश्यक दुरूस्ती व नूतनीकरण करण्यांचे ठरले.

सध्या मलशुध्दीकरण केंद्रांची वीज जोडणी महावितरण कंपनीने तोडली आहे. ती वीज जोडणी पुढील कार्यवाहीच्या दृष्टीने परत मिळवणेसाठी खर्चाची तरतूद करणे आवश्यक आहे. तसेच मलशुध्दीकरण केंद्रांच्या विविध कामांची यंत्रसामुग्री ( Mechanical Equipment) व वीजेची उपकरणे जागेवर उपलब्ध नाहीत. हे मलशुध्दीकरण केंद्र सुमारे १५ वर्षापासुन बंद अवस्थेत आहे असे समजते.

दि.४-३-०६ च्या बैठकीत ठरल्याप्रमाणे टप्पा क्र.२ मधील भुयारी गटार योजनेच्या कामांना व मलशुध्दीकरण केंद्रास शहर अभियंता ,पाणीपुरवठा विभाग प्रमुख अभियंता व इतरांसमवेत भेट देवुन कामांची पाहणी केली. सुमारे १५ वर्षांपासुन ही कामे बंद असल्यामुळे ती वापरात नाहीत व त्यामुळे या केंद्रांच्या काही उपकामांची पडझड झाली आहे. १. रिसीव्हींग चेंबर २. स्क्रीन चेंबर ३. ग्रीट चेंबर ४. व्होर्टेक्स सेपॅरेटर ५. डीस्ट्रीब्युशन चेंबर इ.

या कामांची बरीच दुरूस्ती आवश्यक असल्याने ती केल्यावरच ती दुरूस्तीनंतर ती वापरात आणता येतील.

प्रायमरी क्लेरीफायरची मोठया प्रमाण दुरूस्ती करावी लागेल. त्याचा तळ पुर्णपणे उखडला गेला आहे. मेकॅनिकल इक्वीपमेंट दुरूस्त करावी लागेल. इलेक्ट्रीकल पार्टस व अॅक्सेसरीज नवीन बसवाव्या लागतील. प्रायमरी व सेकंडरी डायजेस्टर यांची मोठया प्रमाणावर दुरूस्ती करावी लागणांर आहे. या दोघांना जोडणां-या भागाची मोठया प्रमाणात पडझड झाल्याने ते पुर्ण तोडुन नविन आर.सी.सी.बांधकाम करावे लागणांर आहे. व तेच सोयीस्कर ठरेल.

गॅस होल्डर टँक, गॅस बर्नर व इन्सीनरेटर यांचीही दुरूस्ती अनिवार्य आहे. स्लज ड्राईंग बेडस स्वच्छ केल्यावरच त्यांच्या दुरूस्तीबाबतचा अंदाज घेता येणे शक्य होईल. मलशुध्दीकरण केंद्रांच्या प्रवेशदाराकडील डाव्या बाजुस देखभाल करणां-या कर्मचा-यांच्या कामांसाठी बांधलेल्या प्रशासकीय इमारतीची मोठया प्रमाणात पडझड झाली आहे. तिच्याही दुरूस्तीची आवश्यकता आहे.

मलशुध्दीकरण केंद्रानजीक असलेल्या बुरूडगांव रोडच्या हद्दीजवळील संप व पंप हाउत्स क्र.१ ची ही पाहणी केली. तेथील पंपींग मशीनरी पुर्णपणे नादुरूस्त झालेली आढळली. इलेक्ट्रीकल ॲक्सेसरीज एकतर दुरूस्त कराव्या लागतील अथवा बदलाव्या लागतील असे वाटते.

संयुक्त पाहणीत असे आढळुन आले की, टप्पा क्र.२ मधील भुयारी गटार योजनेच्या उपकामांची सद्यस्थिती असमाधानकारक आहे. या कामांची आवश्यक दुरूस्ती केल्याशिवाय ती वापरात आणता येणांर नाहीत.

ढोबळ मानाने टप्पा क्र. २ मधील विविध उपकामे वापरात आणण्यासाठी सर्व कामांची सखोल पाहणी करणे आवश्यक आहे. ही कामे व मलशुध्दीकरण केंद्राचे काम ज्या कन्स्ट्रक्शन कंपनीने अथवा ठेकेदाराने केलेले आहे. त्यांच्याकडुन अशा सर्व उपकामांची संकल्पचित्रे ( Designs) व नकाशे ( Drawings) प्राप्त करून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाशी संपर्क साधुन चर्चा करणे उपयुक्त ठरेल. तसेच ज्या कंपनीने / ठेकेदाराने ही कामे केली आहेत. त्यांच्याकडील निष्णात तंत्रज्ञांकडुन या कामांची पाहणी करून घेवुन दुरूस्तीच्या खर्चाचा प्रस्ताव त्यांचेकडुन प्राप्त करून घेणे जरूरीचे आहे.

अ.नगर शहरात निर्माण होणांरा घनकचरा व त्याचे व्यवस्थापन हाही महत्वाचा घटक आहे. त्यामुळे शहराच्या स्वच्छतेच्या कामांत या कामांचे महत्व जाणुन घेवुन या कामाचा प्रस्ताव ( UIDSSMT ) प्रस्तावात सामील करावा असे ठरले आहे.

वर उल्लेख केलेल्या ३ योजनांचा एकत्रीत परिपुर्ण प्रस्ताव ( UIDSSMT ) योजने अंतर्गत राज्यशासनाने नियुक्त केलेल्या समितीकडे मंजुरीस्तव सादर करावा लागेल.

सावेडी प्रभागाच्या भूयारी गटार योजनेचा प्रस्ताव मे.गिडॉन इनफॉरमेटीक्स,नाशिक कडुन प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २००३-२००४ च्या दरसुचीवर आधारीत आहे. तो प्रस्ताव पुर्णपणे तपासण्यात आला आहे. सदर प्रस्तावाची किंमत मजीप्राच्या सन २००५-२००६ च्या दरसुचीप्रमाणे नव्याने काढण्यात आली आहे. या प्रस्तावाची नवीन चालु दरसुचीवर आधारीत किंमत रू.२४,८६,७६,०५० इतकी झाली आहे. त्यात २ % वर्कचार्ज आस्थापना व २.५ % टर्न ओव्हर टॅक्स मिळविल्यावर या प्रस्तावाची अंतिम किंमत रू.२५,९९,९०,८०९ म्हणजेच रू.२६ कोटी इतकी आली आहे.(NR-1)

२. तसेच भुयारी गटार योजना टप्पा क्र.२ ची उपकामे वापरात आणण्यासाठी ( S.T.P. धरून ) ती दुरूस्त करावी लागणांर आहेत. त्या खर्चाचे ढोबळ अंदाजपत्रक शहर अभियंता यांचेशी चर्चा करून तयार केले त्यानुसार खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

१. मेन सीवर व लॅटरल्स,ड्रॉपमॅन होल्स, संप व पंप हाउत्स , मलशुध्दीकरण केंद्र व इतर अनुषंगिक कामे यांचा स्थापत्य दुरूस्ती खर्च - रू.३ /- कोटी ( Rs.3 Crores )

२. मलशुध्दीकरण केंद्र , सिवेज संप व पंप हाउत्स यातील विविध उपकामांची मेकॅनिकल व इलेक्ट्रीकल इक्वीपमेंट यांची नव्याने उभारणी व दुरूस्ती , त्या भागाचे विद्युतीकरण, वीजबिलाची मागील थकबाकी व नवीन वीज जोडणीची आर्थिक तरतुद रू. २/- कोटी

( Rs.2 Crores )

एकुण रू.५.०० कोटी (NR-2)

३. घनकचरा हाताळणी प्रक्रिया व व्यवस्थापन प्रकल्पासाठी ग्रीन गोल्ड एनर्जी , मुंबई या कंपनीकडुन प्रस्ताव प्राप्त झाला आहे. या प्रस्तावाची किंमत रू.२ कोटी ५० लाख इतकी असणांर आहे. यात ५ % Contengencies P 2 W.C.Estt. चार्जेस व २.५ % टर्न ओव्हर टॅक्स व इतर चार्जेसचा समावेश दिसत नाही. तेंव्हा या प्रस्तावाचा ढोबळ खर्च रू.३.०० कोटी इतका येवु शकेल. ( NR- III )

या तीन प्रस्तावांची एकत्रीत किंमत २६ + ५ + ३ रू. ३४ /- कोटी इतकी असणांर आहे. तेंव्हा वरील तीन प्रस्ताव ( UIDSSMT ) योजने अंतर्गत केंद्र शासनास मंजुरीसाठी सादर करण्यासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या समितीकडे तातडीने पाठवायचे आहेत. त्यांची मान्यता मिळविणेसाठी एकत्रीत प्रस्ताव तयार करण्यांत आला आहे. त्यास महासभेची मंजुरी मिळणेंसाठी सदर टिप्पणी मान्यतेंसाठी सविनय सादर.

यावर श्री.एन.डी.कुलकर्णी शहर अभियंता यांचा अभिप्राय की, वरील प्रस्ताव योग्य असुन त्यास महासभेची मंजुरी मिळणेंसाठी सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रमाणे कार्यवाहीसाठी शिफारस आहे.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, केंद्र शासनाचे मध्यम व लहान शहरासाठी नागरी विकास योजना ( UIDSSMT ) अंतर्गत अहमदनगर भुयारी गटार योजना टप्पा क्र. २ ची दुरूस्ती आणि सावेडी भुयार गटार योजना नवीन बांधकाम तसेच घनकचरा व्यवस्थापन व प्रक्रिया या प्रकल्पांना प्रस्तावित केलेनुसार मान्यता देवुन राज्य शासनामार्फत आवश्यक तो प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी सादर करणेंस हरकत नाही.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, दुरध्वनी / फॅक्सद्वारे सदर बाबत राज्य शासनाने प्रशासकीय मान्यतेकरीता गठीत केलेल्या समितीची रचना व संबंधीत अधिकारी यांचे बाबत माहिती संकलीत करावी.

प्रस्ताव त्वरीत येत्या महासभेपुढे ठेवणेंत यावा.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सा) , मा.आयुक्त साहेब व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

**ठराव** -- ऑफीस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.नियमानुसार कार्यवाही करावी.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक -- मा.श्री.सुरेश शेळके,
अनुमोदक -- मा.श्री.मिलींद गंधे,

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १०                                                            दि.१७-५-२००६.

........................................................................................................................

प्रस्तावाचा विषय - माणिक चौक ते भिंगारवाला चौक दरम्यान असणां-या एकमुखी दत्त मंदिर समोरील परिसरास " श्री एकमुखी दत्त चौक " असे नामकरण करणे बाबत मा.सर्वश्री.संजय चोपडा, सदस्य व मा.किशोरकुमार बोरा,सदस्य,यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**--*--**

प्रस्तावाचा मजकूर - माणिक चौक ते भिंगारवाला चौक दरम्यान असणां-या एकमुखी दत्त मंदिर समोरील परीसरास " श्री एकमुखी दत्त चौक " असे नामकरण करणे बाबत मा.नगरसेवक श्री.संजय चोपडा व मा.नगरसेवक श्री.बोरा किशोरकुमार हिंम्मतलाल यांनी दि.१६-३-२००६ चे पत्रान्वये मागणी केली आहे. एकमुखी दत्त मंदिर हे अहमदनगर शहरातील नागरिकांचे श्रध्दास्थान असल्याने जागृत देवस्थान असल्याने तेथील भागातील नागरिकांनीही निवेदनाद्वारे एकमुखी दत्त मंदिर समोरील परिसरास " श्री एकमुखी दत्त चौक " असे नामकरण करणे बाबत मागणी केली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेकडील नोंदवही पाहता सदर परिसरास कोणाचेही नांव दिल्याचे आढळुन येत नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची " ड " प्रकरण ११ (२) अ नुसार महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिकेमध्ये विहित असलेला कोणताही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाणी नांव देण्यांचा अधिकार मा.आयुक्तांना असल्यांने सदरचे प्रकरण मा.सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्याविषयी आदेशार्थ सादर.

यावर उप शहर अभियंता श्री.एन.बी.मगर यांचा अभिप्राय की, शाखा अभियंता यांचे प्रस्तावाप्रमाणे अहवाल मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस तथा आदेशार्थ सादर.

यावर श्री.एन.डी.कुलकर्णी , शहर अभियंता यांचा अभिप्राय की, सदर प्रस्ताव योग्य वाटतो. त्याप्रमाणे सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस ठेवण्यांस हरकत नाही. सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (सा ) यांचा अभिप्राय की, अहवालानुसार निर्णयासाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेसाठी शिफारस आहे.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सहमत.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मनपा सभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट उप शहर अभियंता श्री.एन.बी.मगर, श्री.एन.डी.कुलकर्णी , शहर अभियंता , मा.उपायुक्त (सा ) ,मा.आयुक्त साहेब , मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

**ठराव** -- ऑफीस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.नियमानुसार कार्यवाही करावी.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक -- मा.श्री.संजय चोपडा ,
अनुमोदक -- मा.श्री.किशोर बोरा,

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ११ दि.१७-५-२००६.

प्रस्तावाचा विषय - प्रभाग क ९ मधील मल्हार चौक ते कांती चौक या रस्त्यास " कै.राजाभाऊ झरकर पथ " हे नांव देणे बाबत मा.सर्वश्री आगरकर अ.ज.,सौ.काळे गितांजली सु. श्री.शिंदे अनिल, श्री.खैरे दिपक या मा.सदस्यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव.

**--*--**

प्रस्तावाचा मजकूर - अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ९ मधील मल्हार चौक ते क्रांती चौक पर्यंतच्या रस्त्याला " कै.राजाभाउ झरकर पथ " नांव देणे बाबत सदरच्या प्रभागातील वरील नगरसेवक यांनी यादी दिलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेकडील नोंदवही पाहता सदर रस्त्याला कोणाचेही नांव यापुर्वी दिलेले आढळुन येत नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची ड प्रकरण ११ (२ ) अ नुसार महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिकेमधील विहीत असलेल्या कोणत्याही रस्त्याला किंवा सार्वजनिक ठिकाणास नांव देण्यांचा अधिकार मा.आयुक्तांना असल्याने सदरचे प्रकरण मा.सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्याविषयी आदेशार्थ सादर.

यावर श्री.एन.डी.कुलकर्णी , शहर अभियंता, यांचा अभिप्राय की, मा.सदस्य श्री. आगरकर साो. / श्री.शिंदे / सौ.काळे व श्री.खैरे यांचे पत्राप्रमाणे खात्री केलेली आहे. विषयांकित " मल्हार चौक ते क्रांती चौक या रस्त्यास मा.सदस्यांच्या पत्राप्रमाणे " कै.राजाभाउ झरकर पथ " असे नांव देण्यांस हरकत नाही.सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त ( कर ) यांचा अभिप्राय की, प्रस्ताव मंजुरीसाठी मा.महासभेपुढे ठेवावा.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.आयुक्त यांचे प्रस्तावाशी सहमत. प्रकरण महासभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट श्री.एन.डी.कुलकर्णी , शहर अभियंता, मा.उपायुक्त ( कर ) व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

ठराव -- ऑफीस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक -- मा.श्री.अभय आगरकर,
अनुमोदक -- मा.श्री.मिलींद गंधे,

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १२ दि.१७-५-२००६.

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर महानगरपालिकेच्या सिध्दीबाग व्यायाम शाळेस कै.दत्तु खालिफा व्यायामशाळा नांव देणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**--*--**

प्रस्तावाचा मजकूर - अहमदनगर महानगरपालिका मालकीच्या सिध्दीबाग व्यायामशाळेस कै.दत्तु खलिफा व्यायामशाळा नांव देणे बाबत मा.नगरसेवक यांनी संदर्भिय पत्रानुसार कळविले आहे. सिध्दीबाग व्यायामशाळा ही सिध्दीबाग व्यायामशाळा म्हणुनच संबोधली जाते. या व्यतिरिक्त सदर व्यायामशाळेस कोणाचेही नांव देण्यांत आलेले नाही.

महानगरपालिकेच्या इमारतींना नांव देण्यांचे अधिकार मा.महासभेचे असल्याने सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा ) यांचा अभिप्राय की, अहवालानुसार सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, महासभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सा ) व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

चर्चा --

श्री.गंधे -- नावामध्ये खलीफा (कै.दत्तु खलिफा )यांचे मुळ नावाचाही बोर्डावर उल्लेख करावा.

**ठराव** -- ऑफीस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.मात्र कै.दत्तू खलिफा असा उल्लेख नामफलकात आवर्जुन करावा.या सुचनेसह ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक -- मा.श्री.मिलींद गंधे,

अनुमोदक -- मा.श्री.सुरेश शेळके,

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १३ दि.१७-५-२००६.

.............................................................

प्रस्तावाचा विषय - श्रीमती.हेमलता निलेश साळवे, ज्यु.क्लार्क पदावर अहमदनगर महानगरपालिकेतुन पुणे महानगरपालिकेत बदली बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव.

**--*--**

प्रस्तावाचा मजकूर - अहमदनगर महानगरपालिके मधील कर्मचारी श्रीमती.हेमलता निलेश साळवे यांनी मा.राज्यमंत्री यांना पुणे महानगरपालिकेमध्ये बदली करणे बाबत निवेदन सादर केलेले असुन सदर निवेदनाबाबत स्वयंस्पष्ट अहवाल सादर करणे बाबत मा.कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग यांनी इकडेस कळविले आहे.

श्रीमती.हेमलता निलेश साळवे या तत्कालीन नगरपरिषदेमध्ये त्यांचे पतीचे निधन झाल्यामुळे अनुकंपा तत्वानुसार वारस म्हणुन जा.नं.आस्थापना ३२७० दि.३०-७-२००२ अन्वये लिपिक पदी कायम नोकरीस आहेत.

नगरपरिषद आस्थापनेवरील कर्मचा-यांचे बदल्या संदर्भात नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचेकडील आदेश क्र. न.प्र.स.ई.स्थायी निदेश / २००३ / प्र.क्र.३६५ / ५ दि.२० मे २००४ मध्ये बदलीसाठी अर्ज केलेल्या कर्मचा-यांने खालील अटींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१. बदलीची मागणी करणारे कर्मचारी महाराष्ट्र नगरपरिषद,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७६ अन्वये मंजुरी दिलेल्या पदावरील कर्मचारी असावेत.

२. बदलीची मागणी केलेल्या कर्मचा-यांची मुळच्या नगरपरिषदेमध्ये किमान ३ वर्ष सलग सेवा झालेली असावी.

३. या कर्मचा-या विरूध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरू नसावी. अथवा फौजदारी गुन्हे दाखल केलेले नसावेत.

४. संबंधित कर्मचा-यांचे संदर्भात लेखा परिक्षणात घेण्यांत आलेल्या आक्षेपाबाबत तसेच त्यांचे नांवे असलेल्या सर्व ....... रकमांचे समायोजन करून त्याची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

५. संबंधित कर्मचारी त्यांचेवर मुळ नगरपरिषदेच्या देय रक्कमेचे असलेल्या सर्व दायित्वातुन कर्मचारी मुक्त झालेला असला पाहिजे.

६. बदलीच्या दिनांकाला कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या खात्यात जमा असलेली रक्कम,निवृत्तीवेतन वर्गणी व रजावेतन वर्गणी बदली झालेल्या नगरपरिषदेकडे वर्ग करावी लागेल.

उपरोक्त तरतुदीचा विचार करता श्रीमती.हेमलता निलेश साळवे यांची नेमणुक महाराष्ट्र नगरपरिषद,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ७६ अन्वये मंजुरी दिलेल्या पदावर करण्यांत आलेली आहे. त्यांची अहमदनगर महानगरपालिकेकडे ३ (तीन)

वर्ष सेवा झालेली आहे. त्यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी अथवा फौजदारी गुन्हा दाखल नाही. तसेच त्यांचे संदर्भात लेखापरिक्षणात आक्षेप घेण्यांत आलेले नाहीत. व त्यांचे नांवे आगाउ रकमा घेतलेल्या नाहीत.

तसेच शासन परिपत्रकामध्ये बदली बाबत पुढील प्रमाणे निकष नमुद केलेले आहेत.

१. पती - पत्नी एकत्री करणांसाठी.

२. मतीमंद मुलाच्या पालकांची बदली.

३. कर्मचा-यांची स्वतःची कायम स्वरूपाची विकलांगता असल्यास.

श्रीमती.हेमलता निलेश साळवे यांचे निवेदनानुसार पुणे महानगरपालिकेत त्यांना बदली जागेवर शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार हजर करून घेण्यांस तयार असतील तर अहमदनगर महानगरपालिकेची हरकत नसल्याबाबत कळविणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त ( सा. ) यांचा अभिप्राय की, उक्त प्रकरणी मागणी ही बदली संदर्भात आहे असे म्हणण्यापेक्षा आस्थापना बदलाची आहे. या प्रकरणी अर्जदाराने पुणे महानगरपालिकेमध्ये बदलीसाठी मान्यता अपेक्षिली असुन पुणे महानगरपालिका त्यांना सेवेत सामावुन घेण्यांस तयार असल्यास त्यांच्या सेवा शासनाच्या मान्यतेने पुणे महानगरपालिकेचे आस्थापनेवर वर्ग करता येतील. त्यामुळे त्यांचे पुणे महानगरपालिकेकडे वर्ग करणेसाठी / बदलीसाठी ठराव संमत करणेंस मा.महासभेपुढे प्रस्ताव ठेवणेंस शिफारस आहे.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, शासन निर्देशानुसार संबंधित कर्मचा-यांकडुन विहित शपथपत्र घ्यावे. तसेच बदलीचे कारणांबद्यल कागदपत्र घ्यावेत.

यावर श्री.व्ही.एस.थोरात , आस्थापना अधिक्षक यांचा फेरसादर रिपोर्ट की, श्रीमती.हेमलता निलेश साळवे यांनी मा.महाराष्ट्र शासनाचे दि. २०-५-२००४ चे परिपत्रकानुसार प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. ( सोबत : प्रतिज्ञापत्र ) तरी सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवण्यांस आदेशार्थ सादर.

यावर प्रभारी आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्ताव " अ " मान्य.

यावर मा.महापौर साो.यांचा अभिप्राय की, महानगरपालिका सभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा. उपायुक्त ( सा. ) , मा.आयुक्त साहेब व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह व श्री.व्ही.एस.थोरात,आस्थापना अधिक्षक यांचे फेरसादर रिपोर्टसह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

**ठराव** -- ऑफीस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.नियमानुसार कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक -- मा.श्री.सुरेश शेळके,

अनुमोदक -- मा.श्री.संजय चोपडा

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १४ दि.१७-५-२००६.

........................................................................

प्रस्तावाचा विषय - मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

**--*--**

प्रस्तावाचा मजकूर

# दि.२८-४-२००६ चे सर्वसाधारण सभेपुढील चर्चा

विषय क्र.१ - मागील कार्यवृत्त कायम करणे.

मागील कार्यवृत्त कायम करणेसाठी विषय वाचणेत आला असता खालीलप्रमाणे चर्चा झाली.

१) मा.श्री.दीप चव्हाण - आज दि.२८-४-२००६ रोजी सभा बोलाविण्यता आलेली आहे. तथापी गेल्या दोन महिन्यापासून सभा झालेली नाही. व आता ३ महिने होत आले आहेत. दर महिन्याच्या २० तारखेला सभा बोलावली पाहिजे अशी महानगरपालिका कायदयामध्ये तरतूद आहे. असे असताना सुध्दा गेल्या ३ महिन्यापासून आपण सभा घेतली नाही याचा खुलासा व्हावा. नियमाच्या उल्लंघनाबाबत प्रश्न उपस्थित झालेला आहे. जनतेचे प्रश्न अनेक सोडविले गेलेले नाहीत. त्यामुळे सभा घेणे आवश्यक होते. यामुळे खुलासा होणे आवश्यक आहे.

त्यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, सर्व साधारणसभेपुढे घ्यावयाचे विषय थोडे होते. तसेच अपूर्ण विषय होते. व विषयाला ऑफिस रिपोर्ट नव्हते. त्यामुळे सर्व साधारण सभा होउ शकली नाही.

यावर मा.दीप चव्हाण यांनी संागितले की, आम्ही गेल्या अनेक वर्षापासून सभासद आहोत व सभेला उपस्थित रहात आहोत. परंतु अशा प्रकारे सभा न घेण्याचा प्रश्न उपस्थित झालेले नाहीत. नगरपालिका कायदयान्वये जर सभा घेतली गेली नाही तर अशी सभा घेण्याबाबत जिल्हाधिकारी यांना अधिकार होते. व ते सभा बोलावू शकत होते. महापालिका कायदयाप्रमाणे इतर अधिकारी यांना सभा बोलावण्याचे अधिकार नाही काय. याचा खुलासा आयुक्त यांनी करावा.

सर्व साधारण सभेला विषय नव्हते. हे सभा न घेण्याचे न पटणारे कारण आहे. उन्हाळयाचे दिवस असल्याने पाणीपुरवठयाचे अनेक प्रश्न व विषय होते. त्याचप्रमाणे ड्रेनेजबाबतही अनेक प्रश्न आहेत. पाण्याचे जनतेचे प्रश्न मांडले गेले नाहीत. याबाबत उत्तर देण्यात यावे.

यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, याबाबत काही खास कारण नाही. येथून पुढील क्ाळात अशा प्रकारे विलंब होणार नाही.

मा.श्री.दीप चव्हाण यांनी संागितले की, आजच्या अजेंडयावर विषय क्र.३ सभेचे कामकाज नियम ठरविणेबाबतच घेणेत आलेला आहे. त्याकरिताच आमचा हा प्रश्न उपस्थित करण्याचा उददेश आहे. नियम करण्यास संागितलेले आहेत. त्यामुळे मा.महापौर यांनी दिलेले उत्तर आम्हास संयुक्तीक वाटत नाही. तेव्हा मा.महापौर यांनी सभेस उशीर झाल्याचे कबूल करावे.

यावर मा.महापौर यांनी संागितले की तसा काहीच उददेश नाही. तसे वाटल्यास जनतेच्या प्रश्नासाठी पुन्हा सभा घेण्यात येईल.

२) मा.श्री.अभय आगरकर - सर्व साधारण सभा दर महिन्याच्या २० तारखेस घ्यावयास पाहिजे अशी कायदयात तरतूद आहे. तथापी अशी सभा घेतली न गेल्यास याबाबत काय कार्यवाही करावयाची याबाबत संदिग्धता आहे. कायदयात स्पष्ट दिलेले नाही. असा खुलासा केला. तथापी सभा बोलाविणेबाबत बंधने पाळणे उचित होईल. यावर मा.महापौर यांनी ठीक आहे अशाबाबत दुजोरा दिला.

३) मा.श्री.शंकरराव घुले - दर महिन्याच्या २० तारखेला सभा घेणे जरुरीचे आहे. नगरपरिषद कायदयामध्ये अशा प्रकारे सर्व साधारण सभा न बोलविली गेल्यास जिल्हाधिकारी अशी सभा बोलावू शकत असत. व नगरपरिषद कायदयात तसे अधिकार होते. तसेच नगराध्यक्ष यांना मंजुरी गृहीत धरुन मंजूरी देण्याचे अधिकार होते. तशी मनपा कायदयात काय तरतुद आहे याचा खुलासा करावा.

४) मा.श्री.दीप चव्हाण - नगरपालिका व मनपा कायदा यातील फरक पहाता महानगरपालिका कायदयामध्ये अशी तरतूद नाही. याबाबत विषय क्र.३ मध्ये चर्चा करताना विचारात घेण्यात यावे.

प्रभारी आयुक्त श्री.देशमुख यांनी खुलासा केला की, नगरपालिका कायदयाच्या तरतुदीप्रमाणे २ महिन्याच्या आत सभा घेण्याची तरतूद आहे. व न घेतल्यास मुख्याधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांना कळविल्यास ते मिटींग घेउ शकतात. तथापी महानगरपालिका कायदयात अशी तरतुद नाही. मात्र तातडीचे प्रश्नावर आयुक्त निर्णय घेउ शकतात. (सभागृहामध्ये गोंधळ)

५) मा.श्री.उडाणशिवे - दलित वस्तीसाठी आलेला निधी याबाबत अन्यत्र खर्च करु नये याबाबतचे निवेदन हलगी वाजवून सभागृहात देणेबाबतचा आग्रह धरला असता सभागृहात गोंधळ उडाला.

मा.महापौर - हलगी वाजवून निवेदन देता येणार नाही. हलगी बाहेर ठेवा. असे सुचविले.

यावर मा.श्री.उडाणशिवे यांनी सांगितले की, दलित वस्तीसाठी शासनाकडून आलेला निधी अन्यत्र वळविला जात आहे. नगरसेवकांना विश्वासात घेतले जात नाही. सदरचा निधी अन्यत्र खर्च करु नये. हा दलितांच्या हक्काचा प्रश्न आहे.

यावर मा.महापौर यांनी तुमचे प्रश्न आम्हास मान्य आहेत. तथापी हलगी वाजवून निवेदन देता येणार नाही. (त्यानंतरही सभागृहात गोंधळ चालू होता.)

६) मा.श्री.अनंत जोशी - मा.उडाणशिवे हे स्थायी समितीचे सभासद आहेत. तेथे ते त्यांचा वरील प्रश्न मांडू शकतात.

७) मा.श्री.मिलींद गंधे - सदस्य अशा प्रकारे प्रश्न मांडू शकत नाही.

८) मा.श्री.शंकरराव घुले - लोकशाही पध्दतीने ते निषेध व्यक्त करु शकतात. त्यांचे निवेदन यापूर्वी स्विकारण्यात आले आहे.

प्रभारी आयुक्त यांनी सांगितले की, निवेदन दिलेले आहे. स्थायी समितीमध्ये हा प्रश्न असल्याने सदस्य त्यावर निर्णय घेउ शकतात. त्याचप्रमाणे श्री.उडाणशिवे ज्या भागात राहतात तेथील दलित

वस्तीतील सर्व कामे महानगरपालिकेने वेळोवेळी केली आहेत. हलगी वाजविण्याचाच प्रश्न असेल तर सभागृहाने याबाबत निर्णय घ्यावा.

यानंतर सभागृहात गोंधळ झाल्याने मा.श्री.आगरकर यांनीसुचविले की, नियमाप्रमाणे महापालिका सभेचे कामकाज व्हावयास पाहिजे. त्यावरही सभागृहात गोंधळ चालूच असल्याने सभेचे कामकाज दुपारी १.४५ वाजता अर्ध्या तासासाठी तहकूब केल्याचे मा.महापौर यांनी जाहीर केले.

दुपारी २.१५ वाजता सभा पुन्हा चालु झाली.

९) मा.श्री.कृ.द.जाधव - मागील सभा दि.३१-१-२००६ चे ठराव क्र.४ मुकुंदनगर पाणीपुरवठा योजनेबाबत काय कार्यवाही करणेत आली व प्रस्ताव कोणत्या स्टेजला आहे असे विचारले.

यावर श्री.निकम, मेकॅ.इंजिनिअर यांनी खुलासा केला.

यावर पुन्हा श्री.उडाणशिवे यांनी दलित वस्तीतील कामाबाबतचे प्रश्न उपस्थित करुन हे प्रश्न आपणाकडे येत नाहीत. असे सांगितले. यावर बहुतांशी सदस्य उठून उभे राहीले. त्यामध्ये मा.सर्वश्री कृ.द.जाधव, नरेंद्र कुलकर्णी, शंकरराव घुले इ. होते. व सभागृहात गोंधळ चालूच राहील्याने आजची सभा तहकूब करावी अशी काही सदस्यांनी मागणी केली. त्यावर मा.महापौर यांनी सभा तहकूब केल्याचे जाहीर केले. व सभेचे कामकाज संपले.

दिनांक : १७-५-२००६.

**विषय क्रमांक ५** -- स्कीमची संपुर्ण फिल्म डेमो स्क्रीनवर दाखविण्यांत आली. स्कीमची पुर्ण माहिती श्री.कुलकर्णी नगर अभियंता यांनी दिली. १०० सदस्यांची कॅपॅसिटी.

श्री.आगरकर - लिफ्ट कॅपॅसिटी किती खाते प्रमुखांना बसण्याची व्यवस्था आहे काय ? पत्रकारांनाही जागा ठेवावी.

श्री.दिप चव्हाण - जागा किती आहे. ३०७२ चौ.मी. बाजारभाव ४ कोटी २५ लाख आहे.यामध्ये महानगरपालिकेला फक्त ३,४ व ५ व्या मजल्यावर २८ गुंठे जागा मिळते त्यासाठी १ कोटी ६५ लक्ष खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे खाजगी न देता महानगरपालिकेने बांधकाम करावे. ८ कोटी कर्ज घेवुन बांधकाम करावे. बी.ओ.टी.वर दिल्यास उत्पन्न बिल्डरला मिळेल महानगरपालिकेस फायदा होणार नाही. बी.ओ.टी. स विरोध.

श्री.गंधे - फेरस्ट्रेटचे कोणी आले आहे काय ? त्यांनी चुकीची माहिती दिल्याने त्यांची नेमणूक रद्द करावी. नगररचनाकार यांनी चांगली माहिती दिली. त्यामुळे बी.ओ.टी. मंजूर करावे.

श्री.कुलकर्णी , सभापती, स्थायी समिती - श्री.गंधे यांच्या प्रस्तावास अनुमोदन.

श्री.घुले - बेग पटांगणाची जागा कोर्ट केस मधुन सुप्रिम पर्यंत गेली होती. मुंबईच्या कंपनीने चुकीची माहिती दिली. व धोंगडे यांनी चांगली माहिती दिली. नगररचनाकार यांनी दिलेल्या अहवाला प्रमाणे कारवाई करावी. प्रस्ताव मंजूर करावा व गॅरेज, नेहरुमार्केट या ठिकाणी बी.ओ.टी. या तत्वावर अंमलात आणावे.

श्री.पवार - महानगरपालिकेने स्वतः प्रोजेक्ट राबवावा दुस-या एजन्सीला काम देवु नये. गाळयाचे ५ ते ६ लक्ष दरमहा भाडे मिळु शकते. ठेकेदारीस विरोध.

श्री.कावरे - महानगरपालिकेने बांधकाम करावे बी.ओ.टी. वर देवु नये.

श्री.कृष्णा जाधव - कावरेंनी दिलेल्या प्रस्तावास अनुमोदन, महानगरपालिकेने बांधकाम करावे.

मा.श्री.दिप चव्हाण -- जी कंपनी नेमली त्यांनी दिलेला अहवाला पाहता ही कंपनी बोगस आहे. बी.ओ.टी.करत असतांना नगरपरिषदेची परिस्थिती कुमकुवत होती. खर्च फक्त २-५० कोटी पर्यंत जाणार. २० एकर जागा वाडीया पार्कची जागा दिली. आपण तर वाडीयापार्क बांधायला निघालो मग हे का नाही बांधु शकत. मग या प्रोजेक्टचा महानगरपालिकेला किती फायदा होणार. किती भाडे मिळणार.

मा.आयुक्त -- त्य ाला जे मजले देणार त्याची मालकी होणार.

मा.श्री.दिप चव्हाण -- ४ मजले आपल्याला फायदा कमी होणार.एवढी मोठी प्रॉपर्टी माती मोलमध्ये देणार. आपली ऐपत नाही का ? हीच प्रॉपर्टी गहाण ठेवली तर आपणच इमारत बांधुन आपण भाडे

तत्वावर भाडयाने देवु शकतो. आपण का करू शकत नाही. भाडे तत्वावर इमारत बांधा, संस्थेचे उत्पन्न घटवता याची नोंद घ्या. ( बी.ओ.टी. -- विरोध )

मा.श्री.गंधे -- ज्याला नेमले आहे तो आपला किती घात करणार आहे, याची कल्पना करा. त्यास टर्मिनेट करावे. ................ होणार नाही. मंजुर करावा.

कुलकर्णी -- अनुमोदन

मा.श्री.घुले -- अनेक मते मांडली, बेग पटांगण शाळेसाठी आरक्षित होती. परंतु आपण जी जागा मिळवली ज्या पध्दतीने आर्थिक नुकसान दर्शविले सदर टी.पी.चा अभिप्राय पाहता संस्थेचे हित आहे. तेथे एक पीर आहे, त्यासही जागा सोडावी. टी.पी.रिपोर्ट मंजुर करावा. वाडीया पार्क नपाचे हातुन झाले नसते. पण नगरचे एक नाव झाले आहे. वास्तु चांगली उभी राहीली. घरपट्टीचे उत्पन्नातही वाढ होईल. गॅरेज, गाडगीळ पटांगण, नेहरू मार्केट येथेही असे प्रस्ताव तयार करा.

भविष्यात नगरसेवक वाढतील याचाही विचार करावा.

मा.श्री.पवार -- बेग पटांगण मध्यवर्ती ठिकाण आहे. चौकात आहे. उत्पन्नाचे स्त्रोत जळगाव पाहता आपले कमी आहे. उत्पन्नाचे स्त्रोत कमी आणि सर्वच जागा बी.ओ.टी.वर दिल्यास उत्पन्न बुडेल. बाहेरची व्यक्ती रक्कम कमावुन निघुन जाईल. मनपाने हा प्रोजेक्ट स्वतः राबवावा. बी.ओ.टी.ला विरोध.

मा.श्री.कावरे -- जे काही पाहिले तर वाटते हे आपणच बांधावे . कर्ज काढुन बांधावे. बो.ओ.टी.वर नको. विरोध.

........... -- कावरे यांना अनुमोदन ठरावास विरोध.

मा.श्री.सुळ :-- प्रशासनाचे म्हणणे काय .

मा.आयुक्त -- तो तयार नाही हा आपला प्रस्ताव आहे. टेंडर निघणार आहे. क्वॉलिटी पाहिजे. मी फक्त प्रस्ताव दिला. ठराव आपण करावयाचा आहे. चांगली किंमत असेल तर बी.ओ.टी.करणेस हरकत नाही.

मा.श्री.आगरकर -- अनेक मतप्रवाह असु शकतात. लोकशाहीचे लक्षण. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढ , फायदा तोटा पाहता गेल्या ब-याच वर्षानंतर एखादी वास्तु होत आहे. केवळ बी.ओ.टी. कि स्वतः करायचे . बी.ओ.टी.वर का करावे तर थोडा फार इतिहास पाहिला तर ८ आय.डी.एस.एम.टी. चे प्रस्ताव केले होते. एकही झालेला नाही. काहीही असो, कोणतेही काम असो, पाण्याच्या टाकीचा प्रश्न सोडवु शकलो नाही, रस्ते करू शकलो नाही, भुयारी गटर योजना करू शकलो नाही. पवन उर्जा प्रकल्पासाठी कर्ज काढले असते तर जास्त फायदा महानगरपालिकेस झाला असता. घनकचरा संदर्भातही निर्णय घ्यावा लागेल. अनेक शाळा मोकळया पडल्यात. मटन मार्केट मोकळे आहे. ही जबाबदारी महानगरपालिकेस पेलवेल का, मोठे वैभव उभे रहात असेल तर बी.ओ.टी.प्रस्तावास मंजुरी आहे. ( यानंतर सभागृहात गोंधळ निर्माण झाला. )

मा.श्री.दिप चव्हाण -- सभ ागृहात चांगलेच मुद्दे मांडले पण झाले का नाही हे आधी पहा.

मा.श्री.घुले -- राजकारण न आणता सर्वांनी मंजुरी द्यावी.

मा.महापौर -- मते मांडली चांगली. उत्पन्नातही भर पडणार आहे. बी.ओ.टी.ला मंजुरी . .......... अभिनंदन.

मा.श्री.शेळके -- ...............................

**विषय क्र ६ --**

मा.श्री.कावरे :-नगर शहराचा म्हणावा असा विकास झालेला नाही. त्यामुळेच नगर शहराला एक मोठे खेडे म्हटले जाते. शहराचा विकास हा तेथील रस्त्यांवर अवलंबुन असतो. जर शहरातील रस्ते मोठे व चांगल्या प्रतीचे असतील तर दळणवळण मोठया प्रमाणात वाढुन शहराचा दर्जा सुधारण्यांस मदत होते.

याकरिताच शहरातील महत्वाचे ४ रस्ते महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा मार्फत कॉक्रीटीकरण करुन घेणेबाबतचा विषय दिनांक ३१/१/२००६ चे महासभेपुढे घेण्यांत आला होता. परंतु सदर सभेमध्ये हा विषय फेटाळण्यांत आला.

बालिकाश्रम रोड, गुलमोहोर रोड, अमरधाम ते अप्पू चौक लालटाकी व यश पॅलेस ते कोठी रोड हे ४ रस्ते शहरातील महत्वाचे रस्ते आहेत. या ४ रस्त्यांची एकूण लांबी ९ कि.मी. आहे. प्रत्येकी १ कि.मी. रस्त्यास रु.१३.५० लाख खर्च येणार आहे व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास सुपरव्हीजन चार्जेस पोटी १० % रक्कम द्यावी लागणार आहे. याबाबतचा अंदाजे रु.१५ कोटीचा प्रस्ताव आहे. याव्यतिरिक्त रस्ते कॉक्रीटीकरण करणे आधी ड्रेनेज लाईन, पाईप लाईन, टेलीफोन केबल टाकणे, इलेक्ट्रीक पोल हलविणे यासारख्या इतर कामांसाठी अंदाजे रु. १० कोटी खर्च येणार आहे.

सदरचे रस्ते हे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून करुन घेणेच योग्य होईल. कारण त्यांच्याकडूनच रस्ते चांगल्या प्रतीचे होउ शकतील कारण त्यांच्याकडे मोठमोठ्या मशिनरी, टेकनिक आहे. त्यामुळे ते नवीन अद्ययावत तंत्रज्ञान वापरु शकतात. त्यांच्याकडे स्टाफ मोठया प्रमाणात असतो. मटेरियल वाहुन नेणा-या गाडया मोठया असतात. ते तांत्रिक दृष्टया चांगले काम करतात. तसेच हे महामंडळ जागतिक पातळीवरील (ग्लोबल) टेंडर काढु शकते. यामध्ये विविध मोठया कंपन्या येतात. अशा प्रकारे काम करणारे ठेकेदार नगरमध्ये कोणीही नाही. महामंडळा मार्फत रस्ते केल्यास त्यात मोठया एजन्सी येउ शकतात. उदा :- मुंबई मध्ये फ्लायओव्हरचे काम अशाच एजन्सी मार्फत चालु आहे. याकरिता हे रस्ते महामंडळा मार्फतच करुन घ्यावेत. त्यापोटी

त्यांना सुपरव्हीजन चार्जेस द्यावे लागणार आहे. आमदार, खासदार निधी अंतर्गत होणारी कामे पी.डब्ल्यु.डी. कडुन केली तरी ते सुध्दा सुपरव्हीजन चार्जेस घेतात.

याला दुसरा पर्याय म्हणजे केंद्र शासनाचे नवीन योजनेनुसार केंद्र शासन ८० % अनुदान देते. राज्य शासन १० % अनुदान देते. व उर्वरित १० % रक्कम ही महानगरपालिकेला उभी करावी लागणार आहे. या केंद्र शासनाचे योजनेअंतर्गत सुध्दा सदरचे रस्ते करता येउ‍ शकतील.

अहमदनगर शहराचा दर्जा सुधारण्याचे दृष्टीने व विकास होणेकरीता सदरचा विषय मंजूर होणे अत्यंत आवश्यक आहे.

मा.श्री.गंधे -- ४ रस्ते ऐवजी सगळेच रस्ते प्रशासनाने ठेवलेत. केंद्रशासनाकडुन निधी घेवुन राज्यशासनामार्फत प्रस्ताव राबवावा.

मा.श्री.कावरे -- योजना चांगली आहे. महानगरपालिकेचे रस्ते चांगले होतील. महानगरपालिकेचा दर्जा सुधारेल. हा विषय मंजुर करावा. निधी उभारावयाचा तो उभारावा. त्यासाठी खासदार आमदारची मदत घ्यावी.

मा.आयुक्त -- १०० कोटी पर्यंतची कामे घेता येतील.

मा.श्री.पवार -- १० % पैसे भरावयाचे आहेत.

मा.आयुक्त -- आपण भरावे लागणार आहे.

श्री.गंधे -- ५० टक्के केंद्र ,१० टक्के महाराष्ट्र व १० टक्के महानगरपालिकेचा वाटा असल्यास विरोध असल्याचे कारण नाही.रस्ते महामंडळामार्फत सर्व रस्ते करुन घ्यावेत.

श्री.कावरे -- नगर हे मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राचे प्रवेशद्वार आहे.परंतू शहराचा विकास झ ाला नाही.प्रस्तावाप्रमाणे कॉक्रीटचे रस्ते एम.एस.आर.डी.सी यांचेमार्फत करुन घ्यावेत.

मा.महापौर -- केंद्र सरकारकडून एम.एस.आर.डी.सी अंतर्गत येणा-या निधीमधून रस्त्यांची कामे करण्यांस मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक - कावरे अनुमोदक -- गंधे

**विषय क्रमांक ७** चे रिपोर्ट वाचन.

डॉ.सत्रे -- नगरपालिका हद्यवाढ दिनांक १/७/९९ पासून झालेली आहे.३ वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक होते.शासनाने दिलेली मुदतवाढही संपलेली आहे.रिपोर्टातील कारणे संयुक्तीक नाहीत विविध कारणे स्पष्ट करावीत.

१. ठराव नंबर २७ दिनांक २७/३/०३ अन्वये.

२.१० वर्षाची लोकसंख्या का विचारात घेतली.

३.सविस्तर निश्चित केले.

४.टी डी आर झोनिंग केले काय

अहवालाची कॉपी सर्वांना देणे आवश्यक होते.

मा.आयुक्त यांचा खुलासा -- योजनेत सर्व बाबी नमुद आहे टिपणीमध्ये संक्षिप्त माहिती माहिती दिलेली आहे.

मा.आयुक्त साहेब -- तुम्ही विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे अहवालात आहेत तो सभागृहात मंजूर झाल्यानंतर सर्वांना मिळू शकेल.तुर्त नगररचना विभागात आहे.

श्री.गंधे -- अहवाल शहर सुधारणा समितीकडे दिला असता तर अनेक सुधारणाबाबत सुचना करता आल्या असत्या.

श्री.कृष्णा जाधव -- हा विषय एकमताने मंजूर करावा.६ वर्षानंतर योजना पुर्ण झाली आहे.

श्री.कावरे -- नकाशा व रिपोर्ट प्रसिध्द करावा.

श्री.आगरकर -- स्युअरेज प्लॅन्टसाठी जागा सोडली पाहीजे ती सोडली नाही.

श्री.धोंगडे ,नगररचनाकार --- स्युअरेज प्लॅन्टसाठी जागा सोडलेली पाहीजे ती सोडली नाही.तसे दाखवून शासनाकडे पाठवू शकतो.

श्री.वाकळे - ब्रिजच्या जवळ स.नं १३२ नागापुर स्युअरेज प्लॅन्ट सावेडी,बोल्हेगांव नागापुरसाठी ठेवावा.

श्री.शेळके -- स.नंबर १३२ पुर्वी ग्रीन झोन होताआता प्लॅनमध्ये रहिवास झोन दाखवला तेथे पुरनियंत्रण रेषा असून निश्चित झालेली नाही.

श्री.कानडे -- बोल्हेगांवमध्ये शाळा असूनही परत शाळेचे आरक्षण दर्शविले.

श्री.घुले -- परत सुचना हरकतीसह महासभेसमोर येईल.

श्री.दहे -- ६० दिवसात नागरीक व नगरसेवक सुचना व हरकती करु शकतात.

श्री.वाकळे -- हद्यवाढीतील रस्ते दर्शविल्याप्रमाणे होणार नाहीत

श्री.कानडे -- ३३० रिझर्वेशन दाखविलेले त्यामध्ये शॉपींग सेंटरचे जास्त दर्शविलेले आहे.

मा.आयुक्त -- ठराव झाला की प्रसिध्दी देणार इतिवृत्त कायम होणेसाठी थांबणार नाही.

सौ.वर्षा आरिफ --प्रस्ताव प्रसिध्दीस जावून हरकती घेता येणार आहेत त्यामुळे विषय मंजूर करावा.

श्री.शेळके -- स.नंबर ३०५ नदीमध्ये ग्रीन झोन केले.सावेडीमध्ये शेजारी ग्रीन झोन असतांनाही रेसिडेन्सियल झोन केला आहे.

मा.आयुक्त -- ज्या चुका झाल्या असतील त्या चुका दुरुस्त करता येतील.

श्री.दिप चव्हाण -शेळके,वाकळे,कानडे,यांच्या सुचना बरोबर आहेत.परंतू आज दुरुस्त्या करता येणार नाही.प्रसिध्दी पुर्व दुरुस्ती करता येणार नाही.ही कायदयाची अडचण.

महापौर -- ठराव मंजूर .

.......

मा.श्री.गंधे -- आपण हा आराखडा लोकांना , संस्थांना पाहण्यांस ठेवला असता तर अभ्यासा करीता आला.

मा.श्री.कृ.द.जाधव -- ७ वर्ष झाली हा फक्त पब्लीश करावयाचा आहे. मंजुरीस आलेला नाही. आपले आर्थिक नुकसान होते. एकमताने मंजुर करावा.

मा.सौ.सुळ -- विषय ज्या पध्दतीने आला तो चुकीच्या पध्दतीने आला उशीर आला.

मा.श्री.चव्हाण -- ३ वेळा मुदतवाढ दिली होती.

मा.महापौर -- १२ गावची कामे करण्यासाठी .................... नेमला त्याचे काम पुर्ण झाले आहे. तो आराखडा मंजुरीसाठी आहे. त्यास मंजुरी द्यावयाची आहे.

मा.श्री.पवार -- बुरूडगांव वगळण्यांचा ठराव महानगरपालिकेने पाठविला त्याचे काय झाले.

मा.महापौर -- तुम्हीच ठराव करून मागितला .................................. तुम्हीच पहा.

मा.श्री.घुले -- फक्त माहितीसाठी आहे.

मंजुर.

मा.श्री.कावरे -- प्रसिध्द करण्यात यावे.

मा.श्री.आगरकर -- स्युअरेज प्लँटकरीता जागा सोडली पाहिजे.

मा.आयुक्त -- सर्व रिव्हीजन केलेली आहे.

नगररचनाकार -- स्युअरेज.

मा.श्री.वाकळे -- वाढीव हद्दीत १३२ मध्ये स्युअरेज प्लॅन्ट द्यावा.

मा.श्री.शेळके -- पुर नियंत्रण रेषा निश्चित नाही. ( सभागृहात गोंधळ निर्माण झाला.)

मा.श्री.वाकळे -- बोल्हेगांव

मा.श्री.गंधे -- हा प्लॅन खुला होता. सुचना आजही करता येतील.

मा.श्री.वाकळे -- बोल्हेगांव , नागापुर रस्ता नाही तो करावा.

मा.आयुक्त -- सुचना करा.

नगर रचनाकार -- सुचना आल्यास बदल करू शकतो.

मा.श्री.कानडे -- प्राथमिक शाळा ६४ / १ शाळेसाठी परत आरक्षण टाकले दुरूस्त करावे.

मा.श्री.घुले -- ......................... देत आहोत. अंतिम मंजुरीसाठी लेखी सुचना देवु शकतात.

नगर रचनाकार -- ६० दिवसासाठी हरकतीसाठी कोणताही पार्ट प्लॅनला घेवु शकता. ......................................

मा.श्री.वाकळे -- १२ रस्ते .............. दाखविले ते काम होईल का तेथे लेआउट पडलेत.

मा.आयुक्त -- हे नियोजन आहे, सुचविलेला प्रस्ताव आहे.

मा.श्री.कोतकर -- सुचना लेखी असाव्यात का ६० दिवसात हरकत नोंदावी.

मा.श्री.कानडे -- शॉपिंग कॉम्प्लेक्स २६ / ६ येथे शॉपिंग कॉम्प्लेक्स आरक्षण घ्यावे.

मा.श्री.वाकळे -- ज्या सुचना करू त्या प्रसिध्दी पुर्व विचारात घ्याव्यात.

मा.श्री.कृ.द.जाधव -- इतिवृत प्रसिध्द झाल्यावर देणार का ?

मा.आयुक्त -- इतिवृत्तासाठी थांबणार नाही.

नगर रचनाकार -- प्रसिध्दीपुर्वी हरकती सुचनांची दखल घेतली जाणार नाही.

मा.श्री.दिप चव्हाण -- प्रसिध्दीपुर्व सुचना करता येईल का

नगर रचनाकार -- प्रसिध्दीपुर्व कुठलीही सुचना विचारात घेतली जाणार नाही.

मा.श्री.कानडे -- नगर रचना प्लॅनची नेमकी प्रक्रिया काय नगर रचनाकाराची नेमणुक महाराष्ट्र शासन करते, नियम दाखवा.

नगर रचनाकार यांनी कायदा वाचुन दाखविला.

मा.श्री.वाकळे -- दुरूस्त्या करून प्रसिध्दी द्यावी असा ठराव करावा.

मा.श्री.कानडे -- .............................................................

नगर रचनाकार -- मुळ जनतेला तो पाहावयास ठेवला आहे. तेंव्हा बदल करून प्लॅन प्रसिध्द करता येणार नाही.

मा.सौ.वर्षा आरिफ -- विषय सरळ आहे. प्रारूप योजना प्रसिध्द करणार आहोत त्यावर हरकती येणार आहेत हा विषय मंजुर करण्यास हरकत नाही.

मा.श्री.शेळके -- कुलकर्णी यांनी बरेच बदल केले. सिना नदी ग्रीन झोन उठविले , शेतक-यांचे ग्रीन झोन उठविले नाही. बिल्डरचे ग्रीन झोन उठविले. शेतक-यावर अन्याय करता ३०५ .........सर्व ग्रीन झोन पण बिल्डरने जागा घेतली तर ग्रीन झोन उठविला.

मा.श्री.घुले -- नगररचनाकाराचे अहवालावर सदस्यांच्या भावना आहेत सदस्यांच्या सुचनांचा विचार करणार का.

नगर रचनाकार -- संबंधित मालकाचा अर्ज आल्यावर अर्जाची शहनिशा करून दिली पाहिजे. मात्र बदल केला जातो.

मा.श्री.दिप चव्हाण -- सर्व सदस्यांनी मांडलेल्या दुरूस्त्या आज करता येणार नाही. मुद्दे रास्त आहेत पण आज दुरूस्त्या करता येणार नाही.

मा.महापौर - प्रसिध्दीपुर्व दुरूस्त्या करता येत नाही. हा प्लॅन प्रसिध्द करावा.

--**--

**<u>विषय क्रमांक ८ :--</u>** विषय मंजुर करतो, निष्पन्न होते का ?

मा.आयुक्त :-- पुर्वीचे प्रस्तावात निधी कमी दिला होता. म्हणुन २ रा प्रस्ताव केला.

मा.श्री.सुळ -- मंजुरी कधी येणार ? अधिकारी पैसे आणणार याची खात्री आहे का ?

मा.आयुक्त -- हा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविला आहे.

मा.श्री.सुळ -- प्रशिक्षण घेवुन येणा-या अधिका-याने पुर्ण प्रशिक्षण घेतले का ?

मा.श्री.कानडे -- विषयात काय अंतर्भुत केले.

आर.सी.एच. I का II आहे.

वैद्यकिय आरोग्याधिकारी -- II आहे.

मा.श्री.कानडे -- आर.सी.एच.कमिटी केली होती का ? आता जी नेमणुक करावयाची पैठणकरला प्रशिक्षणासाठी पाठविले त्यांनी ट्रेनिंग कंम्प्लीट केले का ?

मा.आयुक्त -- बदलाला मंजुरी घेत आहोत.

मा.श्री.कानडे -- कर्मचा-यांच्या पगाराचा प्रश्न होता.

मा.आयुक्त -- ऑफिस नोट मध्ये पुर्ण माहिती आहे.

मा.श्री.कानडे -- आपले कर्मचा-यांची नेमणुक करा.

श्री.पैठणकर -- प्रशिक्षण पुर्ण झाले आहे, MSC Public Helth II nd Year पुर्ण केले नाही.

मा.श्री.कानडे -- यांचे अर्ज MHC Helth साठी आहे. आता ते सांगतात पब्लीक हेल्थसाठी महानगरपालिकेस Public Helth साठी कर्मचारी हवा. सभेने निर्णय घेवुन प्रशिक्षणास पाठविले तो कोर्स पुर्ण न करता ( पगारी रजा घेवुन ) व्यर्थ खर्च झाला आहे. सभागृहाची कोर्स बाबत दिशाभुल. महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केले आहे. सभेचा कोणताही आदेश नसतांना ते हजर राहतात.

मा.श्री.गंधे -- मागील जनरल बोर्डमध्ये पैठणकर यांना मंजुरी दिली आहे. व्यक्तिगत आकस असेल तर त्यास आमचा विरोध आहे. फी दिली गेली नाही म्हणुन ते कोर्स न करता परत आहे. ( गोंधळात ऐकु आले नाही.)

मा.श्री.चव्हाण -- विषयावर बोलायचे की, पैठणकरांवर बोलायचे हे आधी ठरवा.

मा.आयुक्त -- पैठणकर वआर.सी.एच.याचा संबंध नाही.

मा.श्री.कानडे -- किती कर्मचारी लागतात आपल्याकडे कर्मचारी आहेत ते काम करू शकत नाही का ?

वैद्यकिय आरोग्याधिकारी -- आजची मंजुर पदे कमी पडतात त्यामुळे जादा जागेची आवश्यकता आहे.

मा.श्री.कानडे कोर्स पुर्ण का केला नाही. झालेल्या खर्चाचे काय त्यांनी केलेला कोर्स व आपणांस अपेक्षित असलेला कोर्स यात तफावत दिसुन येते. याची चौकशी करावी.

मा.श्री.गंधे -- आरोग्याधिकारी नंतर कोण आहे.

मा.आयुक्त -- MOH नंतर उपआरोग्याधिकारी व दवाखान्यासाठी वैद्यकिय अधिकारी आहे.

मा.श्री.गंधे -- मुळ प्रस्ताव तयार करण्यासाठी कोणाला काय दिले होते त्यास काही पैसे दिले काय असे एकुण २ लाख रू.दिलेत येथील अधिका-यांनी काहीही काम केले नाही. इतर ठिकाणी आर.सी.एच.प्रकल्प सुरू झाले आहे. येथे अद्यापही सुरू नाही.

मा.श्री.चव्हाण -- टप्प्या - टप्प्याने कामास वेळ लागेल. ५ वर्षानंतर त्यांना २५ कर्मचा-यांना पोसावे लागेल. त्याचा खर्च किती ? भविष्यात हा विषय मंजुर केल्यावर यात शासनाचे चिकित्सा अधिकारी म्हणुन नेमणुक होणार का ? सर्व डी.ए.भत्ते पगार यांचे पगार ४० लाखापर्यंत खर्च वाढणार मग यात तुम्ही मनपाचे ....................................आज दवाखान्याची काय परिस्थिती आहे. नपा शाळेत मुले जात नाहीत. तशीच परिस्थिती आर.सी.एच.ची होवु नये. या क्षेत्रातील .....................................
अभिप्राय घ्या चांगले काम करा.

मा.आयुक्त -- शासनाकडे मिटींग झाल्यास पुर्वी पेक्षा निधी कमी झाला आहे.

मा.श्री.चव्हाण -- कुलकर्णी आजारी असल्याने पैठणकरला ट्रेनिंगला पाठवायचे असा ठराव झाला. पुढील वर्षी त्यांना नाकारले यात त्यांचा काही दोष आहे.

मा.आयुक्त -- बाहेरच्या उपनगरात आरोग्यसेवा नाही, त्यामुळे हा विषय महत्वाचा आहे.

मा.श्री.घुले -- कुलकर्णी कोठे दिसत नाही.

मा.श्री.गंधे -- असे ४०० ते ५०० कर्मचारी आहेत की जे फक्त सहया करतात व घरी जातात.

मा.आयुक्त -- गेल्यावेळी स्पेशल व्हिजीट देवुन कारवाई केली आहे.

मा.श्री.शेळके -- अशी जबाबदारी खाते प्रमुखांवर द्या व व्हीजीट द्यायला सांगा.

मा.आयुक्त -- कुलकर्णी कारवाई करणार.

मा.श्री.शेळके -- विषय असतांना गैरहजर

मा.श्री.आगरकर -- एम.ओ.एच.रोज कोठे आहे याची माहिती नसते. स्मार्ट कार्डचे केल्यास फरक पडेल.

--**--

**<u>विषयक्रमांक ९</u>** ते पुढील सर्व मंजुर.

तडवी

चर्चा -

श्री.दिप चव्हाण - महालक्ष्मी उद्यानामध्ये घडलेली घटना अत्यंत गंभीर आहे.घडलेल्या घटनेत एका पत्रकाराची मुलगी होती.शेंडगे यांना निलंबीत करणेऐवजी डिसमीस का नाही केले.

आयुक्त - चौकशी अंती अहवाल प्रक्रीया पुर्ण झाल्यावर शिक्षा देण्याची कारवाई करणेत येईल.

श्री.दिप चव्हाण -- यात चुक कोणाची होती.व बळी कोणाला देण्यात आले.

आयुक्त - सिटी इंजिनिअर यांच्या अहवालावर कारवाई करणेकत यावी.

श्री.दिप चव्हाण -- सदचा अहवाल त्यांनी केलेला नाही.तसेच सदर उद्यानाचे पेमेंट झाले का ?

सिटी इंजिनिअर -- पार्ट पेमेंट झाले आहे.

श्री.दिप चव्हाण - उत्तर चुकीचे आहे.एम.बी चे रेकॉर्ड चुकीचे आहे.टेस्ट रिपोर्ट घेतलेला नाही. बाग परिपुर्ण ताब्यात न घेता घाई घाईत उदघाटन करणेत आले.लाईटच्या बाबतीत आर्थींग केलेले नाही.यावर सावळे इंजिनिअर यांनी उत्तर दयावे.

श्री.सावळे - पाच पोलला दुसरे दिवशी आर्थी ंग केली.

श्री.दिप चव्हाण - ज्या लोकांचा बागेशी संबंध नाही अशा लोकांची त्यांची नेमणूक करता हे चुकीचे आहे.सदरची फाईल दुसरे कुणीतरी हॅण्डल करीत आहे.

मा.आयुक्त - शॉक बसणेची घटना उदघाटनाचे अगोदर श्री.सावळे यांचे लक्षात आली होती.त्यावर श्री.शेंडगे यांनी काम करुन घेणे आवश्यक होते.त्यांनी ते केलेले नाही.म्हणून त्यांचेवर निलंबनाची कारवाई करणेत आली.

श्री.दिप चव्हाण -- घटना घडल्यावर सर्व पदाधिकारी तेथे गेले.वास्तवीक सदरची बाब सावळे यांचे अगोदरच लक्षात आली होती त्यावेळेस काम करुन घेणे गरजेचे होते.याचा अर्थ आपण ठेकेदारास पाठीशी घालत आहात.

मा.आयुक्त - पुर्ण चौकशी अंती ठेकेदाराचे निकष अपुर्ण असल्यास ठेकेदारावरही कारवाई करणेत येईल.

श्री.दिप चव्हाण - शेंडगे यांची केडर काय आहे त्याचे काय काम आहे.याचा विचारन करता त्यास निलंबीत करणेत आले.तेव्हा त्याला त्वरीत कामावर घ्यावे आणि टेस्ट रिपोर्ट घेण्याची ज्या कोणाची असेल त्यांचेवर कारवाई करावी.आदल्या दिवशी शॉक बसल्याची घटना घडली होती.मग सावळे यांनी काय पाहीले.त्यांचेवर कारवाई करावी.

श्री.अशोक कानडे -- सावळे यांचा रिपोर्ट वाचावा.विषय बराच गंभीर आहे.

श्री.दिप चव्हाण -- सदरचे प्रकरण कोणाकडे आहे.

सिटी इंजिनिअर - प्रकरण माझेकडे असून चौकशी कमेटीने दोषी कोण आहे हे पाहून कारवाई केली.

श्री.मिलींद गंधे -- कोण दोषी आहे याचा निर्णय झाला पाहीजे.

त्यावर श्री.कुलकर्णी यांनी चौकशी अहवाल वाचून दाखवीला.

श्री.कानडे -- काम पुर्ण करुन घेण्याची मुदत काय होती.

सिटी इंजिनिअर -- ऑगस्ट अखेर

श्री.गिरवले -- ठेकेदारावर कारवाई करता येणार नाही कारण मुदत ऑगस्ट पर्यत आहे.महानगरपालिकेने पोलला आर्थींग लावलेले आहे.बागेचा ताबा बळजबरीने घेतला आहे. काम अपुरे असल्याबद्यल ठेकेदाराचे पत्र आहे.

श्री.दिपक सुळ -- काम पुर्ण केले नसतांनाही राहीलेले बील का दिले.

श्री.दिप चव्हाण ङ हॅन्ड ओव्हरचे पत्र दाखवा.

श्री.कृष्णा जाधव -- ताब्यात घेतांना इंजिनिअर यांचेकडून तपासून घेतले होते काय ?

मा.महापौर -- शेंडगे यांना ताबडतोब हजर करुन घेवू.

श्री.आगरकर -- संपुर्ण चर्चा सभागृहात झाल्यानंतरच निर्णय घ्यावा.

दुपारी १.५३ वाजता गोंधळ कोण काय बोलते हेच कळत नाही.

महापौर -- सर्वांनी विचार मांडल्यानंतर निर्णय घ्यावा.

श्री.गंधे - आय.ए.एस अधिका-यांनी योग्य चौकशी करावी.त्यांचेकडून चांगल्या अहवालाच्या अपेक्षा.

श्री.घुले -- या सभागृहात किरकोळ गोष्टीवरुन सभा तहकुब करु नये.महत्वाचे विषय असतांना व शासन अनुदानाचे विषय आहेत त्यामुळे सभा तहकुब करु नये.

श्री.शेंडगे बाबत चौकशी होवून नंतरच कामावर घ्यावे.घाबरुन कोणाचे दबावाला बळी पडून निर्णय घेणे योग्य नाही.

श्री.कावरे - महालक्ष्मी उदयान संबंधी शॉक बसलेबद्यल ३ लोकांवर कारवाई केली ही घटना दुदैवी आहे.तीन लोकांवर कारवाई झाली पाहीजे.श्री.सावळे,श्री.गोयल व शेंडगे यांचे विरुध्द कडक कारवाई करावी.शेंडगे यांना कामावर घ्यावे.विकासाची कामे मंजूर करावीत.

सौ.सत्रे -- महालक्ष्मी गार्डन मधील घटना दुर्दैवी आहे.काम अपुर्ण असल्याबाबत मी कळविले होते.परंतू घाई घाईने उदघाटन केले.आवश्यक त्या दुरुस्त्या लवकर कराव्यात असेलेल्या असुविधाबाबत आयुक्तांना पत्र दिले आहे.त्याबाबत कार्यवाही व्हावी.पार्कींग साठी जागा नाही.लॉन जळालेली आहे.कंप्लेशन नसतांना ताब्यात का घेतले.

श्री.नामदेव पवार - एम.एस.ई.बी ला टेस्ट रिपोर्ट केला काय

सावळे -- आहे त्याच लाईनवरुन कनेक्शन घेतले आहे.

श्री.नामदेव पवार -- श्री.शेंडगे यांना नाहक बळी दिले त्यांचेवरील अन्याय दुर करावा शेंडगेवरील कारवाई मागे घ्यावी.

श्री.त्रिपाठी -- चर्चेवर हा प्रश्न सुटणार आहे काय ? सी बी आय चौकशी केल्यास मोठा अधिकारी घरी जाईल.

श्री.कानडे -- सभागृहात आमच्या भावना मांडण्याचा आमचा अधिकार आहे.महालक्ष्मी उद्यान कामात ४० लक्ष रुपये भ्रष्टाचार झाला .प्रशासन मनमानी करते.भ्रष्ट्राचाराचे विषय यापुर्वी वेळोवेळी दिले.त्यावर तत्परता का दाखवू शकले नाही.अंतर्गत सुधारणा का केल्या नाही. विषय मंजुर झाले असतांनाही कामे होत नाही. दलित वस्तीतील कामे सभेपुढे येणे आवश्यक होते.

मा.आयुक्त -- लेखी अहवाल आल्याशिवाय तोंडी उत्तर देणार नाही.

श्री.वाकळे -- अहवालाला उशीर का झाला.

मा.उपायुक्त (देशमुख )-- कालच अहवाल सादर केला.नोव्हेंबर डिसेंबरमध्ये जकातीबाबत आंदोलन झाले.विविध ठिकाणी हेअरींग झाले त्यामुळे अहवालास ४ ते ५ महिने दुसरे काम करता आले नाही.

मा.आयुक्त -- उपायुक्तांनी दिलेले कारण संयुक्तीक आहे.

श्री.कानडे -- श्री.उडाणशिवे यांचे मानहानीबद्यल दिलगीरी व्यक्त करावी.

उडाणशिवे यांना विषयाची आस्था होती तर ते स्थायी समितीत का हजर राहीले नाहीत.महालक्ष्मी उद्यानाबाबत समिती नेमली होती त्याचे काय झाले.

पहाणी अहवाल वाचून दाखविणेत आला.पाहणी अहवाल डावलून महालक्ष्मी उद्यानाची काय कामे केली.

श्री.चोपडा -- घटना दुर्दैवी ,यापुढे असे होवू नये यासाठी दक्षता घ्यावी.सुचना पुस्तके ठेवावे.स्वयंसेवी संघटनेस किंवा ठेका पध्दतीने उद्यान चालविणेस दयावे.

श्री.नामदेव पवार -- उद्यानाची फी २ रुपये करावी.

मा.आयुक्त -- मेन्टेनन्स व्हावे व चांगले गार्डन व्हावे म्हणून बहुतांशी नगरसेवकांच्या फी लावणेबाबत सुचना केलेल्या आहेत का ? फी नाममात्र आहे.

मा.महापौर -- झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी आयुक्तांनी करावी.आदेशाचे पालन होत नाही.किरकोळ कामे होत नाहीत एक एक वर्ष फाईलवर निर्णय होत नाही.दररोज आयुक्तांनी नगरसेवकांशी चर्चा करावी.

शेंडगे यांचे निलंबन मागे घ्यावे.

विषय क्रमांक १ :-

मा.श्री.गिरवले -- २०/२/०६ चे बजेटबाबतचा ठरावा वाचावा. प्रत्येक नगरसेवकाची १५ लक्ष दिले त्याप्रमाणे १०.५० कोटी तरतूद आवश्यक मात्र तुम्हीच दिलेल्या यादीनुसार फक्त ८ लक्ष रुपये दर्शविले आहे.ही तफावत कशी महापौर निधी रद्य केले असे सांगीतले परंतू ठरावात नमुद नाही.त्याची नोंद घ्यावी.

मा.आयुक्त -- जकात कराचे दरामध्ये कपात केलेली आहे त्यामुळे जकात कमी दर्शविली आहे.

श्री.कृष्णा जाधव -- कामाची आवश्यकता पाहून नगरसेवक निध मा.आयुक्तांच्य मान्यतेने मंजूर करावी.प्रत्यक्ष का आवश्यक ते नुसारच काम करावे.

श्री.जोशी -- शासन परिपत्रक मा.सदस्यांना पाठवावे अशी तरतूद आहे काय .

मा.महापौर -- शासनाचे परिपत्रक सर्व सदस्यांना दयावेत.

श्री.गंधे -- शासनाचे परिपत्रक देण्याची जबाबदारी कोणाची

मा.आयुक्त -- शासनाचे निर्णय / परिपत्रक येतील ते महासभेपुढे त्या त्या महिन्यात ठेवावे.

श्री.कानडे -- मनमाड रोड ,बोल्हेगांव फाटा ते राघवेंद्र स्वामी मंदीर ते बोल्हेगांव रस्ता रुंदीकरण,मजबुतीकरण व डांबरीकरण याचा ठरावात समावेश करावा.

मा.महापौर -- वरील दुरुस्ती करावी.

श्री.कावरे -- सर्व नगरसेवकांना प्रत्येकी १५ लक्ष रुपये द्यावेत.कारण जकात चालू झाली व घरपटटी व पाणीपटटी चांगली वसुली आहे.

श्री.संदीप कोतकर -- उपनगर व शहर विभाग अशी विभागणी करावी.उपनगरात जास्त कामाची आवश्यकता असल्यामुळे तेथे जास्त निधी द्यावा.वस्तूस्थितीचा विचार करुन निर्णय घ्यावा.

श्री. सुळ -- तेंदु पानाची जकात रद्य करावी.अशी मागणी केली होती.त्याचा उल्लेख ठरावात नाही.तसेच इले.मोटारी व पन्हाळी पत्रे बाबत चर्चा झाली नसतांनाही त्याचा उल्लेख ठरावात आलेला आहे. तेदूंचे पानावरील जकात पुर्ण माफ करावी.

श्री.जोशी - इतिवृत्त कायम झाले नसतांनाही शासनाकडे ठराव कसा पाठविला व त्यास मंजूरी कशी आली. इतिवृत्त झाले नाही असे नगरसचिव सांगतात.

मा.आयुक्त - इतिवृत्त कायम झाल्या नंतरच ठरावाची अंमलबजावणी करावी अशी तरतुद नाही.

श्री.गंधे - नगरसचिवांनी चुका करु नये.

श्री.आगरकर - विषय कायम करणेसाठी आहे. त्यामुळे दुरुस्त्या करता येतील. चुका दुरुस्त करता येतील व प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

१.मल्हार चौक ते खोकर नाला

२.आयुर्वेद पासून काटवन खंडोबा रस्ता खोकर नाल्यापर्यत.

तसेच मागील ठरावात आनंद हॉस्पीटल रस्त्यांपासून याऐवजी युनायटेड वेस्टर्न बँक पासून अशी दुरुस्ती करावी.

श्री.कृष्णा जाधव - ठेकेदाराची अडचण येईल काय ? नगरसेवक निधी हा निवडुन आलेल्या नगरसेवकांना द्यावा. स्विकृत सदस्यांना देउ नये.

मा.महापौर - इतर महानगरपालिकां बाबत माहिती घेवुन ठेवावी.

श्री.गिरवले - १० ते १५ रस्ते घेतलेले आहे.६ कामांचे टेंडर्स काढले. पुन्हा टेंडर्स काढले अटी असतांना मारुती कंपनीचे कागदपत्र नसतांना टेंडर्स उघडलेच कसे? कागदपत्रास मुदतवाढ देण्याची तरतुदच नाही. वाबळेंचे पत्र जोडले होते. करारनामा जोडणे आवश्यक होते. अशा पध्दतीने टेंडर्स घेत असतील तर ते योग्य नाही.

मा.उपायुक्त यांचा खुलासा -

श्री.कृष्णा जाधव - फेर टेंडर्स मध्ये कमी दर आले आहेत त्यामध्ये १३ ते १४ लाखांचा फायदा होतो. त्यामुळे महानगरपालिकेचे हित पाहुन योग्य निर्णय घ्यावा. कमीचे टेंडर मंजूर करावे.

श्री.दिप चव्हाण - स्थायी समितीच्या शिफारशी नंतर महानगरपालिका सभेपुढे बजेट आले होते. दर बदल केले म्हणुन शासनाकडे पाठविले. शासन परिपत्रका प्रमाणे बजेट का तयार केले नाही. २०/२/२००६ नंतर बजेट परत मांडता येणार नाही. कायद्यात तरतुद नाही. ३ लाखांची कामे सन २००५-२००६ च्या सुधारित बजेट मध्ये खर्ची टाकले आहे. ऑडीटचा शेरा २००५-२००६ साठी नाही. मात्र टेंडर मार्च २००६ नंतरचे जकात ठेकेदार नगरसेवकांच्या विरुध्द स्टेटमेंट करतो त्याला कशाचा ठेका दिला आहे. नविन दर - कर लवकरात लवकर कायदेशिर बाबींची पुर्तता करुन लागु करावेत. ठेकेदाराला महानगरपालिके विरुध्द स्टेटमेंट करणे पासुन थांबवावे. निविदा उघडल्या नंतर कागदपत्र नसतील तर टेंडर रद्द करावे.

श्री.आगरकर - ठेकेदार बेजबाबदारपणे विधाने करतो त्यामुळे त्याची सी.आय.डी.चौकशी लावा.

श्री.गंधे - रस्त्यांच्या कामामध्ये मिस्कीनमळा रोड आहे. त्यामध्ये चैतन्य नगर रस्त्याचाही समावेश करावा. १० मिनीट सभा तहकुब करुन विकास कामांसाठी १५ लक्ष देणार काय ? हे तपासुन निर्णय / रुलींग द्यावे.

मा.महापौर - १० मिनिटे सभा तहकुब.

६-१० वां.सभा पुन्हा सुरु.

मा.महापौर - चर्चा केली. प्रत्येक नगरसेवकांना ८ लक्ष द्यावेत.

श्री.जोशी - डी.एस.आर. चा प्रश्न व इतर बाबी विचार करता माझे वॉर्डातील सर्व कामे ८ लाखांचे डिपार्टमेंटली करावीत. प्रेमदान हडकोत पावसाचे पाणी साचते. वेदांन्तनगर येथेही पाणी साचते.

श्री.कृष्णा जाधव - रु.८ लक्ष नगरसेवक निधी आयुक्तांनी मान्य केले काय ?

मा.आयुक्त - होय.

श्री.आगरकर - ठेकेदाराने राजकारण करु नये . तसेच तो ४० रु. १० रु. वसुल करतो. त्याबाबत सी.आय.डी. चौकशी करावी.

मा.महापौर - आगरकर यांचे मागणी प्रमाणे सी.आय.डी.चौकशी करणेंत येईल.

मा.आयुक्त - महानगरपालिकेच्या कायदे सल्लागार यांचा सल्ला घेवुन कारवाई करण्यांत येईल.

विषय १ मंजूर.

-------------------------------------------------------------

श्री.आगरकर - १. आयुर्वेद हॉस्पीटल ते खोकर नाला २. अर्बन बँक ते या रस्त्याचा समावेश करा.

विषय क्रमांक - २ दुखवटा.

श्री. घुले - प्रश्नोत्तरे घेतली जातात किंवा नाही.

मा.आयुक्त - प्रश्नोत्तरे येथुन पुढे घेवु.

मा.महापौर - खाते प्रमुखांना ७ दिवसांत उत्तर द्यावे.

विषय क्रमांक - ३ नियम -

श्री.दिप चव्हाण - १. सभा घेतली नाही तर तरतुद नाही. तसेच काही अधिकार प्रशासनाकडे आहे. अभ्यास व सूचना यासाठी १ महिना तहकुब करावा.

श्री.कानडे - महत्वाचा विषय आहे. ब-याच बाबी नियमात आल्या नाहीत इतर महानगरपालिकेची माहिती घ्यावी. फक्त महिला व बाल कल्याण समिती दर्शविली. आरोग्य, बांधकाम, शहर सुधारणा समिती, गृहनिर्माण समिती, स्थापन करण्यांबाबत तरतुद नाही. सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यांसाठी कमिटी स्थापन करुन त्यांनी इतर महानगरपालिकांना व्हीजीट देवुन, पाहणी करुन सक्षम नियम करावेत.

मा.महापौर - पुढील मिटींग पर्यंत तहकुब तत्पुर्वी नगरसचिवांकडे सूचना कराव्यात

----------------------------------------------

विषय क्रमांक ४ मंजूर.

----------------------------------------------

विषय क्रमांक ५ -

०००००००००००

श्री.सुळ -- ऑफीसचा प्रस्ताव काय आहे.

मा.आयुक्त -- बी ओ टी वर महानगरपालिकेचा फायदा होईल.तांत्रीक कर्मचारी आपल्याकडे नाही.इतरही प्रकल्प कर्ज घेवून करावे लागतील.त्यामुळे हा प्रस्ताव बी.ओ.टी साठी चांगला आहे.

श्री.आगरकर -- योजनेमुळे महानगरपालिकेस फायदा झाला पाहीजे.बीओ टी पाण्याच्या टाक्या बांधू शकत नाही.२००१ नंतर डी.एस.एम.टी चा एकही प्रकल्प पुर्ण झाला नाही.पवनउर्जा प्रकल्पही झाला नाही.हे प्रोजेक्ट पुर्ण होवू शकले नाही.श्री.दिप चव्हाण यांचीच अद्यायावत सभागृह व कार्यालय असावे अशी इच्छा होती.महानगरपालिकेकडून प्रकल्प पुर्ण होणे शक्य नाही त्यामुळे बी ओ टी वर हा प्रकल्प करावा.

श्री.घुले -- महाराष्ट्र शासनही रस्ते व इ. बी.ओ.टी वर काम करते.त्यामुळे बी.ओ.टी चा ठराव एकमताने मंजूर करावा.मवासी साहेब यांचे अभिनंदन करावे.

महापौर - निर्णय बी.ओ.टी वर करण्यांस मंजुरी.

००००००

विषय क्रमांक ६

००००

विषय क्रमांक ७.

००००००

विषय क्रमांक ८

श्री.सुळ -- एप्रील ०४ मध्ये शासनाचे पत्र आले होते.प्रस्ताव पाठविला फक्त ठराव शासनाकडे पाठवतो.

मा.आयुक्त -- पुर्वी ५ कोटीचा प्रस्ताव पाठविला होता आता तो १ कोटी ९९ लाख रुपयाचा आहे.त्यासाठी सुधारीत ठराव आवश्यक आहे.

श्री.सुळ -- ठराव पाठवतो शासनाकडून निधीसाठी सक्षम अधिकारी नेमावा.पैठणकर प्रशिक्षणास गेले होते तो त्यांनी पुर्ण केला काय ? अर्धवट केला असल्यास नुकसान कोणी भरावयाचे.

श्री.कानडे -- या योजनेत काय काय अंतर्भुत आहे.आता जी मंजुरी घेतो त्यामध्ये कर्मचा-यांच्या नेमणूका करावयाच्या आहे काय ?

मा.आयुक्त - ४ डॉक्टर,१४ नर्सेस, ७ सुपरवायझर ,आवश्यक आहेत.

श्री.कानडे -- नविन कर्मचारी नेमण्याऐवजी सध्याचा स्टाफ नेमावा.श्री.पैठणकर यांना पगारी रजा दिली होती.त्यांचेवर लाखो रुपये झाला.त्यामुळे संस्थेचे आर्थिक नुकसान झाले आहे.याबाबत कोणाला जबाबदार धरणार किंवा नाही.

आर सी एच मध्ये कर्मचारी नेमणूकीचा विषय आहे.

श्री.मिलींद गंधे -- रिपोर्टात बोरगेचा समावेश आहे.आर.सी.एच प्रोजेक्टसाठी एजन्सी नेमली होती काय व त्यावर काही खर्च झाला काय त्यावर एक लाख खर्च झाला आहे.

श्री.दिप चव्हाण -- महानगरपालिकेला पोसावे लागेल त्याचा खर्च किती.

श्री.जगताप -- साधारण रुपये २८ लक्ष महानगरपालिकेस करावा लागेल.

श्री.दिप चव्हाण -- नाहक ३० ते ४० लक्ष खर्च महानगरपालिकेस वाढेल.

श्री.घुले -- श्री.कुलकर्णी आरोग्याधिकारी गैरहजर आहेत ते रजेवर आहेत का याचा खुलासा करावा.

श्री.जगताप -- सोमवार पासून ते गैरहजर आहेत.

मा.आयुक्त -- जेवढे दिवस गैरहजर असतील तर त्यांची बिनपगारी करणेत येईल.

श्री.आगरकर -- सावेडीला दोन फोन आहेत.शहरात इनकमींग आहे.रुपये १०००/- पर्यंत फोनची मर्यादा ठेवावी.

ठराव मंजूर.

ooooooo

विषय -- ९

श्री.गंधे -- नावामध्ये खलीफा यांचे मुळ नावाचाही बोर्डावर उल्लेख करावा.

महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचा विकास योजना आराखडा प्रसिध्द करण्याबाबत साधक बाधक चर्चा झाली.या व्यतिरिक्त लेखी सुचना देखील सभागृहात मागण्यात आल्या त्यानुसार श्री.बहिरनाथ तुकाराम वाकळे,विरोधीपक्ष नेता,अहमदनगर महानगरपालिका यांनी लिखीत स्वरुपात सदर आराखडयाबाबत लेखी सुचना व आवश्यक दुरुस्ती यांचा उहापोह केला आहे.यास्तव या सर्व बाबी पुढील तक्त्या प्रमाणे

| आरक्षण क्र. | आरक्षण | सुचविलेल्या दुरुस्त्या |
|---|---|---|
| ९ | P.S.H.S & P.G | या आरक्षणातील उत्तर बाजूचा ०.६८ हेक्टर भाग वगळणे |
| १२ | P.G | हे आरक्षण येथून वगळून आरक्षण क्र.१० व ११ वर ठेवणे |
| ४४ | S.C | या आरक्षणापैकी सावेडी स.नं २३९ मधील आरक्षण वगळावे. |
| ४८ | Super Market & Parking | या आरक्षणापैकी पुर्व बाजुकडील भिस्तबाग सर्व्हे नं.२६/१० वरील आरक्षण वगळावे. |
| ५१ | Town Hall | हे आरक्षण येथून वगळावे व नागापुर सर्व्हे नं.१४१/४ या सरकारी मालकीच्या जागेवर ठेवणे. |
| ७३ | Garden | हे आरक्षण येथून वगळणे |
| ७६ | P.G | हे आरक्षण वगळून सावेडी सर्व्हे नंबर ५३/४ (क्षेत्र २.४४ हे ) या सरकारी मालकीच्या जागेवर ठेवणे |
| ८५ | Garden | हे आरक्षण येथून वगळावे व आरक्षण क्रमांक ७९ वर ठेवावे. |
| ८८ | S.C | हे आरक्षण येथून वगळावे. |
| ९० | Hosp.&Maternity Home | हे आरक्षण येथून वगळावे. |
| ११३ | H.S & P.G | हया आरक्षणापैकी पश्चिमेकडील नालेगांव सर्व्हे नं.३२ चा भाग पुर्णपणे वगळावा. |
| १३७ | Swimming Tank & Gym | हे आरक्षण येथून वगळावे व आरक्षण क्र.१४३ वर ठेवावे. |
| १३९ | Park | हे आरक्षण येथून वगळावे व आरक्षण क्र.१४३ वर ठेवावे. |
| १७५ | H.S & P.G | हे आरक्षण येथून वगळावे. |
| २११ | F.S.T | हे आरक्षण येथून वगळावे. |
| २१२ | V.M | हे आरक्षण येथून वगळावे. |
| २१३ | S.C | हे आरक्षण येथून वगळावे. |
| २२८ | M.T.D.C | हे आरक्षण येथून वगळून आरक्षण क्र.३१६ वर ठेवावे. |
| २४८ | S.C | हे आरक्षण येथून वगळावे. |
| २७९ | Truck Turminus & Central Godown | हे आरक्षण येथून वगळावे. |
| २८३ | C.P.G | हे आरक्षण येथून वगळून -- |
| २८८ | P.S.& P.G | हे आरक्षण येथून वगळावे. |
| ३०० | F.S.T& Offices | हे आरक्षण येथून वगळावे. |
| ३०१ | S.C.V.M. & Offices | हया आरक्षणातील नालेगांव सर्व्हे नंबर ११पुर्णपणे वगळावा. |
| ३०५ | P.S.P.G | हया आरक्षणातील उत्तरेचा स.नं १३/२ वगळणे. |
| ३११ | Garden | हया आरक्षणातील उत्तरेचा १/२ भाग वगळून तो स.क्र.३९ वर दर्शवणे. |

आपण सुचविलेल्या या आरक्षणांव्यतिरिक्त इतर काही बदल विकास आराखडयामध्ये सुचवित आहोत ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) आरक्षण क्र.३१ चे नामकरण P.G करणे व आरक्षण क्र.४१ चे नामकरण Housing for Dishouses करणे

२) सावेडी सर्व्हे नं २३४ व २५५ मधील सर्व सरकारी मालकीच्या जागावर P.G चे आरक्षण ठेवणे.

३) महानगरपालिका कर्मचा-यांच्या घरकुल योजनेसाठी भिस्तबाग सर्व्हे नं ३ पैकी तपोवन रस्त्यालगत ६० आर क्षेत्रावर आरक्षण ठेवणे.

४) नालेगांव स.नं ११ मधील पुर्व पश्चिम रस्ता १२ मीटर ऐवजी ९ मीटर ठेवणे.

५) अहमदनगर शहरातून जाणा-या सर्व महामार्गास दर्शविलेले १२ मीटरचे सर्व्हिस रोड रिंग रोड (बाय - पास ) पर्यंत रद्य करावेत.

६) सावेडी - बोल्हेगांव रस्त्यांवरील बोल्हेगांव ग्रामदैवत बिरोबा मंदीरावर जाणारा दक्षिणोत्तर रस्ता मंदीरापासून बाजुस सरकवावा.

७) केडगांव सर्व्हे नं ८५ व ८६ च्या दक्षिण बाजूस असलेला नैसर्गिक ओढयालगतचा रस्ता रद्य करावा.

८) नागापूर हद्यीतील सीना नदीकाठचे नागापुर सर्व्हे नं १३२,१३५ ते १३८ या मधील ग्रीनबेल्ट मंजुर प्रादेशिक योजनेनुसार (आर.पी ) ग्रीन बेल्टच ठेवावा.

९) सावेडी हद्यीतील आठरे पाटील शाळेजवळील सावेडी सर्व्हे नं ३०५ हा मंजुर प्रादेशिक योजनेनुसार (आर.पी ) ग्रीन झोनच ठेवावा.

१०) नालेगांव सर्व्हे नंबर १ व २ मध्ये वस्ती व ले आउट मंजुर असुन त्यावरील ग्रीन बेल्ट ७.५० मीटरचा ठेवावा.

११) माळीवाडा सर्व्हे नंबर ३७ मध्ये वाकोडी रस्त्यांच्या पश्चिमोत्तर कॉर्नरला Sewage treatment plant साठी ०.८ हे आरक्षण ठेवण्यात यावे.

१२) सावेडी सर्व्हे नं.३०४/१ व ३०३ वर शाळेलगत P.G चे आरक्षण ठेवण्यात यावे.

१३) प्रस्तावीत नागापूर दफन भुमी कडे जाण्यास नागापूर सर्व्हे नंबर १४७ व सावेडी सर्व्हे नं २६३ व २७६ मधून रस्ता टाकण्यात यावा.

१४) नागापूर सर्व्हे नं १४५ मधील ३० मीटर रिंग रोड व मनमाड रोड ते काकासाहेब म्हस्के कॉलेज पर्यंत वाईंदनींग मधुन सुटलेल्या जागेत व्हिजीटेबल मार्केटचे आरक्षण ठेवावे.

उपरोक्त तक्त्यांतील सुचना व दुरुस्तीसह या ठरावाद्वारे मान्यता देण्यांत येत आहे.मात्र या सर्व सुचना व दुरुस्ती करुनच विकास आराखडा प्रसिध्द करण्यांत यावा.

आवश्यक असणारी कायदेशिर कार्यवाही विचारात घेता महानगरपालिका प्रशासक ठराव क्रमांक २७ दिनांक २५/८/२००३ अन्वये दिनांक ३०/६/२००४ पर्यंत मुदतवाढ अपेक्षिलेली आहे. तथापि अजुनही या कामासाठी (म्हणजेच विकास योजना शासनास सादर करण्यांसाठी ) एक वर्षाचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. ही मुदतवाढ मा.महासभेत मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. म्हणुन कलम २१ अन्वये दिनांक १/७/२००४ ते ३१ डिसेंबर २००६ पर्यंत मुदतवाढ मंजूर करण्याचा प्रस्ताव मा.महासभेस सादर करणे आवश्यक आहे.

४. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम २६ (१) अन्वये विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर केल्यापासुन दोन वर्षाच्या मुदतीत ही विकास योजना प्रसिध्द करणे आवश्यक असते. ही प्रसिध्दीकरणाची मुळ मुदत दिनांक ११/५/२००२ अशी होती. तथापि विकास योजना घटकाची स्थापनाच काहीशी उशिरा झाल्याने व इतर विविध कारणांसाठी ही विकास योजना मुळ मुदतीत प्रसिध्द होवु शकली नाही. शासनाने ही मुदत दिनांक १०/५/२००३ पर्यंत वाढवुन दिलेली आहे. व त्यापुढे मुदतवाढ मिळण्याचा ठराव महानगरपालिकेने पारित करुन तसा प्रस्ताव शासनास पाठविलाआहे. शासनाने मंजूर केलेली मुदतवाढ व महानगरपालिकेचा ठराव क्रमांक २७ दिनांक २५/८/२००३ चा विचार करता तसेच यापुढील प्रसिध्दी करणाचा कालावधी विचारात घेता कलम २६ अन्वये दिनांक ११/५/२००४ ते दिनांक १०/५/२००६ पर्यंत मुदतवाढ मागण्याचा प्रस्ताव मा.महासभे कडुन मंजूर होणे आहे.

सबब वरील प्रमाणे तीन प्रस्ताव मा.महासभेस मंजूरीसाठी तात्काळ सादर होणे आवश्यक आहे. पुढील आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचाअभिप्राय की, नगररचनाकार यांचेकडील प्रास्ताविक टिप्पणी प्रमाणे प्रस्ताव मंजूरीसाठी मा.महासभेपुढे ठेवणे योग्य.

यावर मा.प्रभारी आयुक्त यांचाअभिप्राय की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम २६ (१) व २१ विचारात घेता विषयांकित आराखडा त्वरीत महासभेपुढे ठेवुन नागरिकांसाठी प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तसेच अधिनियमातील तरतुदी नुसार आराखडया वरील कार्यवाहीसाठी अहवालानुसार मुदतवाढ मागणे् आवश्यक आहे. कार्यवाहीसाठी महासभेपुढे सादर.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर) व मा.प्रभारी आयुक्त यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

--*--

**ठराव** -- ऑफिस प्रस्तावानुसार अहमदनगर शहराच्या वाढीव हद्यीची प्रारूप विकास योजना प्रसिध्द करणेत यावी. खर्च मंजुर.

सदर योजना प्रसिध्द केल्यानंतर त्यावर होणारा हरकती / सुचनांचा विचार करून पुनश्च सभेपुढे सदर विकास योजना मंजुरीस्तव ठेवावी. नियमानुसार कार्यवाही करावी.

ठराव बहुमताने मंजूर.

सुचक -- मा.श्री.कावरे आसाराम
अनुमोदक -- मा.श्री. घुले शंकरराव

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.